

# नेऽ कुठेही वादळा

– संगीता जोशी



'ने कुठेही वादळा'
हा संगीताताईंच्या
वेचक कवितांचा संग्रह.
ही वेचणी स्वत: कवियत्रिनेच
केली आहे, मग त्याबद्दल दुमत होण्याचा
प्रश्नच नाही!

संगीता जोशी
यांची ख्याती आहे
गझलकार म्हणून, पण
त्यांनी गझलभिन्न भावकविताही
प्रचुर लिहिल्या आहेत, त्यामुळे
या 'वादळा'त कवयित्रीच्या प्रतिभेचे
समग्रह दर्शन घडले हे महत्त्वाचे.

'उत्स्फूर्ततेचा चुकीचा अर्थ लावून
मधल्या काळात कवींनी परिष्करणाकडे
अक्षम्य दुर्लक्ष केले, आज गझलकार,
सुरेश भटांच्या प्रेरणेने, इस्लाम, अलामत
इत्यादी छंद: शास्त्रीय परिभाषा आणि संकल्पना
आत्मसात करून मराठी काव्याभिरुचीस
आणि प्रतिभेस विशुद्ध करीत आहेत.
संगीताताईंचे हे छंदज्ञान आणि काव्यभान
समकालीन काव्याचे भूषण आहे.

– द.भि. कुलकर्णी

# ने कुठेही वादळा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १६ जून २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# नेऽ कुठेही
# वादळा

– संगीता जोशी

Ne Kuthehi Vadala
नेऽ कुठेही वादळा

प्रथमावृत्ती
२२ फेब्रुवारी २०१४

प्रकाशक
आशुतोष पुरंदरे
कर्वेनगर, पुणे

© संगीता जोशी
ए–१, भूषण अपार्टमेंटस्, ११/२, कर्वेनगर,
कमिन्स कॉलेजजवळ, शाहू कॉलनी, लेन नं.१,
पुणे – ४११ ०५२
भ्रमणध्वनी – ९६६५०९५६५३
E-mail : sanjoshi729@gmail.com

मुखपृष्ठ
राजेंद्र दिक्षित

अक्षरजुळणी
दत्तात्रय एंटरप्रायझेस
शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

मुद्रक
किरण प्रोसेस
शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

किंमत :

• टीप – हे पुस्तक www.bookganga.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ह्या

माझ्या शब्दांना

तूच आकाश देतोस;

म्हणून

तुलाच !...

❃❃❃

# दोन ओळी...

'नेऽ कुठेही वादळा'. माझ्या जुन्या-नव्या गझलांचा हा संग्रह रसिकांच्या हाती देताना खूप आनंद होत आहे. माझी पूर्वीची पुस्तके, 'म्युझिका' व 'वेदना-संवेदना' ही आता उपलब्ध नाहीत; रसिक व पीएच्.डी.चे अभ्यासक एकत्रित संग्रहाची विचारणा करतात, त्यामुळे हा संग्रह काढण्याचा निर्णय घेतला. ह्याला 'समग्र' म्हणता येणार नाही. हा निवडक गझलांचा संग्रह आहे.

मी गझल हा फॉर्म जाणीवपूर्वक निवडला नाही. किंबहुना मी लिहिलेल्या कवितांपैकी काही कविता गझला आहेत हे मला नंतर कळले. त्यात त्रुटीही होत्या. त्यामुळे काहींमध्ये मी स्वत:च इस्लाह (सुधारणा) केली होती. प्रत्येक गझलकाराला लिहून झाल्यावर चिंतन करून, निर्दोषत्वासाठी जरूर तर, स्वत: थोडीफार इस्लाह करावीच लागते; नव्हे करणे गरजेचे असते. जरूर पडली नाही, तर छानच !

मी वयाच्या पंधराव्या वर्षांपासून कविता लिहिल्या. हा छंद किशोरी-वयापुरताच मर्यादित न राहता पुढेही चालूच राहिला. माझे पहिले दोन संग्रह हे 'गझला व इतर कविता' असेच होते. या संग्रहानंतर गझलांशिवाय इतर कवितांचा संग्रह काढण्याचा मानस आहे. संकल्प करण्यास वयाचे बंधन कशाला पाहिजे ?

माझ्या गजल-प्रवासात अनेकांची साथ मिळाली. नावे घ्यायची ठरविली तर दोन ऐवजी दोनशे ओळी होतील. त्यातही एखादे विसरले तर कुणीतरी दुखावले जाईल; म्हणून उल्लेख टाळते. सर्वांनी दिलेले प्रेम हा माझा ठेवा आहे.

सुरुवातीला गझल या काव्यप्रकाराला अनुकूल वातावरण नव्हते. पण कविश्रेष्ठ सुरेश भट यांच्या अथक प्रयत्नांमुळे प्रथम लोकांनी व नंतर साहित्यवर्तुळातही गझल स्वीकारली गेली; व आता तिचे चांगले स्वागत होत आहे. नवीन गझलकार खूप चांगले लिहीत आहेत. त्यात स्त्री-गझलकारांचीही संख्या बरीच असली तरी ती अजूनही वीस टक्क्यांच्या आत आहे ! हे, आकडेवारी मांडून केलेले निरीक्षण आहे. त्यांनी मागे राहू नये; भरपूर लिहावे, पुढे यावे ही इच्छा आहे. केवळ वयाचे ज्येष्ठत्व व पहिली स्त्री गझलकार (हे इतरांनी म्हटले व संशोधनानंतर स्थापित केले आहे); या नात्याने हे म्हणावेसे वाटते.

गझलेत वापरलेल्या काफियांचे उत्कृष्ट वा निकृष्ट असे प्रकार मानण्यात येतात. उर्दूत तशी प्रथा नाही, असे डॉ. राम पंडित सांगतात. अ, इ, उ अशी एकत्रित अलामत, किंवा आ, ई, ए, ओ अशी अलामत वापरली तर तसे काफिया-योजन निकृष्ट मानले जाते. तसेच स्वर-काफियाही. अर्थात् हे विशेषण फक्त काफियापुरते मर्यादित असते. त्यावरून गझलेमधील काव्यगुणाचा दर्जा ठरविला जात नाही, हे महत्त्वाचे. काफियांचे असे वर्गीकरण करू नये असेही काहींचे मत आहे. आज तर, गझलचा कॅनव्हास विस्तारण्याच्या दृष्टीने काफियांचे व ऱ्हस्व-दीर्घाचे (लघु-गुरु) नियमही मराठी गझलेत उर्दूप्रमाणे शिथिल करावेत असा विचार चालू आहे.

गझलकारांनी, बैठक पक्की होईपर्यंत अलामतीबाबत ह्या सवलती जरूर घ्याव्यात. पण हळूहळू त्या टाळाव्यात असे मला वाटते. कारण काफिया-रदीफ हीच तर तंत्रदृष्ट्या गझलेची ओळख आहे. ह्या संग्रहात मी सुरुवातीच्या गझलांमध्ये वापरलेल्या काफियांमध्ये वापरलेल्या अलामती तशाच ठेवल्या आहेत. फारच तंग काफिया असेल तेथेही सवलत घेतलेली आहे. अर्थात् गझलेच्या विकासाच्या दृष्टीने नियमांचा बाऊ करणे योग्य नाही हे मलाही पटते. मात्र गझलेच्या सौंदर्यात तंत्राचाही काही भाग आहेच हे लक्षात ठेवायला हवे. ह्या संग्रहात आलेल्या बहुतांश गझला लेखनाच्या कालानुक्रमाने आल्या आहेत. त्यावरुन अभ्यासकांना निष्कर्ष काढता येतील. मी विविध प्रयोग केले आहेत. ते वाचकच शोधून काढतील. जुन्या गझलांमध्ये मी आत्ता छापताना 'क्वचितच' बदल केले आहेत. त्या त्रुटींसहितच मुद्दाम छापल्या आहेत. बे-मतला गझलही क्वचितच सापडेल. मी लिहायला सुरवात केल्यानंतर आमच्यापुढे 'सुरेश भट' हेच एक आदर्श होते. त्यांच्या गझलांमधील विचारांचे, कल्पनांचे माझ्याकडून अनुकरण होऊ नये याची काळजी मी घेत होते. त्यासाठी खूप वाटले तरी त्यांची पुस्तके पुन्हा पुन्हा वाचणे मी टाळत असे.

मनातील एक खंतही व्यक्त करावीशी वाटते. कलावंत व साहित्यिकांनी आपापसात छोट्या छोट्या भिंती उभारून कलेचा व साहित्याचा अपमान करू नये. मतभेद असू शकतात. त्यावरून व्यक्तिभेद करणे असहिष्णुतेचे लक्षण आहे. हेवेदावे, मत्सर, जात-पात अशा बंधनात व्यक्ती अडकली तर ती कलावंत वा साहित्यिक ह्या पदवीला पात्र नाही, असे मला वाटते.

काहीवेळा आपल्याला दुसऱ्याच्या लेखनातील एखादा विचार खूप आवडतो. न राहवून तो आपल्या काव्यात गुंफणे याला 'श्रुतयोजन' म्हणतात; आणि तो एक भाषा-अलंकार आहे. पण कवीने प्रामाणिकपणे तसा उल्लेख करायला हवा. तसेच

उर्दू-हिंदी गझलांचे सर्रास अनुकरणही काही कवी करतात; हे तर निंदनीय आहे. हे टाळायलाच हवे. रसिक चोखंदळ असतात व त्यांचे चौफेर वाचनही असते. त्यामुळे अशा युक्त्यांचा उपयोग नसतो. माझ्या ह्या संग्रहात अगदी क्वचित् ठिकाणी श्रुतयोजन अलंकार आढळेल, तिथे मी चांदणी (एस्टेरिस्क) छापायला सांगितली आहे.

माझ्या गझला आवडणारे अनेक भेटलेले, न भेटलेले रसिक, माझ्या गझलांना स्वरांचे पंख देऊन रसिकांपर्यंत पोहोचविणारे संगीतकार व गायक ह्यांची मी जन्मभर ऋणी आहे. माझ्या गझल लेखनात 'कोणाचेही अनुकरण नाही.' अशी प्रशस्ती मा.समिक्षक डॉ.द.भि.कुलकर्णी सरांनी बोलता बोलता दिली; तसेच त्यांनी ऐनवेळी मलपृष्ठासाठी मजकूर स्वहस्ताक्षरात लिहून दिला. याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

माझ्या कुटुंबाच्या पाठबळाशिवाय माझा गझल-प्रवास सुरू राहिलाच नसता. आपलेच आहेत म्हणून त्यांचा उल्लेख न करणे, कृतघ्नपणाचे ठरेल. पती श्री. विश्वनाथ, मुलगे, राजेंद्र (अभिजित) व उपेंद्र आणि सुना विनया व मृणाल यांचे श्रेय त्यांना मनापासून देत आहे. मृणालने आग्रह धरला नसता व कष्ट घेतले नसते तर हा संग्रह निघणे अशक्यच होते.

सर्वांचे मन:पूर्वक आभार !

**– संगीता जोशी**

❋❋❋

## वृत्त– आनंद

आयुष्य तेच आहे
अन् हाच पेच आहे... १

हे दु:ख नेहमीचे
होते तसेच आहे...२

कोणी न सोबतीला
हे ही बरेच आहे...३

तू भेटशी नव्याने
बाकी जुनेच आहे...४

सुख पांघरू कसे मी
ते तोकडेच आहे...५

समजायचे उन्हाला
हे चांदणेच आहे...६

वाटेत आजच्याही
मागील ठेच आहे...७

टाळू शके न कोणी
जे व्हायचेच आहे...८

बोलू घरी कुणाशी
तेही सुनेच आहे...९

झेलीत वादळांना
घर हे उभेच आहे...१०

रक्तास जात नाही
ते तांबडेच आहे...११

तू प्रेम दे जगाला
मग ते तुझेच आहे...१२

आरंभ ज्यास ते ते
संपायचेच आहे...१३

कोणी नसे कुणाचे
बस्! सत्य हेच आहे...१४

हे झाड बाभळीचे
बघ, एकटेच आहे...१५

मृत्यूहि जन्मलेला
जन्मासवेच आहे...१६

मी चालते तरीही
आहे तिथेच आहे...१७

अंतीम घे भरारी
नभ मोकळेच आहे...१८

■

## वृत्त– आनंदकंद

आता तरी फुलांच्या वाटे नकोस जाऊ
ते रूप कागदी अन् ते रंगही दिखाऊ...

आकाशही कसे हे उंची दुकान झाले
तारे महाग येथे हा चंद्रही विकाऊ...

केव्हातरी तुझी ही संपायचीच स्वप्ने
ही काचखेळणी का होती कधी टिकाऊ?...

माझ्या मनातले मी कोणास दु:ख सांगू?
जे भेटले, निघाले ते कातडीबचाऊ...

देतोस जीवनाला कामे तुझी स्वत:ची
तूही खरेच मृत्यो, आहेस ऐतखाऊ...!

■

## छंद– अष्ट षडाक्षरी

जीवना रे, दिल्या शब्दा जागता न आले
तुला सुख होईलसे वागता न आले...१

एकदाच नियतीने फासे दिले हाती
मागायचे होते दान मागता न आले...२

नेहमीच घडली ती फक्त चुकामूक
दैव झोपले नि मला जागता न आले...३

कोंडुनिया ठेविले मी किती वादळाला
उध्वस्तले मन तरी सांगता न आले...४

गाडले मी खोलवर मनातले दु:ख
हासू हंड्या-झुंबराशी टांगता न आले...५

■

## वृत्त– कलिंदनंदिनी

कितीकदा पुन्हा पुन्हा बहार येत राहिली
तरी किती कळ्यांस ती अनोळखीच राहिली...

झपाटल्या दहा दिशा पिऊन गंध-गारवा
कितीक अंकुरा परंतु जाळतेच काहिली...

निनादलीहि वेळुच्या बनात बासरी जरी
कधी कुणी न तेथली उदास रात्र पाहिली...

सुरेल सप्तसूरही असेच येत राहिले
थरारली हरेक तार रात्र मूक राहिली...

कितीकदा मनात शब्द रूप घेत राहिले
परी तुला दुरून मी अशब्द प्रीत वाहिली...

विचार पृथ्विला जरा कळा तिच्या उरातल्या
वियोगरात्र भास्करा, कधीच तू न साहिली...

■

## वृत्त–मंजुघोषा

माझिया प्रेतावरी जे हार होते
हारण्याचे माझिया सत्कार होते...

मी कधी नाही सुखाचा शोध केला
लाभलेले दु:ख तेही प्यार होते...

ताटवे जोपासले होते जयांचे
त्या गुलाबांनीच केले वार होते...

दंश कोणीही कधी केलाच नाही
जीव घेण्याला पुरे फुत्कार होते...

खंजिरांना दोष का मी व्यर्थ देऊ
राक्षसी हातात ते लाचार होते...

काढिला मी जन्म बाजारी अशा ह्या
प्रेम-भक्तीचे जिथे व्यापार होते...

मृत्युचे होते दिलासे हरक्षणाला
तेच जगण्याचे खरे आधार होते...!

■

## वृत्त–आनंदकंद

हा चंद्र केशराचा विरणार काय आता?
जगण्यास सोबतीला उरणार काय आता?...

सुखसोहळयात होते साक्षी समर्पणाचे
क्षण तेच क्रूरतेने डसणार काय आता?...

रात्रीस एकदा जो देऊन गंध गेला
निशिगंध स्नेह–ओला सुकणार काय आता?...

गात्रात पेटलेल्या रंगीत चंद्रज्योती
होऊन राख त्याही विझणार काय आता?...

तुझियाशिवाय माझ्या असण्यास अर्थ नाही
ते कापराप्रमाणे उडणार काय आता?...

■

## वृत्त–मंजुघोषा

कोण जाणे कोणत्या स्वप्नात होते
एक मी बेबंद गाणे गात होते...

हाय ! मृत्यूसारखे आयुष्य गेले
जीवघेणे रोजचे आघात होते...

त्या खुनाचा राहिला नाही पुरावा
भोसकायाचे सुरे शब्दात होते...

मी जरी तेव्हा मला शोधीत गेले
दु:खही माझ्या तसे शोधात होते...

मी तसे धुंडाळले सारेच रस्ते
गाव माझे कालच्या रस्त्यात होते...

बोलले हासून मी जेव्हा उद्याशी
भूतकाळाच्याच मी ताब्यात होते...

फोडली मी व्यर्थ सारी तावदाने
सूर्यकिरणांचे थवे माझ्यात होते...

■

## वृत्त–मंजुघोषा

त्या क्षणानंतर पुन्हा हसलेच नाही
शोधुनीही मी मला दिसलेच नाही...

खेळ सारा आंधळ्या कोशिंबिरीचा
मी प्रकाशाला कधी पुसलेच नाही...

कैक स्वप्ने मयसभा रेखीत गेली
काय खोटे सांगु की फसलेच नाही?...

शर्थ केली मी जुगारी जिंकण्याची
हारले, आयुष्य मग पिसलेच नाही...

आगळ्या ह्या वेदना कोणा कळाव्या?
सूर जर त्यांना कधी डसलेच नाही...

हा नसे अपराध आकाशा, तुझाही
चांदणे डोळ्यांमधे ठसलेच नाही...

एकदा दु:खास केले आपलेसे
दु:ख तेव्हापासुनी कसलेच नाही...

■

## वृत्त–मंजुघोषा

जीवना, हाका तुला मी देत गेले
श्वास अडखळले तरीही घेत गेले...

फूल ते माझ्याच होते भावनांचे
जे कधी सुकुनी तुझ्या बागेत गेले...

योग भेटीचा तुझ्या आलाच नाही
हाय ! हे आयुष्य त्या आशेत गेले...

दाबले जो जो मनीचे मी उम्हाळे
अक्षरांना ह्या फुलोरे येत गेले...

मी तुझे मरणा, कसे आभार मानू
जन्म हे प्रेमळ तुझ्या छायेत गेले...

■

## वृत्त– आनंदकंद

नुसतेच ह्या क्षणाला मन दर्वळून जावे
हितगूज त्या ऋतूचे मजला कळून जावे...

गंधाळ केतकीला असणार चार काटे
त्यांनी मयूरपंखासम हुळहुळून जावे...

स्वप्नात पाहिल्या मी रात्री फुलाफुलांच्या
त्यातील रंग अंगावर ओघळून जावे...

उतरून आज यावा तो चंद्र पौर्णिमेचा
अन् चांदण्यात माझेपण विर्घळून जावे...

मेघास लाविलेल्या बघ झालरी रुपेरी
ह्या मांडवात अपुले नाते जुळून जावे...

■

## वृत्त–मंजुघोषा

ही शिडे तुटणार हे माहीत होते
नाव भरकटणार हे माहीत होते...

त्या असत्याच्या कुटिल सत्तेपुढे ते
सत्यही नमणार हे माहीत होते...

कोरड्या आश्वासनांचे विविधरंगी
ते फुगे फुटणार हे माहीत होते...

कुंपणापर्यंत सरडे धावणारे
रंग पालटणार हे माहीत होते...

या महागाईत केवळ माणसांचे
भाव ढासळणार हे माहीत होते...

राबणाऱ्या दीन जनतेच्याच माथी
दंडुके पडणार हे माहीत होते...

ही पिढी नि:सत्त्व अन् निष्क्रीय अमुची
काव्य चिरखडणार हे माहीत होते...!

■

## वृत्त–मेनका

प्रश्न माझा जीव खाऊ लागले
जीवनाला भेडसावू लागले...

घालवू दु:खास कोठे अन् कसे
ते अता हृदयात राहू लागले...

पेटलेले हे निखारे भोवती
आसवांना धाक दावू लागले...

मानिले ज्यांना जिवाचे मित्र मी
ते कसायांना चिथावू लागले...

हात मी जेव्हा धराया पाहिला
लोक तेव्हा दूर जाऊ लागले...

यापुढे त्यांचा इरादा वेगळा
साप आता कात टाकू लागले...

नाव दृष्टीआड ती गेल्यावरी
हे किनारे का पुकारू लागले...?

■

## वृत्त–मंजुघोषा

एकटी स्त्री आजला रस्त्यात आली
कांकणे केलीत काळाच्या हवाली...
ठेवुनी आपापली बाजूस दु:खे
घेतल्या हातात साऱ्यांनी मशाली...
आज आकाशा, जरा सांभाळ तूही
तारकांच्या वेगळ्या ह्या हालचाली...
फुंकरीने ह्या कशा विझतील आता?
पेटलेल्या लाख ज्योती भोवताली...
निर्मिले ज्यांनी स्वत: हे कैदखाने
तेच ढोंगी मागती आता खुशाली...
न्यायदेवी आंधळी राहू नको तू
ही तुझ्या डोळसपणाची वेळ आली...
राहिली भीती तलाकाची न आता
एक सर्वांना नवी ‘रझिया’ मिळाली...
हा कसा अंधारही ग्रासील आम्हां
रेखिलेले सूर्य आम्ही आज भाली...

■

## वृत्त–देवप्रिया

चंद्र आता मालवू आता कहाणी संपली
वाळला निशिगंध आता रातराणी संपली...

उंच आभाळी झुला बांधून झोके घेतले
भोवळी आल्या सुरांना धुंद गाणी संपली...

लोपल्या वाळूत ओल्या पावलांच्याही खुणा
स्पर्शिले होते किनारे ती निशाणी संपली...

शब्द झालेले मुके अन् आसवेही कोरडी
कापऱ्या ओठात आलेली विराणी संपली...

तो निळा घोडा कुठे सातासमुद्रापारचा
हाय ! तो राजा कुठे, शोधीत राणी संपली...

■

## वृत्त–व्योमगंगा

एकट्या वाटेवरीही सावलीचे ताप होते
जी उन्हे मी सोसली ते चांदण्यांचे शाप होते...

चंद्र ह्या नित्कोर माझ्या अंगणी आलाच नाही
हे सुने आकाश दारी थांबले अद्याप होते...

सांग मी दु:खा, तुझी केली कधी आहे उपेक्षा
छेडल्या तारा मनाच्या ते तुझे आलाप होते...

या टपोऱ्या मौक्तिकांना आसवे मानील कोणी
सांडले डोळ्यातुनी जे, ते सुखाचे माप होते...

माझिया जखमांमधूनी रक्तही वाहे सुगंधी
हाय ! प्राजक्ती फुलांचे वार ते निष्पाप होते...

जीवनाला कोणते आता नवे मी नाव देऊ
ज्यात काटे गुंफले ते लाघवी किनखाप होते...

■

## वृत्त–कामिनी

जीवना जगू कशास मी
घेतले उधार श्वास मी...
सांग, ह्या तमी करू कसा
हा ध्रुवाविना प्रवास मी...
ओंजळीत घातलेस जे
तेच रे दिले जगास मी...
भेटशील तू कधीतरी
शोधते तुझा सुवास मी...
तू पहा तुझ्याच अंतरी
तेवते तिथे उदास मी...
ती जरी न रात राहिली
चंद्र मागते उन्हास मी...
जन्म काढला चितेवरी
मृत्युला भिऊ कशास मी...

■

## वृत्त–देवप्रिया

थांबवू आता कशी ही वाहणारी आसवे
तोडुनी निर्बंध सारी धावणारी आसवे...

आज झालेली पराजित जीवनाच्या संगरी
वादळांना नेहमी ही जिंकणारी आसवे...

मोल त्यांचे काय? की बाजार हा निष्ठूर अन्
भावनांशी फक्त नाते सांगणारी आसवे...

मौक्तिके वा तारकाही मानिले त्यांना कधी
तीच मायेने धुळीला सिंचणारी आसवे...

आसवांच्या लोलकांनी पाहिलेले दुःख मी
जीवनाचे रंग सारे खुलविणारी आसवे...

आप्त गेले दूर तेही सोसले आघात मी
सोसवेना चालली सांभाळणारी आसवे...

कोरडे आता दिलासे आवरा, मानून घ्या
अंगप्रत्यंगातुनी ओथंबणारी आसवे...

■

## वृत्त–कलिंदनंदिनी

भले बुरे असे कितीक पाहिलेत रंग मी
जगा, नवे न काहि, सर्व जाणिलेत ढंग मी...

न मोल जाणिले उगाच अश्रु खर्चि टाकले
अताच तेहि संपले नि जाहले भणंग मी...

स्वत:सवेच युद्ध ते पराभवात संपले
कितीक मानहानिचेहि सोसले प्रसंग मी...

कुणी गुन्हेहि लादले, मलाच मी सजा दिली
तशात रक्त शिंपडून फुलविले तुरुंग मी...

पहात राहिले दुरून स्फोट व्हायचा कधी
स्वत:च ध्वस्त जीवनास लाविले सुरुंग मी...

■

## वृत्त–श्येनिका

एकदाच गीत गात हास तू
हा वसंत अन् कसा उदास तू...

रोषणाइ जाहली चहूकडे
व्यर्थ जाळतोस का जिवास तू...

गंध शोध घेत राहिला तुझा
शोधतोस सांग रे कुणास तू...

शुष्कपर्ण दूर सारुनी जरा
ही पहा प्रसन्न पुष्परास तू...

रात्र यायची निसर्ग नेम हा
सूर्य तो कशास झाकलास तू...

बासरी तुझी, तुझेच ओठही
ओळखून घे तुझ्या स्वरास तू...

हा ऋतूच गान जाहला तुझे
ह्या ऋतूस भेट दिलखुलास तू...

■

## वृत्त–मंजुघोषा

व्हायचे ते एकदा होऊन गेले
ते मला सरणावरी ठेऊन गेले...

बोचले आयुष्यभर काट्यांपरी जे
ते मढ्यावरती फुले उधळून गेले...

आसवेही ढाळली त्यांनी स्मशानी
मानणे आभार मी, राहून गेले...

लाकडे ओली निघाली आणलेली
रागरागे आग ते लावून गेले...

जाळले जेव्हा न सरणाने पुरेसे
मज गिधाडांचे थवे फाडून गेले...

■

## वृत्त–मेनका

मी जराशी जो फुलाया लागले
हे ऋतू का मावळाया लागले...
हासणारे ओठ माझे पाहुनी
दु:ख माझे घाबराया लागले...
आज दृष्टीभेट झाली आपली
हरवलेले सापडाया लागले...
तोरणे कोणी स्मितांची बांधली
चांदणे मागे सराया लागले...
अर्थ जेव्हा मौन पाळू लागला
शब्द ओठांशी जमाया लागले...
फक्त वाऱ्याची झुळुक् आली जरा
तोच घरटे विस्कटाया लागले...
स्नेह जेव्हा माणसांशी जोडला
रंग तेही दाखवाया लागले...
भाग्य मातीचे निघाले वेगळे
सूर्य पोटी अंकुराया लागले...
सोडले वाऱ्यावरी आयुष्य मी
तोल त्याचे सावराया लागले...!!

■

## वृत्त–मंजुघोषा

दु:ख आहे अंतरी साकाळलेले
पाहिले मी सौख्यही रक्ताळलेले...

लाभला अंधार तोही पेटलेला
चंद्र माझे पौर्णिमेने जाळलेले...

जी दिली शल्ये फुलांनी, पाहुनी ती
बाभळीचे झाडही ओशाळलेले...

दूर तू गेल्यावरी परक्याप्रमाणे
उधळिले आयुष्य मी सांभाळलेले...

या नभी जागा नसे घरट्यास माझ्या
ठेवु कोठे सूर हे घोटाळलेले...

जीवघेणे प्रश्न हे कोणा विचारू
काल दैवानेच ज्यांना टाळलेले...

जीवना, तक्रार माझी काय सांगू?
तूच अस्तित्वास ह्या फेटाळलेले...

■

## वृत्त–आनंदकंद

उद्विग्न का स्वत:शी हे पुष्पहार झाले
सत्कार कावळ्यांचे दुनियेत फार झाले...
आला प्रकाश तोही काळोख वाटणारा
जे काल सूर्य होते ते आज गार झाले...
आहे नव्या युगाची ही यादवी निराळी
कंसास राज्यप्राप्ती अन् कृष्ण ठार झाले...
ही आज ती उद्याला यांच्या नवीन टोप्या
रंगातल्या छटांचे सारे प्रकार झाले...
आता नव्या मतांना आश्वासने नव्याने
'जन्तेस' नाडण्याचे ढोंगी प्रचार झाले...
सांभाळुनी कसे हे भ्रष्टास भ्रष्ट घेती
बदलून कायदेही देण्या तयार झाले...
काळ्या नि पांढऱ्यांची चाले लपाछपी ही
दडतात दूर देशी पैसे हुषार झाले...
आले सुराज्य आले, नाही ददात काही
घ्या भोपळे खुशीने राजे उदार झाले...!!

■

## वृत्त–मंजुघोषा

लुप्त झाली सांज ती घेऊन काही
काळही गेला खुणा ठेवून काही...

दैव रेघोट्या अशा ओढून गेले
त्यात नाती राहिली गुंतून काही...

चांदणे फेकून देणे भाग होते
सूर्य तेव्हा ठेविले झाकून काही...

चालले रस्ते कुठे हे कोण जाणे
दूर काही आणि शेजारून काही...

बोललो नाही जरी भेटीत तू–मी
मौनही गेले तुझे सांगून काही...

दूर गेले काफिले आता सुखांचे
थांबले आहेत रेंगाळून काही...

■

## वृत्त–कामिनी

स्वप्न साजरे करून जा
श्वास श्वास मंतरून जा...
ओघळून चालली फुले
जायचेच ? त्यावरून जा...
प्रीत एवढेच मागते
ये मिठीत मोहरून जा...
चंद्र हा ढळून चालला
शेषरात्र सावरून जा...
का गुन्ह्याविनाच कैद ही
मोकळे मला करून जा...
रात्र ज्या धुक्यात लोपली
ते धुकेच पांघरून जा...
दु:ख राहु दे इथे तुझे
गंध तू उरी भरून जा...
भेटलो जरी पुन्हा कधी
मी हसेन, तू दुरून जा...!

■

## वृत्त–लज्जिता

सोडले कालच्या किनाऱ्याला
वादळे घेतली निवाऱ्याला...
या दयेच्या भिकार खैराती
हात नाही दिले भिकाऱ्याला...
जन्मले मी उजाड व्यर्थ कुठे
नाव माझे दिले सहाऱ्याला !...
शब्द आहेत रेशमी जाळे
ओळखावे कसे शिकाऱ्याला ?...
स्वप्न माझे, न राहिले माझे
ठेविते मी मुठीत पाऱ्याला !...
सापडेना मला दिशा माझी
माफ केले हसून ताऱ्याला...
झोप येईल आज शांत मला
दु:ख जागे बसे पहाऱ्याला...
घेतले मी पुन्हा नवे फासे
हारण्याची नशा जुगाऱ्याला...
फुंकुनी कोण हा दिवा गेले
फूस का ही तुझीच वाऱ्याला ?...

■

## वृत्त–मंजुघोषा

राहिले आता रिकामे हात माझे
सांडले आयुष्य मी रस्त्यात माझे...

मी फुले वेचावया जेव्हा निघाले
पाय होते गुंतले काट्यात माझे...

रंग जेव्हा कालचे सारे उडाले
रक्त मी हे ओतले चित्रात माझे...

काळ माझे ओठही चोरून गेला
दु:ख मी सांगू कसे शब्दात माझे...

कोणता हा आरसा आहे कळेना
पाहिले मी चेहरे अज्ञात माझे...

लक्तरे सांभाळते आता स्मृतींची
शोधिते मी भास त्या चिंध्यात माझे...

■

## वृत्त–आनंदकंद

कुठल्यातरी क्षणाला हे व्हायचेच होते
वणवेहि सागराला लागायचेच होते...

उमलून येत गेली जाई जरी मनाशी
पुढच्या क्षणी विजेला कवळायचेच हाते...

आली फुले न हाती लांबून हासणारी
वाटेतले निखारे वेचायचेच होते...

हातात हात आले जरि वाट चालतांना
वळणावरून रस्ते बदलायचेच होते...

जे कोरडे जिव्हाळे मिळतील घेउनी ते
हे रान माणसांचे तुडवायचेच होते...

■

## वृत्त–लज्जिता

काय अश्रूच ढाळले त्यांनी
प्रेत माझे विटाळले त्यांनी...

रोज सत्कार मृत्युचे केले
जीवनालाच जाळिले त्यांनी...

जाब घेण्यास प्रश्न मी केले
बेरकी मौन पाळिले त्यांनी...

चोरले शब्द चोरली गीते
नाव माझेच गाळले त्यांनी...

मी व्यथा ठेविली मनी माझी
दु:ख त्यांचे उगाळले त्यांनी...

■

## वृत्त–आनंदकंद

माझी मला असू द्या ही रात्र भंगलेली
लखलाभ हो तुम्हाला मैफील रंगलेली...

जावे कुठे कळेना साऱ्या दिशा अनोख्या
आकाश फाटलेले धरणी दुंभगलेली...

येऊ नका कुणीही सन्नीध शांतवाया
हे प्राण कापराचे अन् आग लागलेली...

जे भाग्यवान त्यांची दर रात्र पौणिमेची
माझ्या जमेस होती ही कोर खंगलेली...

मजला न दोष द्यावा, तुम्ही पुढे दिले ते
विषघोट प्राशुनीया कविताहि झिंगलेली...

■

## जाति–चंद्रकांत

ठोक बाजारात ह्या स्वप्ने विकावी लागली
रीत सौदे पटविण्याची अन् शिकावी लागली...

विश्वसुन शब्दांवरी आयुष्य मी ज्यांना दिले
त्याच साऱ्यांची उधारी गोठवावी लागली...

जे भिडू माझेच होते तेच फसवित राहिले
पान हे हुकमी तरीही हार खावी लागली...

सर्कशीचा खेळ होता भोवती जमले बघ्ये,
मान क्रौर्याच्या मुखी मज हसत द्यावी लागली...

जीवनाला अग्नि देणारे कितीजण भेटले
राख मज माझ्याच हाताने भरावी लागली...

वास्तवाशी लढत होते, जिंकण्याच्या जिद्दिने,
दैव लढण्या ठाकले, माघार घ्यावी लागली...

'शेर' शब्दहि ऐकताक्षणि रोखती जे बंदुका
आज त्यांच्या मैफलीतच गझल गावी लागली...

■

## वृत्त–कलिंदनंदिनी

कधीतरी अशी कुठे चुकून भेट व्हायची
अशीच एक सांज आसवातही भिजायची...

मनातल्या मनात शब्द रोखुनी धरायचे
'कसे नि काय?' 'ठीक' फक्त चौकशी करायची...

मुक्या मनात फक्त भाव उचमळून यायचे
अबोलण्यात स्पंदनेहि तीव्र जाणवायची...

दुरून चेहऱ्यात भाव वाचुनी बघायचे
घड्याळ जायचे पुढे नि वेळही सरायची...

निरोप मूक नाइलाज ओळखून द्यायचा
मनी परस्परां उदार अन् क्षमा करायची...

कधीतरी कुठे अशी चुकून भेट व्हायची
मनोमनात तेवढीच जपुनि साठवायची...

■

## वृत्त–मंजुघोषा

भाव मी शब्दाविना सांगून गेले
मागणे हृदयातले मागून गेले...

कोठुनी झंकार आले धुंदलेले
की तपस्या सूर ते भंगून गेले...

एक होता क्षण असा उंचावलेला
हात आभाळासही लागून गेले...

राजवर्खी रंग होते उधळलेले
इंद्रधनुही त्यात मग रंगून गेले...

रंगली रात्री अशी माझी कहाणी
चंद्र–तारेही इथे जागून गेले...

त्या क्षणाला शाप होता संपण्याचा
दु:खही मी तृप्तिने भोगून गेले !...

■

## वृत्त–आनंदकंद

काही न बोलले अन् आयुष्य सोसले मी
जे वार होत गेले, हासून झेलले मी...

तुटुनी कडे कितीदा माझ्या दिशेस आले
पण तेहि पापण्यांनी हलकेच पेलले मी...

काटेच माजलेले होते चहूदिशांना
रक्तात पाय न्हाले पण मूक चालले मी...

आयुष्य लागते हे रंगीत भासवावे
डोळ्यांमधील पाणी लपवून हासले मी...

अजुनी किती प्रतीक्षा, येशील सांग केव्हा ?
सारे तुझ्याच नावे हे श्वास गुंफले मी...

■

## वृत्त–आनंद

ये साद ही तुला रे
ये प्रीतिच्या फुला रे...

हा राहिला रिकामा
बागेतला झुला रे...

ही पापणी मिटेना
ये मार्ग हा खुला रे...

केव्हाच आसवांची
भारावली तुला रे...

लग्नात बाहुलीच्या
हो तूच बाहुला रे.!..

■

## वृत्त–श्रुतानंद

कालचे ते तसे होते
आजचेही हसे होते...

आठवेनात नावेही
कोण होते, कसे होते...

दु:ख डोळ्यात मावेना
बोलके आरसे होते...

वाट माझी, तुझे तेथे
पावलांचे ठसे होते...

भंगले आज स्वप्नांचे
खेळणे छानसे होते...

राहिले अंत येईतो
ठेविले तू जसे होते...

सोहळा हा न जन्माचा
मृत्युचे बारसे होते !!...

■

## वृत्त–व्योमगंगा

माझिया वेड्या जिवाचे मी कुणाला दान देऊ
भोवती सारे कसाई, मी कुणाला मान देऊ...

पारखे आकाश झाले या अभागी तारकांना
जाहल्या उल्का तयांना कोणते अस्मान देऊ...

वाळवंटानेच केली अंतरी आधीच वस्ती
सांग जाईच्या फुला, मी कोणते तुज स्थान देऊ...

जीवना, तुज शोधतांना जन्म हा संपून गेला
मृत्युच्या दारात आता कोणता सन्मान देऊ...

यज्ञवेदीलाच मी ह्या बोहले मानून घेते
सांग सौभाग्या, अता मी कोणते बलिदान देऊ...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

पुन्हा जागले मी तुला आठवाया
तुझे भेटले स्वप्न जागे कराया...

मला जीवना, तीच दे तीच स्वप्ने
मला ती हवी लक्तरे पांघराया...

तुझे जादुई आरसे दोन डोळे
खुळी राहिले मी न, आता फसाया...

बरी दूर मी एकटी माळरानी
कसे गाव आले मला बोलवाया...

कधी वेदनांनी जरी जीव गेला
सराईत ओठास आले हसाया...

खरी अंतरी खोट त्यांच्याच होती
अता लागले ते मनी घाबराया...

पुरा जन्म अश्रूत वाहून गेला
पुन्हा तू न आलास डोळे पुसाया...

मला जाळुनीही न संतोषले ते
अता सिद्ध ते राख माझी पुराया...

■

## वृत्त–व्योमगंगा

आठवेना संपले त्या बासरीचे सूर केव्हा
घेउनी कृष्णास गेला कोणता अक्रूर केव्हा...

त्या तुझ्यामाझ्यात आता राहिल्या नाहीत भिंती
कोठुनी आला कळेना आसवांचा पूर केव्हा...

कोण जाणे हिंडले मी कोणत्या वणव्यात कोठे
मी कसे सांगू मनाचा पेटला कापूर केव्हा...

वाळुनी गेली फुले अन् कौलही खोटे निघाले
मीच पाषाणास होता फासला शेंदूर केव्हा...

ती कुठे चाहूल होती वाजला वारा जरासा
लागला डोळा कसा अन् चंद्र गेला दूर केव्हा...

■

## वृत्त–मंजुघोषा

जे असायला हवे ते आज नाही
अन् उद्याचाही मला अंदाज नाही...

बोच काट्याची अशी का बोथटावी
का फुलांचे हासणे निर्व्याज नाही...

केवढा कल्लोळ माझ्या भोवताली
ओळखीचा एकही आवाज नाही...

तू जमेला ठेवुनी घे प्रेम माझे
फेडण्याची मागणी वा व्याज नाही...

जीवना, जन्मांतरीचा सूड घे तू
मी अता कोणावरी नाराज नाही...

छेडितो एकांत माझे मूक गाणे
ताल नाही, सूर नाही, साज नाही...

■

## वृत्त–मंजुघोषा

काय मी आता करू ह्या चांदण्याचे
दिवस माझे नेहमी अंधारण्याचे...

मैफलीची राखली नाही प्रतिष्ठा
मान्य, मी केले गुन्हे झंकारण्याचे...

ग्रीष्म होता रोज माझ्या सोबतीला
दु:ख नाही सावलीच्या वागण्याचे...

सांगता होणार केव्हा या व्रताची
आसवांनी नेम केले हासण्याचे...

होउ द्या आघात आता काय चिंता
राहिले नाहीच काही भंगण्याचे...

ह्या फुलाने गंध सारा दान केला
वेध आता लागले कोमेजण्याचे...

■

## वृत्त–कामिनी

चांदणे ढळायचे पुन्हा
रे निरोप द्यायचे पुन्हा...

बंद ओठ सांगती तुझे
हुंदके गिळायचे पुन्हा...

आसवात नाहलो तरी
कोरडे हसायचे पुन्हा...

रोम रोम लागला झुरू
स्पर्श ना फुलायचे पुन्हा...

दु:खही स्वरात गुंफुनी
मैफलीत न्यायचे पुन्हा...

हारलो पुन्हा पुन्हा तरी
जन्म हे पिसायचे पुन्हा...

■

## वृत्त–मंजुघोषा

चालले पण पाय माझे क्रुद्ध होते
मार्ग काट्यांनी सदा समृद्ध होते...

हारतांना जिंकण्याची शर्थ केली
रोजचे ते दो मनांचे युद्ध होते...

हात मी हाती दिला भेटेल त्याच्या
जोखण्या हेतू कुणाचे शुद्ध होते...

ओळखीची भोवती सारीच रूपे
कृष्ण कोणी, ख्रिस्त कोणी बुद्ध होते...

ते ऋतू यावेत का तैशा अकाली
ह्या फुलांचे कंठ जेव्हा रुद्ध होते ?...

■

## वृत्त–मंजुघोषा

भेटले जे लोक ते फसवून गेले
मात्र संधी साधुनी चुकवून गेले...

लक्तरे पाहून माझ्या वेदनांची
चार टाक्यांऐवजी उसवून गेले...

शब्द मी केले खरे माझे परन्तू
ते उधारी आपली बुडवून गेले...

मी विसंबू लागले ही चूक झाली
ऐनवेळी पाठ ते फिरवून गेले...

लाविली होती पणाला मी प्रतिष्ठा
खेळण्याआधी कसे हरवून गेले...

आपुले मानू नये कोणास कोणी
मित्रही माझे मला शिकवून गेले...

■

## वृत्त–मृगाक्षी

गळे हे रक्त माझे ही न शाई
सुरू माझीच माझ्याशी लढाई...

जगाने सोलले काळीज माझे
पुन्हा ह्या आसवांनाही मनाई...

जरी ही लाभली वस्ती दयेची
घराच्या भोवती सारे कसाई...

कुठे स्वप्ना, तुझी शोधू सुखे मी
तुझी केली किती मी सरबराई...

हिऱ्यांची अक्षरे माझी तरीही
जमेला कोळशाची ही कमाई !...

नसे हा फार मोठा ग्रंथ माझा
मला तू वाच मी साधी रुबाई !!..

■

## वृत्त–मंजुघोषा

चांदण्याला मोगऱ्याचा वास होता
तू इथे होतास की तो भास होता...

दुखवुनी काळीज गेला जो कळ्यांचे
एक तोही आगळा मधुमास होता...

आसवे आगीत सारी वाफ झाली
घेतला तो पेटलेला श्वास होता...

व्यर्थ मी वेडयापरी केली प्रतीक्षा
तू तरी येशील हा विश्वास होता...

आठवूनी आठवेना नाव माझे
चेहऱ्याला तो खुळा हव्यास होता...

जन्म हा माझा जरी, होता न माझा
क्रूर होता काळ, त्याचा घास हाता ...!

■

## मात्रावृत्त–अरुणप्रभा

सजविली मी वेदना अन् वेदनेचे गीत झाले
फुलविल्या बागा तसे, ज्यालामुखीही शीत झाले...

रंग शोधुनि आणिले अन् जमविली मैफल सुरांची
जुळविल्या तारा नि मग आयुष्यही संगीत झाले...

घेतले जोडून तुकडे मी बिलोरी आरशाचे
एकसंधी जीवनाचे सौख्य प्रतिबिंबीत झाले...

अमृताच्या एक थेंबाने तृषा सारी निमाली
दिव्यतेचा स्पर्श झाला आणि मन पुलकीत झाले...

जळुन गेलेल्या मला राखेतुनी नवजन्म लाभे
गवसली संजीवनी अन् आज हे अघटीत झाले ...!

■

## वृत्त–देवप्रिया

भाव येती दाटुनी अन् भावतो पाऊस हा
जीवनाला अर्थ आहे सांगतो पाऊस हा...

हरवलेले गीत माझे तोच येतो घेउनी
प्रेमवर्षावात तेव्हा भिजवतो पाऊस हा...

सूर, लय, सम साधते अन् रागही अनुरागही
रंगते मैफल पुन्हा ती सुखवतो पाऊस हा...

वाट ही क्षितिजाकडे जावी, कधी संपू नये
अत्तरे वाटेत माझ्या शिंपतो पाऊस हा...

मोहरूनी आठवीते मी सुखाचे क्षण पुन्हा
जागते मी, साथ माझ्या जागतो पाऊस हा...

वाटते ह्या पावसाला साठवावे ओंजळी
तोच मिस्किल ऊन हसते थांबतो पाऊस हा. !

■

## वृत्त–कलापती

मागणे बरे नव्हे कुणास चांदणे
यापुढे म्हणायचे उन्हास चांदणे...

कालचा तुझ्यासवे प्रवास चांदणे
एकटे तुझ्याविना उदास चांदणे...

रात्र मी लपेटुनी हळूच घेतली
जाहले तुझाच स्पर्शभास चांदणे...

छेडिलास मारवा जिथे कधीतरी
राहते तिथेच आसपास चांदणे...

भेटण्यास यायचास तू अता कधी
भेटले प्रभातिच्या दंवास चांदणे...

दाखवू नकोस रे मना कधी कुणा
जाळते कसे तुझ्या जिवास चांदणे...!

■

## वृत्त–मंजुघोषा

रोज ह्या खिडकीत माझ्या चंद्र येतो
तू इथे नाहीस ही जाणीव देतो...

उमलण्याची आसही कोमेजलेली
तू नको येऊ वसंता, मी असेतो...

मेघ तो ! त्याला किती केली मनाई
जोडतो मातीसवे नाते नवे तो...

कोरडा हा जन्म गेला आसवांनो
यायचे नाहीच का डोळे भिजेतो ?...

ओळखीचे भैरवीचे सूर आले
संपली मैफल तुझ्या तारा जुळेतो !...

■

## वृत्त–विद्युन्माला

भेटू या, पण भेटीनंतर
डोळे ओले झाले तर ?...

ह्या झुळ्‌कीने सांगितले ते
सर्वांनाच कळाले तर ?...

शब्दांना जे जमले नाही
ते ओठांना आले तर ?...

अंधाराचे रेशिम जाळे
रंगामध्ये न्हाले तर ?...

स्पर्शामागे वेडे पक्षी
देहातून उडाले तर ?...

आहे ना उत्तर एखादे
काही लोक म्हणाले तर ?...

झोकुन देऊ या का दोघे
ते आयुष्य मिळाले तर ?...

■

## वृत्त–मंजुघोषा

ये पुन्हा तू घाव घालाया जिव्हारी
तू दिलेल्या वेदनेलाही खुमारी...

डाव सारे जिंकले तू एकट्याने
राहुनी गेली कशी माझी उतारी...

चोरुनी सारी कुणी नेलीत स्वप्ने
हा दरोडा घातला तोही दुपारी...

वादळाने गुप्त कारस्थान केले
नाव माझी बापडी होती किनारी...

काल शस्त्रावीण ज्याने वार केला
ओळखू आला कसा नाही शिकारी ?...

जन्म रेतीसारखा वाहून गेला
काय मी देऊ कुणाला, मी भिकारी !...

रंग होता, गंध होता त्या फुलांना
जीव जातांना कळाले, ती विषारी !!...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

तू बघायास ये सूर आले घरी
गोठुनी राहिल्या संगिताच्या सरी...

स्पर्श–रोमांच ते आठवीता तुझे
रोज संवादिनी होतसे बावरी...

पंचमाला नसे साथ देण्या कुणी
षड्ज खोळंबला दोन तारांवरी...

थांबल्या रागिण्या दाद घेण्या तुझी
स्तब्ध केदार अन् मूक आसावरी...

दाटले दु:ख हे मैफलीच्या मनी
रंगणे का खरे रंग गेल्यावरी ??..

■

## वृत्त–जलौघवेगा

मुळी न केला विचार तेव्हा
खुशाल केला करार तेव्हा...

नकोच होता घडावयाला
घडून गेला प्रकार तेव्हा...

अशी कशी हारले कळेना
न खेळताही जुगार, तेव्हा...

जपून मी ठेविला मनाशी
दिलास जो तू नकार तेव्हा...

मला खरे वाटलेहि होते
तुझे बहाणे हुशार तेव्हा...

घडू नये ते घडून गेले
गुन्हे तसे दोन–चार तेव्हा...

तुम्ही विचारू नका खुशाली
तुम्हीच केलेत वार तेव्हा...

मला हवा तो दिसे न तारा
नभात होते हजार तेव्हा...

अधोगतीला न अंत आता
असा मिळाला उतार तेव्हा...

अजूनही कंप पावते ती
तुवा स्पर्शिली सतार तेव्हा...

तुझ्याकडे यायचेच आहे
नसो तुझे बंद दार तेव्हा...

इथून नेईल ज्या क्षणी तो
म्हणेन त्याला उदार तेव्हा..!

■

## वृत्त–लज्जिता

चांदणे गर्भरेशमी होते
त्या क्षणी एकटीच मी होते...

प्रेम कोमेजले तुझे का रे
काय ते फूल मोसमी होते...

नाव उच्चारले न केव्हाही
ओठ माझेहि संयमी होते...

स्वर्ग येईल वाटले हाती
एक वेड्या भ्रमात मी होते...

आज उद्ध्वस्त पाहिले जे तू
त्या घराचीच भिंत मी होते...

श्वास शिक्षा म्हणून घेते मी
का गुन्हेगार फक्त मी होते...

जन्म अद्याप हाय संपेना
तू दिले दुःख ते कमी होते ...!

■

## वृत्त–मृगा (स्वकृत)

तुझे हे वागणे नाही बरे
मनाचे शोधिशी तू कोपरे...

कशाला आरसा याला म्हणू
तुझे त्यातील खोटे चेहरे...

कसे होते तुझे ते शब्दही
जिवाला पाडुनी गेले चरे...

अता हे हुंदके ही आसवे
जिवाचे सोबती अन् सोयरे...

वसंताची पुरेशी यादही
फुलांना वाटते आहे बरे...

कसे सोडून जाऊ गाव हे
मला देतात हाका उंबरे...

नभा तू बोल, काही बोल ना
कुणी केले दिशांचे पिंजरे ?...

■

## वृत्त–मंजुघोषा

दान अश्रूंच्याकडे जा, माग आता
पेटले आयुष्य सारे जाग आता...

चांदणे उधळून गेला कैकदा जो
राहिले चंद्रावरी त्या डाग आता...

ना दिली फांदी तुझ्या घरट्यास कोणी
राहिली नाही तुझी ही बाग आता...

द्यायचे जे सर्व ते देऊन झाले
कोणता अद्याप बाकी त्याग आता...

पाहिले ना, काय झाले त्या फुलांचे ?
तू जरा काट्यांप्रमाणे वाग आता...

त्या घरांची, ह्या मनांची बंद दारे
सोडूनी हे गाव चालू लाग आता...

■

## वृत्त–कलिंदनंदिनी

मनी असो नसो इथे रहायचे कसेतरी
सुरू म्हणून स्पंदने जगायचे कसेतरी...

ऋतू असो नसो फुला, तुझा स्वधर्म पाळ तू
गळोत सर्व पाकळ्या फुलायचे कसेतरी...

अनावरून दाटले गळ्यात हुंदके जरी
मिटून ओठ घ्यायचे हसायचे कसेतरी...

उदास दिल् रुबा तुझा तुटून तार तार ही
उरी भरून कंपने जुळायचे कसेतरी...

वल्ही न राहिली करी फुटे तशात नावही
तरीहि पैल येइतो तरायचे कसेतरी...

■

## वृत्त–मंजुघोषा

राहिले आहेच आता काय हाती
चंद्र पाऱ्याचा कशाच्या चांदराती ?...

कोपलेल्या सावलीचा शाप होता
कोरडे आभाळ, खाली तप्त माती...

छेदुनी गेली उभे आयुष्य, काळा
कर्वतीची ती तुझी निष्ठूर पाती...

दु:खही व्हावे कशाला तोडतांना
जोडली होती किड्यांशी क्षुद्र नाती...!

रोज मी माझा बळी देते तमाला
रोजची पेटे चिता माझी प्रभाती...!

■

## वृत्त–देवप्रिया

माणसांचे रान, येथे राहणे आता नको
सर्व काटेरीच वाटा चालणे आता नको...

वाळवंटी शोधिली का मी सुखाची सावली
व्यर्थ अंगारावरोनी धावणे आता नको...

लाख अश्रू लाभले एका स्मिताच्या सोबती
चिंब झाले ओठ त्यांचे हासणे आता नको...

दूर त्या आकाशवेली दूर ती ताराफुले
हे असे आभासवाणे चांदणे आता नको...

तार माझ्या जीवनाची कोठवर वाजायची
सोसुनी आघात हे झंकारणे आता नको...

■

## वृत्त–आराधना

जे रोखले ओठांवरी
जाणेल का कोणीतरी ?...

वाहून गेला जन्म हा
काळा, तुझ्या वेड्या सरी...

यावे कुणी कोणाकडे
दोघांमधे आहे दरी...

उंचीवरी ते पोचले
माझी तळाची पायरी...

कोणास नाही भूक अन्
कोणास नाही भाकरी...

माझ्याच आले सान्त्वना
हे लोक मी मेल्यावरी !!...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

भूतकाळा कधी हाक मारू नये
दूर गेल्या सुखाला पुकारू नये...

गाव ज्याचे वसे कंटकाच्या वनी
वाट त्याने फुलांना विचारू नये...

हे उम्हाळे, उसासे, उदासीनता
दान हे प्रीतिचे, हे झुगारू नये...

वेदनेच्या पुढे रंग सारे फिके
वेदना आसवांनी चितारू नये...

मेघ येतातही, मेघ जातातही
रे मना, तू पिसारा फुलारू नये...

■

## वृत्त–राधा

फाडला माझा सुखाचा चेहरा कोणी
हा दिला दु:खास माझ्या हादरा कोणी...

मी मनाच्या सावरू आता कशा भिंती
वादळा, येथे दिला तुज आसरा कोणी...

शेवटी निर्माल्य व्हावे का कळीचेही
का फुलांचा पारखी नाही खरा कोणी...

ह्या गजांनाही अता येते दया स्त्रीची
निर्मिलेला रूढिचा हा पिंजरा कोणी ...

वेळ आली वाल्मिकीने जन्म घेण्याची
विंधिले आहे मुक्या रत पाखरा कोणी...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

नवा डाव मांडू नवे आण फासे
नको कालच्या हारण्याचे खुलासे...

पुन्हा रोप लावू पुन्हा रक्त शिंपू
कशाला हवे त्या ऋतूचे दिलासे...

अता दु:खही दर्वळू दे सुखाने
जसे केवड्याचे सुगंधी उसासे...

पुन्हा रिक्त प्याल्यात चैतन्य ओतू
कधीचेच, तेही उदासीन प्यासे...

अता मागती ओठ ते त्यास देऊ
पुरे खिन्नता, ये हसू या जरासे !...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

जरूर तेव्हा तुला ओठ हे शिवता यावे
जरूर तेव्हा त्या ओठांना हसता यावे...

हव्याहव्याशा ऋतूस नाही म्हणता म्हणता
जरूर तेव्हा केव्हाही मोहरता यावे...

जलापरी रंगाशी व्हावे एकरूप अन्
अळवावरच्या थेंबासमही ढळता यावे...

कळीसारखे लेवुन घेता यावे अश्रू
फुलासारखे सुकतांना दरवळता यावे...

जशी रवीची तशी असावी अलिप्त वृत्ती
प्रकाश देउन झाल्यावर मावळता यावे...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

जुन्या वेदनांचा असा रंग ओला
नवी आसवे ओल देती कपोला...

किती ओठ हे शब्दवेल्हाळ होते !
अता काय झाले, छळी हा अबोला...

किती काळही बेहिशोबी झुलावा
कुठे पोचला टोक गाठून दोला...

इथे गच्च झोळीत काटेच काटे
अता ह्या फुलांना कुठे ठेवु, बोला !...

विझू वाटते ह्या चितेलाहि आता
पुन्हा अश्रुनो, मुक्त भांडार खोला...

■

## वृत्त–प्रमाणिका

असेच नित्य का घडे ?
नवीन रोज साकडे !...

खरेच भग्न चेहरा
कि आरशास ह्या तडे ?...

खऱ्यास लाज भीड अन्
फिरे असत्य नागडे !...

मिळेल स्वस्त मृत्युही
इथे महाग लाकडे !...

कळे न, की उमेदिने
बघायचे कुणाकडे ?...

■

## वृत्त–देवप्रिया

सोबती अंधार हा सर्वाहुनी आहे बरा
चांदणे नाही खरे अन् चंद्रही नाही खरा...

ध्यास गंधाचा खुळा तू सोड ना आतातरी
मानिले होतेस वेडे, तेरड्याला मोगरा !...

उच्च तो प्रासाद त्याच्या अंगणीचा केर तू
प्राक्तनी ना अन्य काही फक्त त्याचा कोपरा...

कल्पनेचे खेळ सारे, वंचना आहे खरी
तूच हे समजावुनी जा ह्या मनाला, ये जरा...

सांगु दे आता मलाही, सांगते आहे खरे
हासणे खोटेच माझे आणि खोटा चेहरा !...

■

## वृत्त–मंजुघोषा

ओळखू शकले न मी ह्या माणसांना
दूरच्यांना, जवळच्यांना, आपल्यांना...

शीण येतो जीवनाला झेलतांना
सोसतांना, लपवतांना, हासतांना...

पाहिली माझीच स्वप्ने रोज ऐशी
उमलतांना, बहरतांना, संपतांना...

हे नव्हे दंव ! आसवे माझी दिली मी
ह्या कळ्यांना, पाकळ्यांना अन् फुलांना...

जिद्द नाही संपली अद्याप माझी
झुंजतांना, हारतांना, झुंजतांना...

■

## वृत्त–मंजुघोषा

जीवनाचे तेच रस्ते नेहमीचे
भेटले ते दु:ख होते ओळखीचे

वादळाला मी दिले होते जपाया
पारदर्शी स्वप्न माझे सावरीचे...

उन्मळाया लागला जो वृक्ष आता
काय त्याला कोवळ्या त्या पालवीचे ?...

चंद्र आकाशा तुझा आहे परन्तू
चांदणे नाही कुणाच्या मालकीचे...

मैफलीचा तो कुठे आरंभ होता
सूर आले आतुनी का भैरवीचे ?...

■

## वृत्त–देवप्रिया

भाबड्या दु:खास माझ्या लोकहो, हासू नका
सान्त्वना देऊन खोटी आसवे नासू नका...

कोण सहभागी खरा होतो कधी दु:खामधे
शब्द हे बोथट, फुकाच्या लेखण्या तासू नका...

राहु द्या ह्या फत्तराचा मूळचा सच्चेपणा
हा असा शेंदूर त्याला सारखा फासू नका...

वाढणारी हाव आता थांबवा कोठेतरी
हातिचे सोने पुन्हा परिसावरी घासू नका...

जा चला, विज्ञान-यानातून जेथे जायचे
हा कवींचा चंद्र तुम्ही मात्र अभ्यासू नका...

■

## वृत्त–द्वियोधा

सांग आता मना
कालच्या वेदना...

जीवघेण्या किती
सोसल्या यातना...

प्रीतिच्या आडुनी
भेटली वंचना...

का शिळेअंतरी
जागती भावना ?...

व्यर्थ जावो, तरी
चालु ते अर्चना !...

झीज होते, तसा
गंध ये चंदना...

जन्म संपेलही
प्रीतिला अंत ना ...!

■

## वृत्त–लज्जिता

शब्द हे भांडलेत ओठांशी
आणिती दु:ख ते चव्हाट्याशी...!

जन्म गेला तरीहि संपेना
मागणे सावली उन्हापाशी...

आणिले दैव तूहि चंद्राचे
तूप–रोटी मधे तुझ्या माशी ...!

अस्मिता रांधते बिचारी स्त्री
ढाळिते आसवे चुलीपाशी...

सागरा, मी तुलाच भेटाया
जाहले एक ह्या प्रवाहाशी...

हा असे सूळ खास सोन्याचा
जा सुखाने अता जिवा, फाशी ...!

■

## वृत्त–स्त्रग्विणी

काय काळोख हा दूर होऊ नये ?
सूर्य आले तरीही उजाडू नये ?...

ही भुकेली प्रजा गर्जते 'जै' जरी
लाल किल्ल्यासही दु:ख वाटू नये ?...

पाच वर्षांत जे एकदा भेटती
प्रश्न त्यांना करोनी सतावू नये !...

ही गरीबी कधी ना कधी जायची
प्राण गेला तरी धीर सोडू नये !...

लोकहो, दातही ओठही आपले
लोकराज्यात तक्रार सांगू नये !...

■

## वृत्त–मंजुघोषा

वादळाचा जीवघेणा डाव आहे
आणि माझी कागदाची नाव आहे ...

जाणते मी, हा खरा आनंद नाही
फक्त दु:खाचा नवा पेहराव आहे ...

आज ओठांनो, बळे आणाच हासू
हासुनी लपवायचा हा घाव आहे ...

वेगळा त्यांना हवा आहे बगीचा
कंटकांचा घातकी प्रस्ताव आहे ...

घुस्मटाया लागली ही गझल आता
न(व) कवींचा भोवती घेराव आहे ...

■

## जाति–भूपती

डोळ्यात सावल्या किती जणांच्या होत्या
आता न आठवे कुणाकुणाच्या होत्या...

नाहीच भेटलो, दुरावलोही नाही
त्या गाढ ओळखी जुन्या खुणांच्या होत्या

हा फुले मोगरा जखमांचा आताही
केसात माळल्या कळ्या व्रणांच्या होत्या...

मी जात राहिले उन्हात चंद्रासाठी
पायात शृंखला मणामणांच्या होत्या...

स्वप्नात रंगते अजून वेडी माती
सूर्यास झालरी तिच्या तृणांच्या होत्या...

■

## वृत्त–कलापती

हास लाजऱ्या फुला अजून एकदा
दे सुगंध आपुला अजून एकदा...

अंगणात ये हळूच श्रावणा, पुन्हा
रिमझिमायचे तुला अजून एकदा...

सप्तरंग रेखुनी कमान अंबरी
बांधतील ना झुला अजून एकदा ?...

पालवेल गीत आज ते पुन्हा नवे
श्वास जाहला खुला अजून एकदा...

जीवना, तुला पुन्हा 'तसे' फुलायचे
हा वसन्त घे तुला अजून एकदा !...

■

## वृत्त–मृगाक्षी

पुन्हा केले उभे मी ह्या घराला
कुणी जाऊन सांगा वादळाला ...

अता उद्ध्वस्त होण्याची न भीती
अता उद्ध्वस्त केले मी स्वताला...

पहा, करपून हे उद्यान गेले
वसंता ऐवजी वणवाच आला ...

मनाचे कापले मी पंख जेव्हा
खुली झाली दिशांची बंदिशाला...

सुखाची सावली येणार नाही
तिने धिक्कारले ह्या अंगणाला ...

अशी केली जळायाची तयारी
नव्याने घेतली प्रीती उशाला !...

■

## वृत्त–देवराज

मी कशी ऋतूस ह्या पुन्हा पुन्हा क्षमा करू ?
म्लान जाहल्यावरी कशी फिरून मोहरू ?...

मंद प्राण शेवटी विझावयास लागले
सांग तूच ह्या क्षणास धीर मी कसा धरू ?...

आग सोसली सदैव साहिला विखार मी
पेटले जिवंतही, अता चितेस घाबरू ?...

जाउ दे, पहा किती क्षितीज दूर राहिले
पंख कापल्यावरी कसे उडेल पाखरू ?...

डोह खोल खोल हा गिळावयास लागला
हात चालले सुटून...तोल काय सावरू ?...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

आठवे ते तुझे मोकळे हासणे
भासते भोवती सांडले चांदणे...

मूक डोळे तुझे सांगती काहिसे
सांग शब्दातुनी हे पुरे लाजणे...

ये, फुलू, दर्वळू, गंध गोळा करू
ह्या ऋतूची तुला खास आमंत्रणे...

वेळ गेल्यावरी येत नाही पुन्हा
सांगशी रोज का नवनवी कारणे ...

निर्णयाची तुझ्या काय घाई करू ?
'और' देई 'मझा' वाट हे पाहणे !...

■

## वृत्त–मंजुघोषा

का अशा दु:खात झाल्या चूर वेली ?
का ऋतूची पालखी येथून गेली ?...

मी कशी स्वप्नांवरी आता विसंबू ?
काल स्वप्नांनीच माझी झोप नेली...

ठेविला अंधार मी माझ्याच पाशी
चांदण्याची रोज अन् खैरात केली ...

कोणता यात्री इथे राहून गेला
कोसळाया लागली आहे हवेली...

व्यर्थ आता शोधणे माणूसकीला
काळ झाला खूप, ती मागेच मेली ...

लक्ष्मीला देवता मानायचे का
जाहली ती आज चोरांची रखेली !...

■

## वृत्त–मृगाक्षी

उन्हे माझ्याच आली सावलीला
जरासे चांदणेही सोबतीला ...

पुन्हा ठोठावती हे सूर दारे
जरी नाकारले मी ओळखीला...

सुखाचा शोध घेणे व्यर्थ होते
सदाचे दुःख होते पाळतीला ...

मिलिंदाने तिला उद्ध्वस्त केले
कुणी सांभाळले नाही कळीला ...

किती छिद्रे उरी झाली तरीही
इथे गावेच लागे बासरीला ...

■

## वृत्त–लज्जिता

त्या फुलांना झुगारलेले मी
हे निखारेच माळलेले मी ...

द्यायची ती सजा मला द्यावी
ह्या ऋतूंना दुखावलेले मी ...

थंड होते तुझे इशारेही
राख होण्यास पेटलेले मी ...

संपले वेड कालचे सारे
बंध ते आज तोडलेले मी...

बोलणी थांबवा तहाची ही
युद्ध आता पुकारलेले मी...

तो शिळा सूर्य तू नको आणू
ह्या नभाला बजावलेले मी...

मृत्युच्या स्वागतास श्वासांचे
शामियाने उभारलेले मी !...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

पुन्हा एकदा झुंजण्याचा इरादा
तुला जीवना, जिंकण्याचा इरादा...

असो जीव पंखात किंवा नसू दे
परी पिंजरे तोडण्याचा इरादा...

कडेलोट होता, तिथे वाट आली
उडी हिरकणी टाकण्याचा इरादा...

फुले माळण्याची मनी ना मनीषा
ऋतूला अता टाळण्याचा इरादा...

उरी स्निग्धतेचा झरा आटलेला
अता कोरडे वागण्याचा इरादा...

निवाली जरा राख माझी उद्या की
पुन्हा त्यातुनी जन्मण्याचा इरादा !...

■

## वृत्त–मंजुघोषा

कोणतीही रात्र आता धुंद नाही
रातराणीच्या कळ्यांना गंध नाही...

तू मला देऊ नको अनिवार हाका
तोडणे सोपे जुने हे बंध नाही...

गुंफले नाही तुझे मी नाव, ऐसा–
काळजाचा कोणताही स्पंद नाही.

एकमेकांवाचुनी जगणे शिकूही
जीवनी तैशा परी आनंद नाही...

तूच ना उरलास जर काव्यात माझ्या
कागदी सुम ते, जिथे मकरंद नाही !...

■

## वृत्त – मेनका

जीवनाला दान द्यावे लागते
श्वास संपेतो जगावे लागते...

दर्वळाया गंध प्रीतीचा इथे
काळजाला कुस्करावे लागते...

म्लान झालेली फुले पाहूनही
आसवांना मोहरावे लागते ...

गीत ही शब्दासुरांची पालखी
त्यात दु:खाला सजावे लागते...

बांधण्याला ही उजेडाची घरे
कैक ज्योतींना जळावे लागते...

पेरल्या ज्यांनी सुरुंगाच्या लडी
दोस्त त्यांनाही म्हणावे लागते...

चंद्र जेव्हा मावळाया लागतो
प्रेत स्वप्नाचे पुरावे लागते !...

■

## वृत्त–धवलचंद्रिका

हारण्या नवीन एक डाव पाहिजे
साकळे जुना, नवीन घाव पाहिजे ..१

फत्तरासही फुटू शकेल पालवी
आसवात तेवढा प्रभाव पाहिजे ...२

लीडरीस देशप्रेम लागते कुठे ?
पाठिशी स्वजातिचा जमाव पाहिजे ...३

तार जीवना, तुझी सुरेल वाजण्या
योग्य तेवढा तिला तणाव पाहिजे...४

पाय चालतील हे अनंतकाळही
शेवटी परी तुझेच गाव पाहिजे ...५

काम तू करून जा असे महान की
ह्या जगात राहिलेच नाव पाहिजे ...६

दु:ख हेच एकमेव सत्य जीवनी
त्यातही हसायचा सराव पाहिजे ...७

अंधकार संपणार आज वा उद्या
फक्त एक ज्योतिचा उठाव पाहिजे ...८

भिंत वाचण्यास, जी खचून चालली
प्रीतिचा तळामधे भराव पाहिजे ...९

■

## वृत्त–देवप्रिया

अंतरी ह्या चांदवा ठेवून जा कोणीतरी
अन् प्रकाशाची फुले उधळून जा कोणीतरी...

कोणत्या तंद्रीत हे आयुष्य सारे संपले
ते ऋतू येतील का सांगून जा कोणीतरी...

सागरा, तू निर्मिल्या साऱ्या ढगांना सांग तू
कोरडे गेले, अता बरसून जा कोणीतरी...

माळरानी येथल्या एकांत आहे वाजतो
सूर ह्या मातीमधे पेरून जा कोणीतरी ...

■

## छंद–अष्टाक्षरी

माझ्या सुरांचे गाऱ्हाणे
कुणा ऐकवावे गाणे ?...

जो तो भाकरीच्या मागे
कुणा ऐकवावे गाणे ?...

भोती बाजारी गल्बला
कुणा ऐकवावे गाणे ?...

जिवाभावाचे न कोणी
कुणा ऐकवावे गाणे ?...

नाही चंद्रही आभाळी
कुणा ऐकवावे गाणे ?...

तुला भेटता कळाले
कुणा ऐकवावे गाणे !...

■

## वृत्त–मृगाक्षी

जरी ह्या जीवनाचा राग आहे
तरीही श्वास घेणे भाग आहे ...

म्हणो संजीवनी प्रीतीस कोणी
जिवाला जाळणारी आग आहे...

जरी ह्या भावना संपून गेल्या
तरी कर्तव्यतेला जाग आहे...

मुळांनी गाडले आहे स्वत:ला
फुलांसाठीच त्यांचा त्याग आहे ...

कुणी राहू नये गर्वात खोटचा
इथे सूर्यावरीही डाग आहे !...

■

## वृत्त–मंजुघोषा

दे जरा आकाश आता मावळाया
सूर्य माझा लागला आहे ढळाया ...

आणिली कोणी पुन्हा स्वप्ने जुईची
जीव त्या गंधामुळे लागे जळाया...

ओवले धाग्यात जे तेव्हा सुखाच्या
आज तेही दु:ख लागे ओघळाया...

मौन आहे पाळलेले का तुम्हीही
अर्थ त्याचा लागला आहे कळाया...

घाव कोणी घालण्याची काय घाई ★
भिंत ही आलीच आहे कोसळाया !...

■

★ श्रुतयोजन

## वृत्त–वीरलक्ष्मी

गीत व्हावे कसे बोलके
शब्द देती मुके हुंदके...

पापणीतून ओंसडती
वेदनेची नवी अर्भके !...

भार होतो, कसे बाळगू
हे स्मृतींचे जुने बोचके...

ने कुठेही मला वादळा,
क्षुद्र मी पान जे वाळके...

मी कशी संपवू जन्म हा
काय दु:खा करू पोरके ?...

■

## वृत्त–आराधना

हे दु:ख सोसाया नवे
दे सागरा, दे आसवे..

ह्या जीवनाने मारले
भांडायचे कोणासवे...

पक्षी सुखाचे कालचे
गेले कुठे त्यांचे थवे ?...

ते राहु दे तारे तुला
मी घेतले हे काजवे ...

हंगाम हा आला कसा
वाळून गेले ताटवे ...

थोडीच दे जागा मला
केली नभाची आर्जवे...

मी आजही आहे तुझी
हे काय सांगाया हवे ?...

■

## वृत्त–मेनका

जीवनाने तार जेव्हा तोडली
मी सुरांची साथ तेव्हा सोडली...

जाहले तारुण्य जखमी त्यामुळे
शैशवाने खेळणी जी फोडली...

प्रीतरेखा कोरुनी भाळावरी
ओळ दैवाने पुन्हा ती खोडली...

शब्दरूपाने उफाळुन वाहती
आसवांनी शपथ माझी मोडली ...

त्या विधात्याने अशा केल्या चुका
घोंगडीला पैठणी का जोडली ?...

■

## वृत्त–मंजुघोषा

सोसतांना हासण्याचा प्रश्न होता
चेहरा सांभाळण्याचा प्रश्न होता...

ह्या हवेला मी कशाला गंध मागू ?
श्वास चालू राहण्याचा प्रश्न होता ...

बंद ओठांनी सजाही मान्य केली
जे खरे ते सांगण्याचा प्रश्न होता ...

जीवनाने भीक होती देउ केली
अस्मितेला सोडण्याचा प्रश्न होता...

दु:ख वा आनंद दोन्ही एक अंती
जे हवे ते मानण्याचा प्रश्न होता...

वादळाने मोडले नसते मलाही
फक्त थोडे वाकण्याचा प्रश्न होता...

चंद्र हाती झाकणेही शक्य होते
मात्र त्याच्या चांदण्याचा प्रश्न होता...

■

## वृत्त–संगीता (स्वकृत)

जे जे लाभले होते
ते ते सोसले होते ...

एकाकी किती रात्री
तारे मोजले होते ...

आशांनी खुळ्या जीवा
नादी लावले होते...

ओठांचा गुन्हा थोडा
डोळे बोलले होते ...

प्रीतीच्या जुगारी ह्या
कोणाचे भले होते ?...

हाती हात घेतांना
हेतू चांगले होते ...

तो आला पुन्हा तेव्हा
सारे संपले होते !...

■

## वृत्त–मृगाक्षी

जगायाचे कशाला कोण जाणे
नवे शोधू कसे आता बहाणे ...

किती मी सोडवावे जीवना रे
तुझे हे रोजचे ना ना उखाणे...

कुणाशी प्रीतिचा सौदा करावा
कसे सर्वांकडे खोटेच नाणे ...

अता ही स्पंदने मंदावलेली
अता हे श्वास झाले दीनवाणे...

नको ह्या फाटक्या जन्मास टाके
निकामी वस्त्र हे झाले पुराणे !...

■

## वृत्त–मंजुघोषा

कोणते नाते, कशी जवळीक होती
प्रेम ते होते तुझे का भीक होती ?...

गीत माझे एकही रुजले न कोठे
का अशी सारी मने नापीक होती ?...

साहिली, केलीस ती सारी उपेक्षा
प्रीत माझी केवढी सोशीक होती !...

ढाळिले तारे तिनेही आसवांचे
रात्र माझ्यासारखी खर्चीक होती ...

नाव माझी भंगली तेव्हा कळाले
वादळाशी दुरुन मैत्री ठीक होती !...

■

## वृत्त–लज्जिता

दूर आभाळ मोकळे होते
पंख माझेच पांगळे होते ...

लाविली वेल जीवनाची मी
आसवांचे जिथे तळे होते ...

रंग होता जरी फुलापाशी
भोवती लोक आंधळे होते ...

भेटलो तू नि मी अशा जागी
मार्ग जेथून वेगळे होते ...

कैद झाल्यावरी कळाले की
गोड शब्दात सापळे होते...

प्रेम–धाराच जाहली राधा
अंतरी रूप सावळे होते !...

■

## वृत्त–जलौघवेगा

दुरावलेला वसंत आहे
तरी पहा मी जिवंत आहे...

कितीक देणी अजून बाकी
मनात ही फक्त खंत आहे...

अता जरा भेटु या सुखाला
अता जराशी उसंत आहे...

कधी निराशा न पाहिलेला
असा कुणी भाग्यवंत आहे ?...

नवीन पंखात जोम जेथे
तिथे नवा आसमंत आहे ...

कधी न कोणास गवसणारे
क्षितीज बेटे अनंत आहे !...

किड्या–मकोड्यासमान कोते
जिणे कुणाला पसंत आहे ?...

जगून घे मनमुराद, मित्रा,
क्षणैक हा नाशवंत आहे !...

■

## जाति–कमलचर्या

धडे जीवनाने शिकावेत कुठवर ?
नवे प्रश्न मी सोडवावेत कुठवर ?...

विषाचे नवे घोट वाट्यास त्यांच्या
निळ्या अक्षरांना पचावेत कुठवर ?...

फुलेही वहावी नि खाव्यात ठेचा
असे देव दगडी पुजावेत कुठवर ?...

जिथे मेघ आला न येइल कधीही
नवे कोंभ तेथे रुजावेत कुठवर ?...

करावे रिकामे किती दु:ख–प्याले
नवी आस ओतुन भरावेत कुठवर ?...

सुखाच्या महालात आजन्म शिक्षा
घडे आसवांचे वहावेत कुठवर ?...

बघावे न काही, मिटावेत डोळे
स्वत:चेच मृत्यू बघावेत कुठवर ?...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

फक्त अश्रू–स्मितांचा जमाखर्च हा ★
जीवना, मी तुला पाहिलेही कुठे ?...

दूर गेले सखे–सोबती सोडुनी
हाक ऐकून ते थांबलेही कुठे ?...

कल्पनाचित्रही रंगवावे कसे ?
मी सुखाला कधी भेटलेही कुठे ?...

आपल्यांनी किती जुलुम केले, तरी
साहिले मूक ते, मोजलेही कुठे ?...

यायचे कोणते भोग आता पुढे
राहिलेही कुठे, संपलेही कुठे ?...

■

## मात्रा वृत्त–शुभगंगा

तुला स्मरावे नित्य म्हणुन हे कर, देवा ★
माझी झोळी दुःखांनी तू भर, देवा...

कोरी आणिक तलम मुलायम होती जी ★
आयुष्याची मळली ही चादर, देवा..

विटक्या पदरा ठिगळे लावित असतांना
मधेच चमके तुझ्या कृपेची जर, देवा...

तुझ्या प्रिय जनांना तू त्यांचे वांछित दे
माझा क्रम त्या सर्वांच्या नंतर, देवा...

तुझ्याच शाश्वत तेजाचा जर बिंदू मी
तुझ्या नि माझ्यामधे कसे अंतर, देवा...

जीवन म्हणजे फक्त मालिका प्रश्नांची
मृत्यु हेच का प्रश्नांचे उत्तर, देवा...

सरणावरती जळणेही मंजूर मला
वाचव मन हे, हे कवितेचे घर, देवा !...

■

---

★ श्रुतयोजन

## वृत्त–विद्युल्लता

का ज्योत जीवनाची जळते अजूनही
आशेत कोणत्या मी जगते अजूनही...

निसटून चंद्र गेला हातातुनी जरी
मी चांदण्यात त्याच्या भिजते अजूनही...

प्रेमात रंगते हे नभ आजही खुळे
पृथ्वीस भेटण्या ते झुकते अजूनही...

पाऊल वाजले की वाटे तुझेच ते
दारात येउनी मी फसते अजूनही...

आई, मला स्मरेना तो चेहरा तुझा
पण ऊब तू दिलेली पुरते अजूनही...

झाला सराव आता दु:खा हसायचा
का पापण्यात पाणी भरते अजूनही...

मागायची क्षमा मी, तूही करायची
चुकले कितीकदा अन् चुकते अजूनही...

वळणावरी मला तू गेलास सोडुनी
तेथेच मी मनाने असते अजूनही...

वेडे हरीण त्याला समजायचे कसे
शोधात कस्तुरीच्या फिरते अजूनही...

■

## वृत्त–देवराज

तू हवास अन् हवा तुझा प्रसन्न चेहरा
तू वसंत आणि तूच गंधमत्त मोगरा...

आस एक अंतरात भेट व्हायची कधी
दृष्टिभेटही पुरेल जीवनास आसरा...

येउनी तसा पुढेच जात राहशील तू
चुंबणार मी हळूच पावलातळी धरा...

मी जळातला तरंग, फक्त एक बुडूबुडा
मूर्तिमंत सत्य तू जगात फक्त तू खरा...

बंधनी रहायचे किती अजून काळ मी
तूच तोड पिंजरा नि सोड मुक्त पाखरा...

होउनी कठोर आज काय अंत पाहसी
माउली न ठेविते कधीच दूर लेकरा...

■

## वृत्त–आनंदकंद

सूर्यास्त पश्चिमेचा बघण्यात मौज आहे
सांजावले तरीही जगण्यात मौज आहे...

झाले अधीर मन हे भेटावया प्रियाला
थोडी परी प्रतीक्षा करण्यात मौज आहे...

देऊन गंध सर्वां आयुष्य सार्थ होते
त्या चंदना विचारा झिजण्यात मौज आहे...

आला जरी उन्हाळा अंगार ढाळणारा
गुल्मोहराप्रमाणे फुलण्यात मौज आहे...

होऊन लाट मोठी उत्तुंग झेप घ्यावी
नत होत सागराशी विरण्यात मौज आहे...

पानापरी अळूच्या नि:संग जन्म जावा
असुनी जगात साऱ्या नसण्यात मौज आहे...

■

## वृत्त – हिरण्यकेशी

तुम्हीच नेले खुशाल गाणे तुम्हीच हे सूर बंद केले
मला फुकाची सजा मिळाली तुम्ही पुरे मात्र छंद केले...

कुणा न माहीत आज नावे सुळावरी जे चढून गेले
खरेच ते देशभक्त ज्यांनी अनाम होणे पसंद केले...

कसे फुलाने तुटून जावे करावया पाठलाग त्यांचा
उगाच रुंजी करीत ज्यांनी पसार त्याचे मरंद केले...

कितीक जखमा दिल्यात तुम्ही कधीमधी जाळलेहि होते
तशातही मी जगावयाचे पुन्हा इरादे बुलंद केले...

अता नको येरझार तुमची प्रवेश नाही अता कुणाला
मलाच मी कोंडुनी मनाचे तळातले दार बंद केले !...

■

## वृत्त–मंजुघोषा

दिवस हा चाबूक अन् ही रात काठी
जन्म हा सरला असा ही खात काठी...

कोण म्हणते भावना ती मोरपीशी ?
पाहिली मी प्रीतिच्या हातात काठी...

मी सुधारिन ह्या जगा म्हटले मनाशी
व्यर्थ मारत राहिले पाण्यात काठी...

पाहता फांदी फुलांनी लगडलेली
भासते भावी तिचीही जात काठी...

वाटला आधार प्रेमाचा हवासा
शोधली होती तुझ्या रूपात काठी...

सोसणे अन्याय हाही दोष आहे
तूहि आता चालवी जोरात काठी...

■

## वृत्त–लज्जिता

जीवनाशीच खेळले होते
नेहमी मीच हारले होते...

शब्द सारेच तीक्ष्ण भाल्याचे
तूच मेल्यास मारले होते...

आरशालाहि दोष का द्यावा
बिंब रूपास भाळले होते...

काय आश्चर्य वीष झाल्याचे?
दूध सर्पास पाजले होते...

विस्तवाचेच नाव प्रीती का?
हात सारेच पोळले होते...

काय झाले न ठाउकी त्यांचे
दीप पाण्यात सोडले होते...

■

## मात्रावृत्त – अनलज्वाला

आता खरे तर जगायचा आला कंटाळा
उगाच वर वर हसायचा आला कंटाळा...

पुन्हा पुन्हा तो जलाशयाचा भास कशाला
मृगास आता फसायचा आला कंटाळा...

कशास कागद घेउन त्याची केली होडी
गटारभर तिज वहायचा आला कंटाळा...

कुणाकुणाशी नवीन नाती जोडायाची
सदा नव्याने तुटायचा आला कंटाळा...

तुझे नि माझे न वैर काही, ये रे मरणा,
पुन्हा पुन्हा मज मरायचा आला कंटाळा...

■

## वृत्त–लज्जिता (बदलून)

आज ते सूर आज गीत कुठे
तो जुना काळ आणि प्रीत कुठे...१

मोडला डाव तो पटावरचा
हार नाही परन्तु जीत कुठे...२

सोडले हात तेहि कायमचे
मीलनाची फिरून रीत कुठे...३

वेगवारा न सोसवे असला
गंध ठेवू फुलासहीत कुठे...४

पत्र तेव्हाहि वाचले नव्हते
सापडेना जुन्या वहीत कुठे...५

काचस्वप्नेच कालची फुटकी
खेळणी आज ती हवीत कुठे...६

मौज भिजण्यात वाटली परवा
आज ते चांदणेहि शीत कुठे...७

जीवनाच्या जमेस काहि नसे
वाळु उरतेच ओंजळीत कुठे...८

मूक गझलेत राहते लपुनी
दु:ख बसणार पालखीत कुठे...९

■

## जाति–कमलचर्या

नको बाग किंवा फुलाचे निमंत्रण
दिसे पैलचा तीर त्याचे निमंत्रण...

कधी अन् कुठे भेट त्याचीच मर्जी
सदा मृत्युला जीवनाचे निमंत्रण...

असे पाहुणे दु:ख माझ्या निवासी
कसे घेउ मी त्या सुखाचे निमंत्रण...

लुळे पांगळे पंख माझे तरीही
मनाला खुणावे नभाचे निमंत्रण...

करोडो जिवांना निवारा न कोठे
उभारा घरे हे उन्हाचे निमंत्रण...

मुळीही भरोसा न, येत्या क्षणाचा
कसे देउ कोणा उद्याचे निमंत्रण...

तुझ्या मैफलीला न बोलाविले तू
परी येत आहे सुरांचे निमंत्रण...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

पाणी पाणी सारखेच हे गमते पाणी
हे गोडे अन् ते खारे का असते पाणी...१

जिवंत जो त्याला बुडवी नेऊन तळाशी
निर्जीवाला उचलुन वरती धरते पाणी...२

मेघ दयेचा कधी होउनी करते सिंचन
कधी रौद्र रूपाने गावे लुटते पाणी...३

देत राहते किनाऱ्यास अडदांड तडाखे
निमूट डोळ्यामधे मुक्याने बसते पाणी...४
उंचावरुनी पडे परन्तू पतन नसे हे
उरात लपल्या विजा मोकळ्या करते पाणी...५

दोन जिवांच्या प्रेमाचे अप्रूप तयाला
असे जीव भेटताच तेथे मुरते पाणी...६

अहंकार थोडाही नाही पाण्याजवळी
तुम्ही रंग द्या, त्या रंगाचे दिसते पाणी...७

दुसऱ्याच्या दु:खाने जेव्हा झरते गाली
तेच खरे गंगेसम पावन ठरते पाणी...८

उचलुन घेते निराधार शैशवास कोणी
त्याच्या अश्रुत आनंदाने हसते पाणी...९

प्रलयाच्या रूपात येउनी एकच वेळा
पृथ्वीवरल्या प्रत्येका उद्धरते पाणी !...१०

■

## वृत्त–द्वियोधा + भाविनी

तू पुन्हा चांदणे पाठवू नको
ह्या तमाला असे लाजवू नको...

झेलते मी उन्हाच्या सरी शिरी
दूरचे मेघ तू दाखवू नको...

येत नाही ऋतू फक्त सांगतो
तू अवेळी अशी पालवू नको...

वाट अंधारली, पाय पांगळे
अंतरीचा दिवा मालवू नको...

वर्तमानासवे जायचे पुढे
मागचा काळ तू आठवू नको...

वर्ज्य सारे मृदू सूर ज्यातुनी
प्रीतिचा राग तू आळवू नको...

दु:ख त्यांचे तुझे एकसारखे
आसवे वाहु दे, थोपवू नको...

पैलतीरी अता जायचे मला
हाक देऊन तू थांबवू नको...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

जे तेव्हा केले ते आज करावे कैसे
फूलपाखरामागे आज पळावे कैसे...

पाने देती आडोसा कोवळ्या कळीला
पूर्ण फुलाने पानाआड दडावे कैसे...

ओघळते अश्रूही झाले फिक्कट आता
रंग जुन्या चित्रातुन आज भरावे कैसे...

जे जे शीतल तेही देई ताप मनाला
आरोपातुन चंद्राला वगळावे कैसे...

निरोपतांना मन राखावे कळे परंतू
मागतोस जे दान तुला ते द्यावे कैसे...

दंश विषारी सोसलेत निष्पाप मनाने
सापाला दोरी त्याने समजावे कैसे...

■

## वृत्त–मृगाक्षी

कुणासाठी अता हे गीत ओठी
खरी जी मानली ती प्रीत खोटी...
तुला जे धाडले ते पत्र नाही
दिले काळीज धाडुन त्या लखोटी...
कुणाला चंद्र चांदीचा रुपाया
कुणाला भासते ती पक्व रोटी...
कला श्रीमंत करते जीवनाला
परी हे चोचले भरल्याच पोटी...
जगू द्या स्त्रीसही माणुस म्हणोनी
करावी मान्य ही दरखास्त छोटी...
कुणीही आसरा देई न आता
फिरे रस्त्यातुनी वेडी सचोटी...
तिच्याही अंतरी स्फुल्लिंग आहे
जरी ती क्षुद्र साधी गारगोटी !...
पुन्हा आलिंगण्या ती लाट जाई
किनारा सारखा तिज दूर लोटी...
यमा, अद्याप मी का पास नाही
उभे आयुष्य ही होती कसोटी !...

■

## वृत्त–देवप्रिया

मी उन्हातुन चालतांना थांबले होते सहज
सुख तुझ्या रूपात तेव्हा भेटले होते सहज...

दूरचे आभाळ हाती लागले होते सहज
चांदणे वाटेवरी तू फेकले होते सहज...

हाक दूरातून जो कानावरी आली तुझी
आगिचे ओहोळ मी ओलांडले होते सहज...

आज ह्या शब्दास माझ्या का रडू फुटले असे
दु:ख त्या शब्दात आधी मावले होते सहज...

ज्या फुला चुर्गाळुनी अन् तुडवुनी गेले किती
तेच एका वाटसरुने तोडले होते सहज...

प्रीतिचा वर्षाव होता जे तळे ओसंडले
ऊन थोडेसेच येता आटले होते सहज...

■

## वृत्त–वियद् गंगा

जरा मी घेतला माझ्या जिण्याचा काल आढावा
असे वैराण होते ते कुठे काही न ओलावा...

मला तर शस्त्र घेण्याची मिळू नाही दिली संधी
पुन्हा ते जिंकले होते, गनीमांचा छुपा कावा !...

कुठे ते ध्येयवेडे अन् महात्मे आजला गेले
अता कोणास वाटेना पुन्हा हा देश जोडावा...

हवा शहरातली येथे मनाचे श्वास गुदमरती
मना वाटे पुन्हा जावे खुल्या परतूनिया गावा...

इथे कंटाळले सारे, न माणुस माणसा भेटे
अता दुसऱ्या ग्रहावरती नवा माणूस शोधावा !...

■

## वृत्त–मंजुघोषा

ठीक झाले भेटण्याचे रद्द झाले
मुखवट्यांनी बोलण्याचे रद्द झाले...

शब्द का जमतात आता व्यर्थ ओठी
जे मनी ते सांगण्याचे रद्द झाले...

तोडुनी दुखवू नका आता फुलांना
भावपूजा बांधण्याचे रद्द झाले...

न्यायही मोफत कधी मिळतो न येथे
ऐकले, अन् मागण्याचे रद्द झाले...

पोचल्या नाहीत पेट्या ऐनवेळी
राजसत्ता पाडण्याचे रद्द झाले...

त्या सभेला कोणिही आलेच नाही
मग शहीदां वंदण्याचे रद्द झाले...

■

## वृत्त–लज्जिता (बदलून)

मोजते राहिलेत श्वास किती
सांग उरला अता प्रवास किती...

पाठमोराच सूर्य ती बघते
रोजची सांज ही उदास किती...

जीव देऊ कुणाकुणावरती
मान ही एक, त्यात फास किती !...

दाह थोडाहि ना कमी झाला
द्यायचे चंद्र मी उन्हास किती...

अर्पिती लोक अश्रु आणि फुले
प्रेम लाभे जगी शवास किती !...

उठविले जीवनातुनी मजला
मित्रहो, घेतलात त्रास किती !...

मागुनी सौख्य का कधी मिळते?
कर्म ठरवीतसे कुणास किती...

जीवना, चेहरा तुझा फसवा
मृत्युचाही तुझ्यात भास किती !...

■

## वृत्त–आनंदकंद

दु:खा सरु दिले हे उपकार मानते मी
मजला मरू दिले हे उपकार मानते मी...

सोशीकतेस माझ्या नाही विरोध केला
अश्रू झरू दिले हे उपकार मानते मी...

मजला नकोच होते ते प्रेम दांभिकांचे
मज ठोकरू दिले हे उपकार मानते मी...

माझीच फुफ्फुसे अन् माझेच श्वास होते
मज वापरू दिले हे उपकार मानते मी...

बुडण्यापर्यंत साऱ्या मज यातना कळाव्या
तितके तरू दिले हे उपकार मानते मी...

हो ! मालकी जगाची तुमच्याकडेच आहे
मज वावरू दिले हे उपकार मानते मी !...

■

## वृत्त–मेनका

जाणवेना गारव्याची शिर्शिरी
वेदनेची केवढी जादूगिरी !...

अंतकाळी प्रेम हे देऊ नका
नेउ मी उपकार ओझे का शिरी?...

रिक्त आहे हृदय ज्यांचे ते तुला
शोधिती मशिदीत किंवा मंदिरी...

गंधपुष्पे कोठुनी आणायची ?
ही तुझ्या चरणी मनाची मंजिरी...

रे शिवा, आता पुन्हा हे द्वैत का
व्यर्थ गेली ना जिवा, हाराकिरी?...

■

## वृत्त–मंजुघोषा

ओठ शिवण्याचे कुठे शिकलीस, पोरी
उमलण्याआधीच का मिटलीस पोरी...

नवऋतू येता कळीचे फूल झाले
पाहुनी ते खिन्न का हसलीस, पोरी...

बोचले अंकूरही काटच्यांप्रमाणे
तू क्षमा करण्या तयां जगलीस, पोरी...

भाकरीची भूक जेव्हा आग झाली
मूक तू खिडकीतही बसलीस, पोरी

तान्हुल्या ओठी दुधाचे थेंब देण्या
आटवूनी रक्त तू झिजलीस पोरी...

हे 'दयाळू' जग अता आले म्हणाया
'घे चिता ही; नीज हो, दमलीस, पोरी' !!..

■

## वृत्त–मेनका

हे म्हणू की ते म्हणू की ते म्हणू?
तुज म्हणू पारा? कि वारा?... मन जणू!...

मोकळे झालेत धागे रेशमी
मी कसा हा गोफ नात्याचा विणू?...

जीवना, आलास तू गेलास तू
भ्रमर ये पुष्पास चुंबाया जणू...

निघुन ती गेलीत क्षणबाळे जरी
वाजती वाळे तयांचे रुणुझुणू...

सावलीही फक्त पायाखालती
ऊन माथी लागलेले रणरणू...

या सुरांनो, शब्द घेवोनी सवे
लागल्या जखमा मुक्याही गुणगुणू !...

शांति-समृद्धी हवी विध्वंस वा ?
मानवा, हाती तुझ्या आहे अणू !...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

कधीतरी हे मेघ जमावे माझ्यासाठी
मातीनेही गंध लुटावे माझ्यासाठी...

दोन तळी अश्रूंची भरली त्यात मजेने
चंद्राने विर्घळून जावे माझ्यासाठी...

प्रेमाने मज कवळुन घेण्या, जीवनलतिके,
कधीतरी तुज हात फुटावे माझ्यासाठी...

आकाशातिल आनंदाच्या हिंदोळ्यांनो,
ह्या बाजूने कधी झुलावे माझ्यासाठी...

श्वासांची पडतील फुले ही जिथे उद्याला
तिथे तुझे पाऊल असावे माझ्यासाठी...

■

## मात्रा वृत्त–शुभगंगा

तूच दिले ह्या जगण्याला संदर्भ नवे
नसतांनाही असण्याला संदर्भ नवे...

ज्योत खरी ज्यातून उफाळे वर ज्वाला
त्या ज्योतीच्या जळण्याला संदर्भ नवे...

खोल मुळांना सापडतो चैतन्य–झरा
त्या वृक्षाच्या फुलण्याला संदर्भ नवे...

पाउस घेउन येती जाती कैक ऋतू
स्नेहसरींनी भिजण्याला संदर्भ नवे...

जेव्हा कळते सागर देई जन्म तिला
त्या सरितेच्या वळण्याला संदर्भ नवे...

■

## वृत्त–विद्युल्लता

दु:खास सोसण्याची झाली अता सवय
ओठांस हासण्याची झाली अता सवय...

ने जीवना कुठेही मर्जी अता तुझी
धारेत वाहण्याची झाली अता सवय...

ना पाश ना कुणाची रेशीम बंधने
कोठे न गुंतण्याची झाली अता सवय...

का सांडतोस चंद्रा, हे स्निग्ध चांदणे
मज ऊन झेलण्याची झाली अता सवय...

वळणावरी कुठेही थांबू नका कुणी
मागेच राहण्याची झाली अता सवय...

■

## वृत्त–मंजुघोषा

जीव लावावा असे कोणीच नाही
प्राण गुंतावा असे कोणीच नाही...

पाकळ्या मिटल्याच राहू द्या कळ्यांनो,
गंध उधळावा असे कोणीच नाही...

झेलुनी सारी उन्हे देईल छाया
वृक्ष भासावा असे कोणीच नाही...

भेटले कित्येक, भेटुन दूर गेले
अश्रु तरळावा असे कोणीच नाही

रेशमी गाठी नको उकलू मनाच्या
बंध जोडावा असे कोणीच नाही...

रात्र अंधारून ह्या देशात आली
दीप जो व्हावा असे कोणीच नाही...

जीवनाचा क्रूस जो तो वाहतो, पण–
ख्रिस्त मानावा असे कोणीच नाही...

■

## मात्रावृत्त–शुभगंगा

जगणे आहे का ही जगण्याची थट्टा
श्वासांनी चालविली मरणाची थट्टा...

एक कवडसा दिसे सुखाचा, लुप्त पुन्हा
क्रूर असावी किति ही दैवाची थट्टा...

माझ्या माथी साऱ्या उल्का, आकाशा?
ही तर माझ्या सोशिक असण्याची थट्टा !

आनंदाच्या जल्लोषातच मग्न तुम्ही
विजयोत्सव? की माझ्या हरण्याची थट्टा...

शब्दांचे हे घोस जुन्या फांदीवरती
कविते, का ही माझ्या वठण्याची थट्टा ?

■

## वृत्त–मंजुघोषा

निसटते वाळू, क्षणाचा शोध घे तू
सरत आहे, जीवनाचा शोध घे तू...

भोवती हा काजळी काळोख आहे
त्यात आशेच्या ध्रुवाचा शोध घे तू...

विस्मृती वरदान हे आहे मनाला
विसर काटे अन् फुलाचा शोध घे तू...

बांधुनी भिंती न होते घर कुणाचे
पाडुनी भिंती घराचा शोध घे तू...

मंदिरे, गिरिजाघरे, मशिदी रिकाम्या
थांबुनी तव अंतराचा शोध घे तू...

फुंकले मातीतही चैतन्य ज्याने
त्या चिरंतन शाश्वताचा शोध घे तू...

■

## वृत्त–कलिंदनंदिनी

उगाच स्वप्न पाहते मनातल्या मनात मी
तुझी बनून राहते मनातल्या मनात मी...

तुझी बनून बासरी हळूच ओठ चुंबिते
स्वरामधून वाहते मनातल्या मनात मी...

सुगंध प्रीतिच्या सरी तुझ्या शिरीच शिंपिते
तुलाहि चिंब पाहते मनातल्या मनात मी...

मिठीत चूर मी तुझ्या अनंग अंग चेतवी
कळा सुखान्त साहते मनातल्या मनात मी...

अनोळखी नजर तुझी परी जिवास जाळते
नि आसवात नाहते मनातल्या मनात मी...

■

## मात्रावृत्त–शुभगंगा

जीवित राहू प्रीती–वचनांवर नक्की
भेटू या हे जीवन सरल्यावर नक्की...

ओठांवरती नाव तुझे, सांगेन जगा
तूच दिलेल्या शपथा सुटल्यावर नक्की...

बीजेची ती कोर उद्या येईल नभी
हे विरहाचे मेघ वितळल्यावर नक्की...

राखेतुनही अंकुरतिल स्वप्ने माझी
दुःखाचा हा वणवा विझल्यावर नक्की...

उरतिल मागे कवितांच्या रंगित शिंपा
अस्तित्वाची लाट परतल्यावर नक्की...

■

## वृत्त–व्योमगंगा

माणसांचे चेहरे मी पाहिले आहेत पुष्कळ
चेहऱ्यावरचे मुखोटे फाडले आहेत पुष्कळ...

जीव देणारे जिवाला पाहिले थोडे परन्तु
जीव घेणारेच स्वार्थी पाहिले आहेत पुष्कळ...

आज भेटायास तू आलास हे आश्चर्य नाही
श्वास त्यासाठीच मीही मोजले आहेत पुष्कळ...

हाय ! मानावे कसे की हा फुलांचा देश होता
आज हे तण आणि काटे माजले आहेत पुष्कळ...

सांगते, शीतल मनाला भासतो हा सूर्यही
चांदण्याचे कवडसे मी सोसले आहेत पुष्कळ...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

ह्या हृदयाच्या धडधडण्याचा काय भरोसा
नसानसांच्या थडथडण्याचा काय भरोसा...

आले महिने आणि कोरडे गेले महिने
मेघांच्या त्या गडगडण्याचा काय भरोसा...

वृक्षा, कुठवर डोळे लावुन वाट पाहशी
वीज ती, तिच्या कडकडण्याचा काय भरोसा?...

प्रीतीची ही जखम नको दुर्लक्षू बाई
ह्या जखमांच्या चिडचिडण्याचा काय भरोसा?...

पिंजऱ्यास आकाश म्हणावे श्रेयस्कर हे
पंखांच्या ह्या फडफडण्याचा काय भरोसा?...

■

## जाति–उद्धव

माझ्यासाठी इतके कर
माझ्या गीताला दे स्वर...

श्वासांच्या झोळीत रित्या
तू थोडीशी प्रीती भर...

जगणे माझे साथ तुझी
काळ्या वस्त्राकाठी जर...

सर्वस्वाचे दान असे
सोडुन जाशी वाऱ्यावर ?...

पाहू आता वाट किती ?
काळिज झाले रे कातर...

■

## वृत्त–संगीता (स्वकृत)

तेव्हा रंगले काही
आता यादही नाही...

वारा बांधता येतो
वाऱ्याला दिशा दाही...

दु:खे आप्त झालेली
कोणाला म्हणू 'नाही' ?...

अश्रूंची सदा वर्षा
साक्षी हे ऋतू साही...

सारी माणसे असुनी
कोणाचे कुणी नाही !...

■

## वृत्त–मृगाक्षी

जगायाचे कसे हा प्रश्न ज्याला
बघावे रोज वेलीच्या फुलाला...

किती सोपे कुणाचा जीव घेणे
पहावा जीव देवोनी जिवाला...

सुखाने कैद झाले प्राणपक्षी
तयांना देह प्यारी बंदिशाला...

जगी व्याख्याच न्यायाची अशी की
गुन्हे कोणी करी शिक्षा कुणाला...

सदा वनवास हा स्त्रीच्या नशीबी
कुणी सोडी, कुणी लावी पणाला...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

फुले म्लान झाली, कुणा काय त्याचे
धुळीला मिळाली, कुणा काय त्याचे...
घरांचा, जिवांचा तिने घास केला
अशी लाट आली, कुणा काय त्याचे...
गळी शैशवाच्या भुकेचेच ओझे
झुके ते अकाली, कुणा काय त्याचे
इथे भ्रष्ट आचार त्याला प्रतिष्ठा
गुणांना न वाली, कुणा काय त्याचे...
युवा शक्तिला योग्य आदर्श नाही
दिशाभूल झाली, कुणा काय त्याचे...
कुठे धिंड, कोठे बलात्कार – हत्या
अशी स्त्री–खुशाली, कुणा काय त्याचे...
कुणाच्या शहाला कुणाचा बळी हा
फसे देश गाळी, कुणा काय त्याचे...
करू साजरी आज स्वतंत्र्य–प्राप्ती
उद्या मान खाली, कुणा काय त्याचे...

■

## जाति–उद्धव

दु:ख न आता हरण्याचे
फासे उलटे पडण्याचे...१

पंख असुनही वेड उरी
काड्या गोळा करण्याचे...२

सात सुरांच्या बरसाती
राहुन गेले भिजण्याचे...३

कोणाचे नसते कोणी
बाकी आहे शिकण्याचे...४

आता वय ना उरलेले
प्रेमासाठी झुरण्याचे...५

जमले थोडे थोडेसे
दु:खालाही हसण्याचे...६

दुनिये, का सुख–दु:ख तुला
माझ्या असण्या–नसण्याचे...७

कळले सरता सरतांना
आयुष्याला भिडण्याचे...८

शोभादर्शी देइ धडे
तुकड्यातुनही जुळण्याचे...९

कवितेला मी शब्द दिला
वचन पाळले जपण्याचे...१०

मरणाचा उत्सव उरला
एकच कारण जगण्याचे...११

■

## वृत्त–संगीता (स्वकृत)

हे माझे?.... नव्हे माझे
हे ज्याने दिले त्याचे...

सारी वेगळी पात्रे
सारे वेगळे साचे...

तो ओढी जशा दोऱ्या
सूत्री त्यावरी नाचे...

चाके राहती फिरती
कोणा भान काळाचे?...

ह्या भंगूर आयुष्या
शाश्वत स्वप्न होण्याचे...

येतांनाच सांगे तो
घ्या आदेश जाण्याचे...

हाती हा तुझ्या पेला
अमृत तू भरायाचे...

■

## वृत्त–जलौघवेगा

उजेड आहे जगा कळू दे
तुझ्या मनीचा दिवा जळू दे...

तुझ्यातही पारिजात आहे
दशोदिशा गंध दर्वळू दे...

तमी ध्रुवाचा दिसेल तारा
तुझे सुकाणू तसे वळू दे...

रवी पुन्हा यायचाच आहे
भले, क्षितिज आज काजळू दे...

क्षणाक्षणाने जगून घे, मग–
हवे तरी श्वास ओघळू दे...

नवीन फांदी, नवीन घरटे
किती विजा आज कोसळू दे...

■

## वृत्त–मंजुघोषा

नवनव्या फुटल्या जरी वाटेस वाटा
बोचला प्रत्येक वेळी तोच काटा...

दु:ख माझे घेउनी आले कुठे हे
मांडले जेथे मला तोही चव्हाटा...

विखरुनी गेले कसे आयुष्य सांगू
कातळावरती जशा फुटतात लाटा...

ओढुनी काढू कसा तेही कळेना
अंतरी रुतलाच प्रेमाचा सराटा...

रमविताही येइना आता मनाला
फोल स्वप्नांना दिला केव्हाच फाटा...

तू नव्याने भेटता हे काय झाले
पूर्ण होता, त्या विरामाला फराटा !...

■

## जाति–उद्धव

करायचे ते आत्ता कर
तुझी न सत्ता काळावर... १

जगूनही जगला नाही
विसंबला जो स्वप्नावर...२

चुका कळेना कोणाच्या
फुटे कुणावरती खापर...३

फुलासही प्राक्तन टाकी
प्रभूपदी वा प्रेतावर...४

व्यथा न कोणा सांगावी
फुटेल का दगडा पाझर..?५

मनात वादळ राहु दिले
हवेच होते त्याला घर...६

कशास झाल्या त्या भेटी
दुरावयाचे होते जर...७

कुणी न आले वा गेले
केवळ आशेचा वावर...८

अजून ह्या जखमा ओल्या
हवी तुझी त्यावर फुंकर...९

कधी मला घेशील हृदीं
असह्य श्वासाचे अंतर !...१०

■

## वृत्त–जलौघवेगा

जगी रहाणे कसे असावे?
अनंत ठेविल तसे असावे...

उदार हस्ते खुशाल द्यावे
रिते रिते मग पसे असावे...

खरी खरी उमटतील रूपे
असे नवे आरसे असावे...

सुखी मनुष्याच्या सदऱ्याला
व्यथा लपाया खिसे असावे...

कलेविना जीवना न पूर्ती
मना कलेचे पिसे असावे...

जिथे जिथे मृत्युची हजेरी
तिथे पुन्हा बारसे असावे...

निघून जावे जगातुनीही
परन्तु मागे ठसे असावे...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

रिते न होते कधीच पेले, माझे जीवन
नव्या व्यथांनी भरून गेले, माझे जीवन

कधी न ल्याले, तसे नवे ते पडून होते
विरू दिले बासनात शेले, माझे जीवन...

थकून हे पंचप्राण गेले वाहुन ओझी
गुलाम ते पाच मूक हेले, माझे जीवन...

समुद्र होता चहूकडे पाणी अन् पाणी
करीत 'पाणी-पाणी' मेले, माझे जीवन...

भुके कुणी कावळे न होते पिंड शिवाया
तुटून पडले गिधाड, नेले माझे जीवन...

■

## मात्रावृत्त–अरुणप्रभा

कुणी म्हणेना माता त्यांना कुणी म्हणे ना आई
कत्तलखान्याकडे निघाल्या आता भाकड गाई...

स्त्री जन्माची नवी कहाणी जुना परन्तू साचा
एका बाजुस असे बोहले दुसऱ्या बाजुस खाई...

पुरी न झाली कथा व्यथेची पृथ्वी कागद झाली
सर्व वृक्ष  हे झाले बोरू, समुद्र झाला शाई... ★

असूनही मांज्याची सोबत पुन्हा न तो झेपावे
निवडुंगाशी भिडतो तेव्हा पतंग फाटुन जाई...

नकोस जाऊ सांगाया तू, जरी न तू अपराधी
नशीब जेव्हा होते शत्रू, पर्वत होते राई...

उसंत नाही कुरवाळाया पाठीवरचे वळही
कच्ची बच्ची तुझी भुकेली, आता सावर, बाई...

नको वैद्य वा औषध–पाणी लगबग कशास आता
उडे पक्षिणी सोडुन घरटे, कशास आता घाई ?

■

## वृत्त– नगराज

जगण्याच्या आधारा भास तुझा
फुलण्याला जीवन दे श्वास तुझा...

तुज समजो ना समजो, सांगिन मी
मन माझे पण त्याला ध्यास तुझा...

मानवता नसलेला माणुस तू
डोळ्यांना बघवेना ऱ्हास तुझा...

पेटुनिया उठलेली भूक पहा
दे चिमण्या पोटाला घास तुझा...

प्रगत अशा मेंदूचा वर तुजला
'सेपियन्स' परिचय हा खास तुझा...

■

---

★ श्रुतयोजन

## वृत्त–द्वियोधा

स्पंदने थांबली
काळजी संपली...

कोण होते तुझे?
मंडळी चालली...

काय रेंगाळते
ती तुझी सावली ?...

साद की भास हा ?
पावलो पावली...

भेट होईल का
यापुढे आपली ?...

भिंत रंगामुळे
खस्त ना भासली...

मी मना कोंडले
त्यास शिक्षा दिली...

मीच दुर्लक्षिता
गझल खंतावली !...

■

## वृत्त–सती + जलौघवेगा

अता कळीचे तसे उमलणे नकोनकोसे
उगाच भृंगासवे बहकणे नकोनकोसे...

नकोच रे पावसा, तुझ्या त्या मधाळ धारा
जुन्या स्मृतींना पुन्हा उजळणे नकोनकोसे...

अता कुठेही मनास काही बरे न वाटे
पुन्हा जुळोनी पुन्हा विखुरणे नकोनकोसे...

नको गुलाबी नवीन कोड्यात गुंग होणे
खुळ्याच स्वप्नामधे हरवणे नकोनकोसे...

वजा कराया हवीत सारी विजोड नाती
कशातही 'एक' हा मिळवणे नकोनकोसे...

■

## वृत्त–आनंदकंद

हेही मजेत होते तेही सुखात होते
आपापल्या सुखाची गाणीच गात होते...

कोणी कुणाकडेही निर्देश का करावा
काळ्यात रंगलेले सारेच हात होते...

ह्या रावणास हल्ली असती हजार तोंडे
प्रत्येक मुख अधाशी, प्रत्येक खात होते...

मूल्ये विकून ज्यांनी विकले स्वत:सही, अन्
हा देशही विकावा, त्यांच्या मनात होते...

श्रीमंत होत जाण्या सोपे उपाय त्यांचे
नोटा छपाइचेही धंदे भरात होते...

■

## वृत्त–मेनका

एकमेकां सांगती ही माकडे
माणसांना माणसांचे वावडे...

द्वेष पसरे मुक्त वाऱ्यासारखा
पोरक्यासम प्रेम एकाकी रडे...

जाहले डोळे तुझे का आंधळे
काढ जातींची पुराणी झापडे...

नर्मदा वाहून गेली वरतुनी
राहिले गोटे परन्तू कोरडे...

कोणत्या बंधात बांधू त्यास मी
जो कधी कवितेतही ना सापडे...

कोणता हा सण नवा रे माणसा
घालिशी रस्त्यात रक्ताचे सडे !...

सरळ नाही व्हायचे हे जग कधी
श्वान–शेपुट वाकडे ते वाकडे...

भोगला मी जन्म शिक्षेसारखा
पाहिजे होते तुला जे ते घडे...

तू कशी जगशील 'संगीता' इथे
हे तुझे कविहृदय भोळे–भाबडे...

■

## वृत्त–सती + जलौघवेगा

खरेव आश्चर्य ! मी अजूनी जिवंत आहे
तसा कधीचा सुरूहि झालाच अंत आहे...

कधी कुठे एकही कळी ना फुलून आली
तुम्ही बळे लावले म्हणाया 'वसंत आहे'...

तुझ्याकडे यायची मनाची उमेद होती
परन्तु रस्तेहि खुंटले, हीच खंत आहे...

कशास सांगायची कुणाला सुखे नि दुःखे
कुणाकडे ऐकण्यापुरेशी उसंत आहे...

उजाडल्याची दिलीत वार्ता, खरी न तीही
अजून काळाच कुट्ट हा आसमंत आहे...

त्यजून मूल्ये जनावरासम जगायचे का ?
तुझ्यापुढे प्रश्न माणसा हा ज्वलंत आहे...

किती गुन्हे, मानवा तुझे, मोजदाद नाही
उदार तो, की कृपा तयाची अनंत आहे...

■

## वृत्त–नगराज

एकाकी गमल्यावर भेट मला
वाटेतच थकल्यावर भेट मला...

इतरांची आसवे टिपून रोज
तव रुमाल भिजल्यावर भेट मला...

झेलशील तू विजाहि आज लाख
बाहू तव शिणल्यावर भेट मला...

जग हे बदलू शकेन, सांगतोस
ती उमेद सरल्यावर भेट मला...

घेउन हाती मशाल चाललास
कुणि वेडा म्हटल्यावर भेट मला...

काट्यांनी सोलतील विद्ध पाय
जखमा त्या रिसल्यावर भेट मला...

वाट तुझी पाहत मी राहणार
हे तुज आकळल्यावर भेट मला...

■

## वृत्त–जलौघवेगा

लगीन नाही करायचे हो
जळून नाही मरायचे हो...

तुम्ही ठरावे सदा विजेते
म्हणून का मी हरायचे हो ?...

कुठे जराशी मिळेल प्रीती
घरोघरी का फिरायचे हो ?...

शिरी दिला भार संस्कृतीचा
गृहीत स्त्रीला धरायचे, हो ?...

परंपरेची जुनी व्यवस्था
बळी न मजलाच जायचे हो !...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

येण्याआधी परत जायचे ठरले होते
जातांना काही न न्यायचे ठरले होते...

माहित होते तुला कशाची जरूर नाही
जे माझे ते तुला द्यायचे ठरले होते...

वाद्याशी तारांनी जो जखडून घेतले
पिळवणूक साहून गायचे ठरले होते...

दगडाच्या हे मनात आले, मूर्ती व्हावे
हातोड्याचे घाव खायचे ठरले होते...

लपवुन आसू, विदूषकाने रंग लावता
लोकांना हसवीत राह्यचे ठरले होते...

मीरेने कृष्णाशी जेव्हा प्रीत जोडली
मिळता विषही मूक प्यायचे ठरले होते...

■

## वृत्त–विद्युल्लता

पायातळी निखारे उचलून माळले
त्या वेदनेत गाणे करपून चालले...

नाही कधीच भरले, ताजेच आजही
रिसतात घाव जे मी लपवून सोसले...

खोट्या सुखासवे हा संसार थाटला
दु:खास काळजाशी दडवून टाकले...

सांगूनही कळाव्या कोणास ह्या व्यथा
लावून शिस्त ओठां मिटवून हासले...

शोधीत राहिले मी, ती एक तारका
झाली पहाट, तारे फिकटून लोपले...

■

## वृत्त–मणिचित्र+घारि

अजुनी ती जखम जुनी वाहतेच
हृदयाला सुखसुद्धा जाळतेच...

जग सारे डबके आहे गढूळ
चिखलाचे शिनतोडे उडवतेच...

अडके हे नियतीच्या कातरीत
मन भावुक फिरफिरून फाटतेच...

पुरुषाळुन उरला तो स्त्रीपणाच
नयनांचे शर नारी टाकतेच...

कनकाचा मृग आणीलच विनाश
मन मोही तरि मागे धावतेच...

भर दिवसा जमला अंधार दाट
निवडुन आले बहुधा चोर तेच...

उपयोगी नसते क्षमताच फक्त
हळु चाले तरि कासव जिंकतेच !...

■

## जाति–उद्धव

मैत्री नाही ?... चला नको
शत्रुत्वाची बला नको...

चंद्र हवासा सर्वांना
मात्र क्षयाची कला नको...

सीमेवर जा कोणीही
त्यात कुणी आपला नको (?)...

माझ्या वाटा एकटिच्या
साथ नको, काफला नको...

प्रत्येकाला हाव सुटे
कोणाला खायला नको ?...

'एका' चे भारुड सुचवी
नवरा अन् दादला नको !...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

करायचे तर हेच करू या देशासाठी
तळहातावर शीर धरू या देशासाठी ...१

मोफत आले होते का स्वातंत्र्य काल हे ?
वीरांचे बलिदान स्मरू या देशासाठी ...२

देशाला फोडाया टपल्या ज्या ज्या शक्ती
एकीने त्यांनाच चिरू, या देशासाठी ...३

धर्म–जातिच्या नावाने जर लढत राहिलो
सारे जण द्रोहीच ठरू, या देशासाठी ...४

सरकारे बदलून आजवर काय साधले ?
समाजमानस शुद्ध करू या देशासाठी ...५

अनिवासी पुत्रांनो, आणा मनात हेही
आज ना उद्या परत फिरू या देशासाठी ...६

पोट असू द्या, आहे ना मेंदूही जागा ?
खाणाऱ्याचे हात धरू या देशासाठी ...७

प्रत्येकाचे रक्त सारखे लालच आहे
प्रत्येकावर प्रेम करू या देशासाठी ...८

माता, ईश्वर, देश शब्द हे समानअर्थी
देशभक्तिने हृदय भरू या देशासाठी ...९

मातृभूमिशी वचनबद्ध होऊ या सारे
संधी येता खचित मरू या देशासाठी ...१०

■

## जाति–उद्धव

रात सुखाची ढळू नये
चंद्र कधी मावळू नये ...१

मनिच्च्या हिरव्या चाफ्याने
जनांमधे दर्वळू नये ...२

काळाला हे जमेल का ?
रेंगाळावे पळू नये !...३

आठवणींनो, असे कुणा
येता जाता छळू नये ...४

दु:ख कधी बारिक होते ?
दु:ख सर्वदा दळू नये ...५

प्रकाशासवे धूर निघे
अशा दिव्याने जळू नये ...६

पाउस माळावर यावा
झोपडीत कोसळू नये ...७

सत्याच्या वाटेवरती
मित्र का बरे मिळू नये ?...८

बुडायचे तर शांत असे
★ लाटांनाही कळू नये...९

■

★ श्रुतयोजन

## मात्रावृत्त–अनलज्वाला

आप्त तुम्हाला म्हटले मी मज माफ करा हो
प्रेम जरा मागितले मी मज माफ करा हो ...

दगडालाही फुटतो पाझर ऐकुन होते
आशेवर त्या जगले मी मज माफ करा हो...

मीच प्रसवले ज्यांना, त्यांनी सौदे केले
वांझ न होते, चुकले मी मज माफ करा हो ...

माझ्यासाठी राखिव जागा देण्यामागे
हेतू जे, ओळखले मी मज माफ करा हो...

दु:खाच्या वर्षावा दिधले इंद्रधनू मी
अश्रूतुनही हसले मी मज माफ करा हो ...

तुमचे व्हावे रंजन तुमची दाद मिळावी
दु:खातहि गुणगुणले मी मज माफ करा हो ...

■

## जाति–उद्धव

शेणाचे ना मेणाचे
घर ते होते पत्त्याचे ...

आधाराला खांब कसे ?
खोट्याखोट्या स्वप्नांचे...

श्वास घ्यायचे दबलेले
भय तसल्याही वाऱ्याचे...

नाती सारी गोत्याची
नाही कोणी कोणाचे...

शंकेची फुंकर नुसती
नव्हते होई होत्याचे !...

■

## वृत्त–लज्जिता

जन्मलेले सुखासवे होते
दु:ख माझे कुठे नवे होते...

जे मनाच्या छतावरी आले
ते स्मृतींचे जुने थवे होते...

भासले सूर्य जे क्षणासाठी
पुंजक्यातील काजवे होते...

बाग ही जीवना, तुझी कसली
कंटकांचेच ताटवे होते...

ती न श्रद्धांजली सभा होती
ते स्वत:चेच गोडवे होते...

होइ तल्लीन ज्यात आत्माही
भीमसेनीच मारवे होते...

यज्ञवेदीवरी मला पुसती
बोल तुज काय गे हवे होते...

चालले आज ते अनंताला
जे हृदीं बंद पारवे होते...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

स्वप्न केव्हातरी संपले पाहिजे
वास्तवाच्या पुढे वाकले पाहिजे...

राहुनी पाहिले आसवांनी मुके
सोसवेना, अता बोलले पाहिजे...

ना फळे, ना फुले, सावलीही नुरे
झाड आता जुने तोडले पाहिजे...

सोड आता मला वर्तमानामधे
भूतकाळा तुला गाडले पाहिजे...

कोंदतो जीव हा येथ गर्दी अशी
यात कोणीतरी आपले पाहिजे...

■

## वृत्त–मृगा (स्वकृत)

नको आता नव्याने ओळखी
नको दु:खा निमंत्रण आणखी...

जिला मी विस्मराया पाहते
तुझी ती याद येते सारखी ...

न झाले शब्द माझे सोबती
मुकी ही वेदना माझी सखी...

हिऱ्याला कोंदणाची ना तमा
परी भेटून जावा पारखी...

नदी जाईल भेटाया समुद्रा
तिला मेणा नको वा पालखी...

■

## वृत्त–मृगाक्षी

खुळी मी ! काय साधाया निघाले
जगाला प्रेम अर्पाया निघाले...

दरिद्री वाळवंटाला कशाला ?★
पुन्हा छायाच मागाया निघाले...

इथे ही श्वापदांची हिंस्त्र वस्ती
इथे माणूस शोधाया निघाले...

करीं जे साखरेचे चार दाणे
समुद्रीं व्यर्थ टाकाया निघाले...

मला टाळून जे आयुष्य गेले
कशाला त्यास बिल्गाया निघाले...

असे देवत्व ज्यांचे साफ खोटे
शिळांना त्याच वंदाया निघाले...

■

## जाति–उद्धव

जखमा सोसत हसणारे
तेच खरे तर जगणारे...

जीवन एक जुगार असा
हरती मी मी म्हणणारे...

अश्रू पुसणारे थोडे
अन्य मजेने बघणारे...

आत ढकलती बुडत्याला
काठावरती असणारे...

ही कसली रेशिम–नाती
कच्चे धागे तुटणारे .!

■

★ श्रुतयोजन

## वृत्त–जला द्विरावृत्ता

रे जाइच्या फुला, तू मी जरा हसू
आहोत ह्या क्षणी, पुढच्या क्षणी नसू...

खेळून हारलो, तो डाव संपला
दैवा पुन्हा अता, पत्ते नको पिसू...

नाहीच प्रेम ते, भेटू तरी पुन्हा
जाणुन बुजूनही, दोघे पुन्हा फसू...

नाही अता मना, वाहून जायचे
लाटेवरी नको, काठावरी बसू...

नसल्यावरी उद्या, शोधाल जर तुम्ही
उगवेल तृण जिथे, मातीत त्या असू !...

■

## वृत्त–वैखरी

हे जीवनाचे वस्त्र साधेसे जरी
आहेत गझलेच्याहि त्याला झालरी...

संकल्प केला त्या प्रवासाचा पुन्हा
तो घाटरस्ता, खोल बाजूला दरी...

ते अर्धपोटी राहिले आयुष्यभर
कधि मीठ होते, फक्त केव्हा भाकरी...

भेगाळल्या शेतात बसला खिन्न तो
मग आसवांच्या धावुनी आल्या सरी...

चटके असे त्या चांदण्याचे सोसले
त्याहून होती तापली वाळू बरी...

ते पांघरावे फक्त एकांतामधे
जे दु:ख असते रेशमी अन् भर्जरी...

ही पूर्वपुण्याईच की आली फळा
मी ऐकली ती गोड त्याची बासरी...

■

## वृत्त–मंजुघोषा

दाटला अंधार पण मी रात नाही
मंद मी जळते परन्तू वात नाही...

पाहिजे होते मलाही प्रेम थोडे
पण कधी केला पुढे मी हात नाही...

शब्द होते, सूर होते, साथ होती
वेदना माझी मुकी, ती गात नाही...

अक्षरे रुसली कशी ही यक्ष–भाषा
कोणताही अर्थ त्या शब्दात नाही...

माझिया नावे लिफाफा जो मिळाला
मी कुठेही मात्र त्या पत्रात नाही...

■

## वृत्त–जलौघवेगा

हजारवेळा लिहून झाले
तुझीच मी, हे पुसून झाले...

पुन्हा पुन्हा वाढला पसारा
पुन्हा मना आवरून झाले...

फिरून ये विस्कटून जाण्या
फिरून पत्ते रचून झाले...

जुनी वही चित्रही जुने, पण
नवेपणी रंगवून झाले...

हिशेब केलास, जीवना, का
किती कुणाला छळून झाले...

नवीन 'निर्माल्य' नाव आता
अता कळीचे फुलून झाले...

कसे तुला वस्त्र टाकवेना ?
किती जरी वापरून झाले...?

तुझी कृपा मेघ तू दयाळू
क्षणात ते शीत ऊन झाले...!

■

## वृत्त–मुद

कुठले न बंध–नाते
जगुनी तरी पहाते...

लटकून, सूळ–पोळी
हसुनीच रोज खाते...

करि खोल खोल जखमा
नजरेमधील पाते...

शिवलेत ओठ, तेही
उसवून गीत गाते...

सरलेत अश्रु आता
रुधिरात दु:ख न्हाते...

भरडून काढतांना
रडणार काय जाते ?...

नरकात जाउनी, मग
बघु स्वर्ग तोच का ते !

■

## वृत्त–सूर्य

सूर आले, भारलो मी
'सा' तुनी साकारलो मी...

जीवनाशी खेळतांना
जिंकलो ना हारलो मी...

हा नवा आघात झाला
अन् पुन्हा झंकारलो मी...

दूर गेला चंद्र माझा
एकटा अंधारलो मी...

दु:ख सर्वांचेच माझे
एवढा विस्तारलो मी

हाक ये नारायणाची
ओम् नमो उद्गारलो मी...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

कितीदा पुन्हा तूच हरणार, वेड्या ?
समुद्रास गोडा बनवणार, वेड्या ?...

असावी फुले फक्त, बागेत म्हणुनी
किती रोज काटे उचलणार, वेड्या ?...

इथे फक्त अन्याय हा न्याय आहे
कुणाशी कुणाशी झगडणार, वेड्या ?...

तुला वाटते भ्रष्टता नष्ट व्हावी
कसे पर्वताला हटवणार, वेड्या ?...

अशक्यास थारा न तव शब्दकोशी
न सत्यात स्वप्ने उतरणार, वेड्या !

कुणाला हवा गंध, रस अन् फुलोरा ?
कुणास्तव उगा तू बहरणार, वेड्या ?...

नको आळवू कोकिळा, पंचमाला
न गाणे कुणाला समजणार, वेड्या !...

इथे फक्त रेताड नापीक माती
इथे काय मेघा, बरसणार, वेड्या !

मुभा एवढी की स्वत:ला बदल तू
कसे तू जगाला बदलणार, वेड्या ?...

■

## वृत्त––स्त्रग्विणी

युद्ध केव्हातरी थांबले पाहिजे
प्रेम विश्वात फैलावले पाहिजे...

मोजणे का सुरू भेद–जाती किती
जात माणूस हे नोंदले पाहिजे...

स्वप्न नेई जरी ध्येय वाटेवरी
वासतवाच्यापुढे वाकले पाहिजे...

रक्त यावे नवे, देश सांभाळण्या
स्वार्थ–हेतू मनी त्यागले पाहिजे...

ना फुले, ना फळे, सावलीही नुरे
वृक्ष ऐसे जुने तोडले पाहिजे...

■

## वृत्त–कलिंदनंदिनी

असेच का पुन्हा पुन्हा जुळायचे, तुटायचे
सदैव जीवनातुनी निमूट ओघळायचे...

सुगंधही नवा नवा हसून शिंपडायचा
मनी ऋतू असो नसो जनात मोहरायचे...

नवीन डाव मांडुनी उगीच खेळवायचा
समोरचाच जिंकण्या स्वत: पुन्हा हरायचे...

हृदीं न जागती जरी खरोखरीच स्पंदने
अजीव श्वासही तरी उरात बाळगायचे...

'नभा मिठीत घ्यायचेच' स्वप्न राहू दे मनी
फिनिक्स, राख होउनीहि त्यातुनी उडायचे...

सभोवताल माणसे तरीहि एकटाच तू
असूनही जगात ह्या कशातहि नसायचे...

■

## वृत्त–व्योमगंगा

शब्द वांझोटे परन्तू भावना गर्भार होत्या
जीवघेण्या त्या कळाही सोसतांना प्यार होत्या...

काय झाले त्या कळ्यांचे ?संपली त्यांची कहाणी ?
पूर्णतेचे फूल हाती त्या उद्या देणार होत्या...

मोजल्या नाहीत मी त्या एकट्या वैराण रात्री
चंद्र होता पेटलेला, तारका अंगार होत्या...

राहिले मागेच मी अन् दूरही गेले पुढे ते
अंतरी माझ्याच हाका, त्याच जिम्मेदार होत्या...

कागदांचा दोष नाही, वाचली कविता न माझी
आसवांच्या पावसांनी ह्या वह्या बेजार होत्या ..!

■

## वृत्त–सूर्य

सूर वाऱ्यातून आले
अन् कळीचे फूल झाले...

दर्पणाला जाग आली
बिंब तारुण्यात न्हाले...

तीळही आरक्त झाला
ओठ ओठांना मिळाले...

लागला डोळ्या न डोळा
चांदण्यांना ही कळाले...

वादळी रूपात आला
अन् तिचे निर्माल्य झाले...

■

## वृत्त–आनंदकंद

आता कुठे मनाच्या जळण्यास रंग आला
ज्योती विना जळाया जेव्हा पतंग आला...

ही रात्रही असावी का एवढी अभागी
दारात सूर्य आला, तोही भणंग आला...

मी आपल्याच हाती माझी चिता रचावी
कोणावरी न यावा तोही प्रसंग आला...

जे श्वास घेतले मी ते गुद्मरून गेले
जन्मावरी असा हा मृत्यू–तवंग आला...

वाहून नेत गेला ही वर्तमान रेती
मागील आठवांचा जो जो तरंग आला...

■

## वृत्त–बालानंद

तुटल्या तारा जोडुन घे
शेवटचे तू गाउन घे...

प्रेम खरे न खरी माया
स्वार्थ खरा हे जाणुन घे...

रडवी हे आयुष्य तुला
त्याच्यावर तू हासुन घे...

प्रकाशही ये छळण्याला
तू दरवाजा लावुन घे...

मानाची आशाहि नको
'माणुसपण' तू भांडुन घे...

नको कोरडी होउ अशी
एकच अश्रू ठेवुन घे...

■

## वृत्त– मंजुघोषा

भेटलो तेव्हा पुन्हा हे स्पष्ट झाले
आपुले नाते जुने ते नष्ट झाले...

कोठली तक्रारही नाहीच केली
मग विळे गवतावरी का रुष्ट झाले ?...

मारलेही, जाळले अन् गाडलेही
का न ते अद्यापही संतुष्ट झाले ?...

यत्न त्यांनी खूपदा केले परन्तू
बोलतांना गोड, त्यांना कष्ट झाले ...

मानिले मी आपुले जेव्हा तुम्हाला
मित्र हे नातेच तेव्हा भ्रष्ट झाले...

■

तरही गझल

## वृत्त–कादंबरी

भेट वा टाळून जा
मात्र, सांभाळून जा ...१

तूच तू पानावरी
ये, वही चाळून जा ...२

ह्या निरोपाच्या क्षणी
निमिष रेंगाळून जा...३

आसवांनो पापण्या
आज प्रक्षाळून जा ...४

गात्र आतुरले सख्या,
रात्र गंधाळून जा ...५

भृंग हो कमळातला
आत घोटाळून जा ...६

ह्या मुक्या काट्यांवरी
एकदा भाळून जा...७

देश मागे आहुती
जीव ओवाळून जा...८

घे पुन्हा अवतार तू
दुष्ट निर्दाळून जा...९

■

## वृत्त–मंजुघोषा

नाव ही नेई पुढे ढकलीत वारा
दूर डोळ्यांना दिसेनासा किनारा...

प्यार हा अंधार आता भोवतीचा
चांदण्यांनो, आवरा तुमचा पसारा...

आग पाण्याला कशी लावील कोणी
टाकता पाण्यात हा विझतो निखारा...

शांत, इतके शांत की आवाज नाही
फक्त वाजे पाप–पुण्याचा नगारा...

नाव केव्हाही बुडे, घे नाम आता
अंतरीचा नाद देई तुज इशारा...

■

## वृत्त–पङ्क्तिका

ही अखेरची भिंत कोसळे
जा, तुला अता रान मोकळे...

पूर ओसरे गूढ शांतता
थांबली अता सर्व वादळे...

हात सोडले, साथ संपली
चालु या, अता मार्ग वेगळे...

आसवांसही आग लागली
चंद्र तापला चांदणे जळे...

एकदा जिथे कमळ हासले
तेच प्रीतिचे आटले तळे...

बाग भोवती लावल्यावरी
का असा जुना वृक्ष उन्मळे...

सावळ्या नभा सावळ्या दिशा
लोचनी ठसे रूप सावळे...

■

## वृत्त–विद्युल्लता

ही रात्र मोरपंखी एकांत पांघरू
आहे मनात सारे ते ते पुरे करू ...

तू वेच पापण्यांनी ही तारकाफुले
क्षितिजावरील कलता हा चंद्र सावरू...

नि:श्वास ह्या दिशांचे गंधात भारले
तो गंधगर्भ वारा हृदयामधे भरू...

ओठातल्या सुरांना दे अक्षरे तुझी
एका नव्या सुरांच्या दुनियेत वावरू...

येईल पूर्व जेव्हा न्हाऊन केशरीं
आयुष्य रंगवाया ते रंग वापरू...

■

## वृत्त–देवराज

चैत्रमास होइ आज आगळाच साजरा
अत्तरास मी दिला मनामधील मोगरा...

पालवी नवीन कोवळी कुसुंबि लेवुनी
हर्षबावऱ्या ऋतूस भेटली वसुंधरा...

शिंपडू चला गुलाबपाणि अगंणामधे
कोण यायचे कळे न, गालिचाहि अंथरा...

वाट पाहती फुलेहि, तबक चांदिचे कुठे ?
ऐट अन् दिमाखही समर्पणास आधिरा...

लगबगीत ही उशीर ! का मना, उताविळी ?
ठेच लावतो फितूर हा लबाड उंबरा !!..

■

## वृत्त–स्त्रग्विणी

ठेविला मी तुझ्या चंद्र वाटेवरी
चांदणे घेउनी जा अता तू घरी...

तारकांचीच गर्दी तुझ्या भोवती
शेवटी, जी ध्रुवाची दिशा ती खरी...

ही प्रवाही नदी त्यात वाहू नको
बांध रंगीतसा पूल तू त्यावरी...

लाभू दे फूल ते ज्यास काटे नको
पावले ही पडो रम्य रस्त्यावरी...

शोध तू आपुले एक आभाळही
पंख आता मिळाले तुला, तू परी !...

■

## वृत्त–मंदा

बाहेर तू अन् आत तू
प्रत्येक ह्या श्वासात तू...

तू भोवती बाजूंसही
पण भासशी अज्ञात तू...

चैतन्य सळसळ वाहते
धमनीतल्या रक्तात तू...

मी शोधल्या साऱ्या दिशा
होतास पण डोळ्यात तू...

तू प्रेमरूपे राहसी
अंतस्थ गाभाऱ्यात तू...

आनंद तू जगण्यातला
मृत्यूचिया गर्भात तू...

■

## मात्रावृत्त–अरुणप्रभा

मोहरून आला होता प्राजक्त, कुणाला सांगू ?
साकळून गेले देठी हे रक्त, कुणाला सांगू ?...

शब्दांचा बर्फच झाला, डोळ्यांचे झाले पाणी
राहिले भाव प्रेमाचे, अव्यक्त कुणाला सांगू ?...

एकदा कधी सूर्याने मातीस चुंबिले होते
मी क्षितिज पाहिले होते, आरक्त कुणाला सांगू ?...

ठेविला चंद्र तू पोटी, आकारुन आला तोही
कवळिले खऱ्या आनंदा, हे फक्त कुणाला सांगू ?...

शेवटास आयुष्याच्या, आरंभ होउनी आला
तो प्रेमस्वरूपी, त्याची मी भक्त कुणाला सांगू ?...

■

## वृत्त–मृगा (स्वकृत)

जगाचे ढंग सारे पाहिले
कळेना काय आता राहिले...

तुझी मी जीवना, आहे ऋणी
तुला मी अन् मला तू साहिले...

तसा मागेच मृत्यू जाहला
चितेने आज देहा दाहिले...

कशाला सोहळा खोटाच हा
कशाला नक्र-अश्रू वाहिले...

जळायाचे मुकाटयाने तुला
पतंगा, ज्योतिला का चाहिले ?...

■

## वृत्त–सती + जलौघवेगा

कसे जगावे मला न आले, कबूल आहे
हवीच शिक्षा, गुन्हेहि झाले, कबूल आहे...

उगाच विश्वास ठेविला मी कुणावरीही
मला चुकांचेच फळ मिळाले, कबूल आहे...

कुणी न दोषी, जगात न्यायानुसार झाले
सुके नि ओले सवे जळाले, कबूल आहे...

कधी न तारुण्य-स्पर्श झाला, वयस्क झाले
करांजलीतुन ऋतू गळाले, कबूल आहे...

दिले तुम्ही तेच दुःख गीतात गुंफले मी *
क्षमा करा, झाकता न आले, कबूल आहे ...

■

## वृत्त–स्वानंदसम्राट

ती एक वेणी साधी फुलांची
का भासली ती मज चांदण्यांची...

तो एकतालात नि:शब्द होता
बरसात झाली बारा स्वरांची...

त्या मैफलीला श्रोते न होते
मैफील होती ती दो मनांची...

एकत्र आल्या अन् दूर गेल्या
गंमत अशी दो विरोधी दिशांची...

ब्रह्मा-कमल ते धुंदी सुगंधी
ती लूट होती काही क्षणांची...

पेटून विझले सारे निखारे
रक्षाच बाकी त्या कोळशांची...

■

## वृत्त–हिरण्यकेशी

नकोत भिंती नको दारे अशा घराचा विचार केला
खुल्या अशा त्या नव्या घराचा निळा–नकाशा तयार केला...

जमीनही अंथरून घ्यावी, हवा लपेटून शांत व्हावे
अशा तऱ्हेने जगून येथे जगायचा औपचार केला...

कुणा हवीशी, कुणा नकोशी, कवी–कवींच्या अनेक 'जाती'
गझल–सखी ही, तिचाच मीही जमेल तैसा प्रचार केला...

खट्याळ ह्या माकडास केळी चरावयाला मुळी न द्यावी
असेच आजी म्हणायची, मी निमूट त्याचा स्विकार केला...

विरायची लाट ही क्षणाने, परन्तु सामर्थ्य केवढे हे !
पहा समुद्रा, तुझ्या जळाचा तिनेच साधा तुषार केला ...

■

### छंद–अष्ट–षडाक्षरी– 'म्युझिका' (स्वकृत)

तुझ्या होत्या फक्त चुका माझे सारे खिळे ?
उल्गडावी पुन्हा का तू भूतकाळ रिळे ?...

माझ्या भावनांची मऊ गवताची पाती
तुझे शब्द धारदार कापणारे विळे !...

ओरखडे जागोजागी अंगावर खुणा
मुका मार साहून हे मन काळे–निळे ...

चंद्राचेही झाले खंड नभा गेले तडे
सूर्य सुद्धा आंबला हा ऊन त्याचे शिळे ...

वल्हवू दे हवी तशी आता मला नौका
पैलतीरा वर आता दृष्टी माझी खिळे !...

(अक्षर छंदातील ही गझल असून.....
लयतत्त्व बाधित झालेले नाही.)

■

### वृत्त–सती + जलौघवेगा

मनात पक्षी ! कधी कधी हा उडून जातो
नवीन फांदी बघून, तेथे बसून गातो...

अशीच येते हवा सुगंधी कुण्या दिशेने
तिच्या घराचा उदास कोना भरून जातो...

तुझीच फुंकर ! तरी अता वाटते नकोशी
दिवा जळू दे, उगीच जाइल जळून, ना तो...

कुठे किनारा ? सुसाट वादळ, तरी जिवात्मा
बनून मुंगी, चढून पर्णी तरून जातो...

कसा न आला अजून ? मी तर तयार आहे
कसे कळावे ? असेल बसला रुसून का तो ?...

■

**तरही गझल**

## वृत्त–लज्जिता (बदलून)

गुंतण्याची मनात आस नको
देह सुटता जिवास त्रास नको...१

ग्रीष्म साहीनही मुकाटपणे
सावलीचा परन्तु भास नको...२

रेशमीही असेल दोर तुझा
प्रेमरूपी गळ्यात फास नको...३

धावतो मृग उरी फुटून किती
जीवघेणी अशीहि प्यास नको...४

जीव घेतात मित्रही अपुले
दुष्मनांची उगा मिजास नको...५

माय माती तुझी, दुजे न कुणी
त्या नभाचा खुळाच ध्यास नको...६

एक काटा दिलास तोच पुरे
ही फुलांची नवीन रास नको...७

मैफलीच्या अखेरिला, सखया
भैरवी गाउ दे, बिभास नको !...८

■

## वृत्त–कामिनी

चालले पुढे पुढे जरी
मी कधी न पोचले घरी...

भेटले मधून ताटवे
साथ कंटका, तुझी खरी...

भाजुनीच जात राहिल्या
त्या झळा तशा, नि ह्या सरी...

ओठ बोलतात वेगळे
भाव वेगळेच अंतरी...

सोस ठेच कळवळू नको
जाहल्या महाग फुंकरी...

सत्य शोध तूच ह्यातले
टेकले क्षितीज भूवरी...

जन्मही खरा न हा तुझा
मृत्युची वटीच साखरी !...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

व्हायचे ते अता होउनी जाउ दे
काठ पाण्यासवे वाहुनी जाउ दे...

चालली ही नदी सागरा भेटण्या
ह्या प्रवाही दिवे सोडुनी जाउ दे...

कैद श्वासामधे जीव हा घुस्मटे
छातिचा पिंजरा तोडुनी जाउ दे...

वाइटातूनही चांगले जन्मते
भेटले मी तुला, वंदुनी जाउ दे...

का उशीरा अशी जाग आली तुला
दैवही राहिले झोपुनी, जाउ दे !...

■

## वृत्त–भुजंगप्रयात

पुढे पावले ही स्वत:हून टाकू
चला, ह्या जगालाच बदलून टाकू...१

कुणाच्याहि हाती नको शस्त्र–अस्त्रे
चला, हात मैत्रीत गुंफून टाकू...२

जरी भिन्न भाषा, जरी भिन्न बोली
मनाशी मने घट्ट बांधून टाकू ...३

जिवापाड जपु या नव्या रोपट्यांना
पुन्हा हे बगीचे फुलारून टाकू...४

जुने कोश आता लिहू या नव्याने
जुना 'स्वार्थ' हा शब्द गाळून टाकू...५

दिल्या यातना सृष्टिमातेस आपण
क्षमा मागुनी, चित्र बदलून टाकू...६

फुटी पाहुनी लाभ घेतील नेते
अशांना मतांनीच हटवून टाकू...७

अता गर्जु या जात माणूस आहे
खरा धर्म हा 'प्रेम' सांगून टाकू...८

खुदा, राम येशूहि त्याचीच नावे
करू प्रार्थना, भेद मिटवून टाकू...९

■

## वृत्त– मेनका

संपले ते प्रेम, हुं ! चालायचे
सृष्टिचे हे नेम, हुं ! चालायचे...

लोहखाणींना जगी तोटा नसे
सापडेना हेम, हुं ! चालायचे...

मानवी काळीज आता काजळी
जाहले निष्प्रेम, हुं ! चालायचे...

जे सुरू होते, सरे ते शेवटी
नाव त्याचे क्षेम, हुं ! चालायचे...

दु:ख म्हणजे, जी सुखाला लाभली
भेट ही सप्रेम, हुं ! चालायचे...

■

## वृत्त–लज्जिता

दु:ख मी झेलले मजा आली
झेलले, फेकले मजा आली...

आसवांना निवास लाभावा
शब्द मी बांधले मजा आली...

भर्कटू ना दिले मना, तेही–
वागले शिस्तिने मजा आली...

वाटले प्रेम मीच सर्वांना
वाटुनी संपले मजा आली...

स्रोत होता मनात करुणेचा
सापही पाळले मजा आली...

जन्मगोलात घेतल्या गिरक्या
मृत्युला जिंकले मजा आली...

मी इथे राहुनी, इथे नाही
मी अशी हरवले मजा आली...

झुंबरे कोण फोडुनी गेले
खंड मी वेचले मजा आली...

■

## वृत्त–स्त्रग्विणी

मानवा, ही तुझी नवनवी खेळणी
रोज शस्त्रांचि ही वाढती मागणी...

धुंद मेंदूत पेशी न, पैसा दडे
अन् नसांतून खेळे तुझ्या वारुणी...

हे धुराचे असे श्वास घ्यावे किती
होइ निस्तेज हा शुक्र, ही चांदणी...

शासकी योजनेची नवी घोषणा
खाबुरावां मिळे आयती पर्वणी...

स्वार्थ उद्दिष्ट हे जीवनाचे तुझ्या
मैत्र सावध, तुझे प्रेमही धोरणी...

■

## वृत्त–लज्जिता

वाळले पान जीवनाचे हे
वादळा, तू अता कुठेही ने...

वागवू मी कसे नवे ओझे
आधिचे झेपते न गाठोडे...

शब्द होतात आपुले वैरी
शब्द ओठांमधेच राहू दे...

मीच स्वस्तात मानिला सौदा
तेल गेले नि तूपही गेले...

लाव आधी पणास सर्वस्वा
आणि हाती खुशाल फासे घे...

प्राण आले खरेच कंठाशी
वाटते का तरी जगावेसे ?...

■

## वृत्त–मृगाक्षी

किती बोलायचे राहून गेले
खरे सांगायचे राहून गेले...

जरी होतास तू माझ्याच पाशी
तुला शोधायचे राहून गेले...

कशी इतक्यात संध्याकाळ झाली
प्रकाशी न्हायचे राहून गेले...

दिले तू मागण्याआधीच सारे
तुला मी द्यायचे राहून गेले...

तुझी होते, तुझी तन–मन–धनाने
'अहं' अर्पायचे राहून गेले...

■

## वृत्त–सती

कुठेच काही
जिवंत नाही...१

असेल डबके
कसे प्रवाही ?...२

इथे कुणाचे
कुणीच नाही...३

पुसून गेल्या
तुझ्या खुणाही...४

जुनीच दारू
नवी सुराही ...५

जिभेवरी, जे
मनात नाही...६

सुगंध कुठचा
न ये हवाही ...७

नकोच मेणा
न दुःख शाही...८

विवेक जागा
गुन्हाच हाही !...९

■

## वृत्त–मंजुघोषा

डाव फिरुनी मांडला तोही चुकीचा
एक फासा टाकला तोही चुकीचा...

टाकले पाऊल ते होते चुकीचे
मार्ग जो मी शोधला तोही चुकीचा...

हे करू की ते करू ह्या संभ्रमी मी
का दिला सल्ला मला ? तोही चुकीचा ?...

व्हायचे होतेच ते, होऊन गेले
ज्योतिषी कसला भला ? तोही चुकीचा...

जीवनाला ताल नाही मेळ नाही
सूर जो मी लावला तोही चुकीचा...

■

## वृत्त–देवराज

सावधान ! जीवना, तुला कळायला हवे
कोण मित्र, शत्रु कोण ओळखायला हवे...

स्त्री म्हणून जन्मलीस, घे अता शिकून हे
पापण्यात तू समुद्र थोपवायला हवे...

वापरायचे शहाणपण ठरे खुळेपणा
यापुढे जगात वेड पांघरायला हवे...

खंत ही, न राहिलीत माणसात माणसे
लाजवायचे पशूस, थांबवायला हवे...

नाटकात भूमिका दिली तुला, समोर तो
बोलवील त्या क्षणीच आत जायला हवे...

तू नि मी दुरावलो, कितीक जन्म संपले
ह्या विषण्ण दूरतेस संपवायला हवे...

■

## वृत्त–सती

गुलाब ताजे
फिके उद्या जे...

न कृष्ण येई
न बन्सि वाजे...

वियोग रात्री
वसंत भाजे...

कशास चाफा
मनात लाजे ?...

कळेल का तुज
हवे मला जे...

अफाट सागर
जुनी जहाजे !...

■

## वृत्त–सुकामिनी

रोज हे घडायचे
सूर्य मावळायचे...

गाव काल सोडले
नाव का स्मरायचे...

जाळुनी मना पुन्हा
दीप पेटवायचे...

मेघ तू, उद्या तुला
मातिला मिळायचे...

एक ध्येय अंतरी
बस् ! प्रकाश व्हायचे...

■

## वृत्त–वीरलक्ष्मी

कोंडलेले मला पंजरी
अन् स्वत: वाजवी बासरी...

खेळ चाले तुझा रंगुनी
बेतले हाय ! प्राणांवरी...

आसवांच्या सरी सांडती
नेशि तू फक्त हसण्यावरी...

अर्जुनासारखी लीन मी
सारथी कोण ह्या संगरी...

आवरी, बांध हे बोचके
परतुनी जायचे त्या घरी...

■

## जाति–उद्धव

जे झाले ते झाले, चल
जीवन म्हणजे नित्य बदल ...१

पाउस डोळ्यामधे सुरू ?
याचा अर्थच प्रेम सफल...२

काटा उपसुन फेकुनही
उरला का हा आंतरसल ?...३

राजिखुशीने निरोप दे
का उगाच हे नेत्र सजल?...४

कोडी घालिशि रोज नवी
एक तरी रे, तूच उकल...५

कठोर वज्राहून कधी
कधी फुलाहुन तू कोमल...६
आस मनी की स्पर्शावे
एकदाच ते पादकमल...७

कोठे नेशिल तेथे ने
परन्तु आता घेउन चल...८

मजवर मर्जी शब्दांची
माझ्यासाठी हेच नवल...९

नक्षि नसावी शाईची
यावी प्राणातून गझल...१०

■

## वृत्त–जलौघवेगा

नवीन आला ऋतू तरी का
पहाट–अश्रू फुलांवरी का?...१

उजाडले काय सूर्य आला
तरीहि अंधार अंबरी का?...२

शिळा–अहल्येस राम भेटे
म्हणायची ही कथा खरी का?...३

तुझ्याहुनी वेगळी न मी जर
तुझ्या नि माझ्या मधे दरी का?...४

कुण्या घरी भात केशरी अन्
कुठे शिळी फक्त भाकरी का?...५

जरी न होती तुझी कथा ती
तुझ्याहि नेत्री तरी सरी का?...६

जुनी पुराणीच घोंगडी ही
किनारिला कांचनी जरी का?...७

अशी कशी वेल जीवनाची
फुलेहि आलीत बोचरी का?...८

स्मशान–बागेत जन्म गेला
चिता उगा पेटली घरी का?...९

सखे, कन्हैया न गोकुळी, मग
मनी घुमे तीच बासरी का?...१०

■

## वृत्त–हरिभगिनी

नाव अशी मी एक निनावी पाण्यावरती घर माझे
नसे मला आधार धरेचा आणि नसे अंबर माझे...

दूर दूर राहिले किनारे, मागे वळुनी काय बघू
तरी वाटते राहुन गेले स्वप्न किनाऱ्यावर माझे...

हेलकावते जीवन अवघे थपडा खाउन लाटांच्या
सोपविले वाऱ्यास स्वत:ला करायचे ते कर माझे...

अनंत पाणी चहूकडे अन् पाण्याचा धोका मजला
ह्याच विरोधाभासावरती 'तरणे' हे निर्भर माझे...

ठाऊक नाही कुठे पैल तो पोहोचेन का मी तेथे
लक्ष, दिलासा देणाऱ्या त्या प्रकाश–ताऱ्यावर माझे...

■

## वृत्त–संयुत

जर जायचे चुकवून जा
हसवून मग फसवून जा...

कितिदा तुला विनवायचे
विसरायला शिकवून जा...

बघ जाळते धग प्रीतिची
कधि येउनी शमवून जा...

मज एकदा म्हण आपली
बस हट्ट हा पुरवून जा...

परवानगी तुज एक ही
मम स्वप्नि तू हरवून जा...

जगण्या मला तव प्रेम दे
मरणासही सुखवून जा...

■

## वृत्त–मंजुघोषा

चांदण्याची माळ शोभे अंतराळी
रोज चाले विश्वराजाची दिवाळी...

आज आभाळा नवी आली झळाळी
दीपलक्ष्मी होउनी आली दिवाळी...

रात्र सरली, का अता चर्चा तमाची
शुक्र तेजस्वी उषेच्या गौर भाळी...

भारलेली ही हवा कोठून आली
रातराणी दर्वळे, तीही सकाळी...

तृप्त झाले बंगले साजुक तुपाने
झोपडीलाही मिळो सुग्रास थाळी...

सत्य, शिव अन् सुंदराचा दीप लावू
साजरी करु या दिवाळी ही निराळी...

■

## वृत्त–राधा

सावलीने तापल्यावर जायचे कोठे ?
श्वास पृथ्वीने निवाया न्यायचे कोठे ?...१

आग पाण्यालाच लागे पेटल्या लाटा
धर्म पाण्याचे अता शोधायचे कोठे ?...२

मैफलीला आज गर्दी फक्त बहिऱ्यांची
वेदनेने गीत आता गायचे कोठे ?...३

ह्या जगाचा एक जंगी उकिरडा झाला
जल गुलाबाचे किती, शिंपायचे कोठे ?...४

आणिबाणीच्या सुईने ओठ शिवलेले
सज्जनांनी काय अन् बोलायचे कोठे ?...५

एक भाऊ जीव घेई आज दुसऱ्याचा
माउलीने तोंड त्या लपवायचे कोठे ?...६

वृक्ष तोडुन बांधली तुमची घरे तुम्ही
सुग्रणीला प्रश्न, घर टांगायचे कोठे ?...७

दूर जाताहेत वाटा बघ तुझ्या–माझ्या
का विचारत राहसी भेटायचे कोठे ?...८

जायचे सारे प्रवासी त्याच गाडीने
माहिती नाही कुणा, उतरायचे कोठे ?...९

■

## वृत्त–पुष्प

प्रेम द्यावे
प्रेम घ्यावे ...१

स्वप्न माझे
का विरावे ?...२

चेहऱ्याला
कैक नावे...३

वृक्ष तुटले
खिन्न रावे...४

सिंह नुरले
काय छावे ?...५

अंगणाला
घर मिळावे...६

ह्या कळीने
मोहरावे ...७

नित्य 'त्याचे'
नाव घ्यावे...८

जिंकण्या तू
मी हरावे...९

■

## वृत्त–स्त्रग्विणी

आज हे रंग मी चालले शिंपुनी
घ्यायचे तेवढे घ्या तुम्ही वेचुनी...१

सोसलेली उन्हे सोसल्या सावल्या
वय छताचे अता चालले संपुनी...२

चोरल्या ना कधी चांदण्या मी नभा,
ठेविल्या मी पुन्हा जागुनी मोजुनी...३

प्रेमगीतास का सूर्यही भाळला
त्यामुळे पृथ्वि ही चालली तापुनी...४

तार छेडू नका ह्या सतारीतली
शीण आला तिला वाजुनी वाजुनी...५

वाकले झाड, पण वादळाने नव्हे
शेवटी ते असे का पडे मोडुनी ?...६

या कुणीही पुसा, खोडुनीही पहा
नाव माझे इथे ठेविले कोरुनी...७

ठाउकी ना मला चालले मी कुठे
शिष्ट–आचार की चालले सांगुनी...८

मैफलीला कधी बाध येऊ नये
शब्द हे तोकडे, लेखणी ही जुनी...९

■

## वृत्त–हारीत

जे दैव देते
ते कर्म नेते ...१

आदर्श ? छे, छे
हे फक्त नेते...२
हरले न कोणी
तर कोण जेते ?...३

प्रीती नको, जी
प्राणांस बेते...४

दे हाक ऐशी
उठतील प्रेते...५

शांती कधीही
लक्ष्मी न देते...६

अश्रू--सरींनी
फुलती न शेते...७

तू हो पुढे, जग
मागून येते...८

■

## वृत्त–कलापती

(नव्या पिढीतील तो आणि ती)

तो...

काल भेटलो निवांत तेवढे पुरे
काल पाहिला सुखांत, तेवढे पुरे...

ओंडक्यास तोच ओंडका न भेटतो
वाहतो प्रवाह शांत तेवढे पुरे...

बंधनात राहण्यात कोणती मजा ?
ही जुनी पिढी अशांत तेवढे पुरे...

कालचक्र मैथुनासभोवती फिरे
जाहला कधी युगान्त ? तेवढे पुरे...

दलदलीत जन्म का कुणास द्यायचा ?
भोगतोय भावनान्त तेवढे पुरे...

ती...

आय–पिल्स खायच्या किती ? अता नको
ऐक 'आतला' अकान्त !... तेवढे पुरे...

■

## छंद–कर्णफुल्ल

जे झाले ते उत्तम झाले
दूर अता सारे भ्रम झाले...१

वादळलाटा झेलुन झेलुन
हृदयाचे तट भक्कम झाले...२

अवचित पाउस अवचित थंडी
लहरी आता मोसम झाले...३

जखमा सहजी सोसुन झाल्या
मात्र लपवितांना श्रम झाले...४

आदर नुरला नात्यांमधला
जिथे तिथे वृद्धाश्रम झाले...५

वारावर प्रतिवार कराया
मीही आता सक्षम झाले...६

राष्ट्र नवे होईल उद्या हे
जर जातींचे संगम झाले...७

'मी–माझे' टाकून दिले अन्
तुझ्या कृपेने निर्मम झाले !...८

■

## वृत्त–वियद् गंगा

उभी ओळीत होती काल मी जी मोजली झाडे
असावा लालची बिल्डर, तयाने तोडली झाडे...

कधी सोसाटला वारा तरी खंबीर होती जी
परी सोसायटीच्या प्लॅन पायी वाकली झाडे...

निसर्गाने दिले ज्यांना सुगंधी खोड, शापित ती
गुणांशी वैर ज्यांचे...तस्करांनी तोडली झाडे...

कुणी लीडर नवी रोपे प्रसंगी लावुनी जातो
तयांच्या प्राक्तनाच्या कल्पनेने हासली झाडे...

चुना–सीमेंटच्या बागा, खुराडी माणसासाठी
रिकामी द्यायला जागा, बिचारी पांगली झाडे...

जिवांना प्राणवायू देउनी उपकार करणारी
तुम्ही–आम्ही कृतघ्नांनी, अरेरे ! कापली झाडे !...

■

## वृत्त–मंदर द्विरावृत्त

तू असल्यावर
जग हे सुंदर ...१

मुग्ध करी लय
नादवला स्वर...२

येशिल ? ये, जशि
धावुन ये सर ...३

स्वप्निच केवळ
भेट अनावर ?...४

तू जवळी जणु
स्वर्ग धरेवर !...५

तू हसल्याक्षणि
ओघळतो सर...६

तू नसता मग
काळिज कातर...७

क्रोधित भू अन्
निर्दय अंबर...८

नाव प्रशांत नि
राक्षस सागर...९

वादळ ते तरि
त्यास हवे घर...१०

■

## वृत्त–मंजुघोषा

वीषमिश्रित अमृताचा कुंभ होता
शेवटाचा तो असा आरंभ होता...

वेष होता घेतला त्याने यतीचा
पण विरक्ती कोठली ? तो दंभ होता !...

तो जळाला खाक झाला अन् तरीही
पीळ कायम राहिला ! तो सुंभ होता...

प्रेम देशाचे असो अन्य कुठले
प्रेमिकांच्या प्राक्तनी वधस्तंभ होता...

'...आणि राहू लागले दोघे सुखाने'
गोष्टिचा हा अंत ना, प्रारंभ होता...

■

## जाति–कर्णफुल्ल

काही अघटित घडते आहे
इंद्रधनू कडकडते आहे...

चित्र नवे उलगडते आहे
प्रीत तुझ्यावर जडते आहे...

एक चिमुरडे थंडीमध्ये
उघड्यावर बागडते आहे !...

अंगावरती फक्त लक्तरे
गरिबी भेसुर रडते आहे...

काटच्यांवरही आले काटे
फूल शिवी हासडते आहे !...

ऐकू ये ना कोकिळ–गाणे
कावळीण ओरडते आहे...

आभाळाची माया सरली
आग सदा पाखडते आहे...

मीच चितेवर जळल्यानंतर
मीच राख सावडते आहे...

■

## वृत्त–संगीता (स्वकृत)

शब्दांना किती काटे
नाते मखमली फाटे...

ओथंबून आभाळी
काळी काजळी दाटे...

अंताच्या क्षणी त्याचे
अक्षर फक्त फर्राटे...

थांबावे कुणासाठी
तासाचे पुढे काटे !...

तृप्तीची कुणा ढेकर
पत्रावळ कुणी चाटे...

आगी झोपड्यांना अन्
सागर नेमका आटे..

मंगल देवमूर्ती का
स्पर्शाने कधी बाटे ?...

■

## वृत्त–मंजुघोषा

का कुणाचाही कुणाशी मेळ नाही
माणसा, ही भांडण्याची वेळ नाही...

राजकारण खेळण्यातच गुंतले ते
लोकशाही माकडांचा खेळ नाही...

हाय ! हे दुर्भाग्य देशाचे असे की
देश जोडाया कुणाला वेळ नाही...

खा, किती खाणार ? काही लाजलज्जा ?
विविधतेचा अर्थ काही 'भेळ' नाही !...

मानवा, तू ईश्वराचा अंश ना, रे ?
अन् तरी चारित्र्य तव निर्भेळ नाही !...

■

## जाति–भूपति

श्वासाने माझा पाठलाग का केला
मी सोडत गेले अन् तो वेढत गेला...

कोणास रिकामा कोणा अर्धा लाभे
माझ्या करि होता भरलेला विष–पेला...

कोणास फुलांची मादक, गंधित शय्या
मी पांघरला काट्यांचा कोमल झेला...

होतेच निखारे वाटेवर धगधगते
माथ्यावरला तो चंद्रहि कोणी नेला...

कृत्रीम फुले ही गंध कोठला त्यांना
त्यांच्या मुखड्यावर मात्र सदैव तजेला !...

अंती कवितेचे कागद देही घाला
भारी कुठलेही वस्त्र नको वा शेला !...

■

## वृत्त–सती + जलौघवेगा

लढावयाला नवी लढाई हवेत अण्णा
हजार नाही, हवे करोडो असेच अण्णा...

स्वतंत्रतेची नवीन व्याख्या लिहू, चला या
नवीन संकल्प घ्यावयाचे बनून अण्णा...

तुम्ही–अम्ही घ्यायला नको वेगळी निशाणे
तिरंग झेंडा उभारुनीया उभेत अण्णा...

कुणी न एकेकटा कधी जिंकतो लढाई
उभे पाठिशी रहा जुटीने पुढ्यात अण्णा...

मनोमनी जागती ठेवु सत्य–प्रेम ज्योती
अभ्रष्ट भारत, विमुक्त भारत, प्रतीक अण्णा...

स्वदेश–निष्ठा सदा असो अंतरात जागी
तमा निवारू, उजेड आणू, मशाल अण्णा...

■

## मात्रावृत्त–अनलज्वाला

छळणाऱ्या जीवनास मी 'काय रे' म्हणालो
ते सांगे 'तू मरायचे' मी 'बरे' म्हणालो...

नका विचारू कसे मनाला तयार केले
कोसळलेल्या भिंतींना मी 'घरे' म्हणालो...

जखमा त्यांनी केल्या मजला येता–जाता
एकदाच मी काट्यांना 'बोचरे' म्हणालो...

कळून चुकले होते मजला सत्य काय ते
तरी सुखाच्या स्वप्नाला मी 'खरे' म्हणालो...

शत्रूही मित्रासम होते माझ्यालेखी
भेटतील त्या सर्वांना 'सोयरे' म्हणालो...

पडलो, उठलो, उठता पडलो पुन्हा पुन्हा मी
किती भाबडा होतो, 'दे हात रे' म्हणालो...

देशभक्त, लोकांचा नेता, लोकांसाठी
कोण असा तो ? क्षणात मी 'ठाकरे' म्हणालो...

■

## वृत्त–लयग्राही + हारीत

आता तरी हास माझ्या जिवा रे, तो येत आहे
आता समोरी सुखाचे किनारे, तो येत आहे...

आनंद आता मुळी दूर नाही, दुःखा न थारा
या आसवांनो, तुम्हीही हसा रे, तो येत आहे...

बागेतली फूल –पाने कशी ही गाती मजेने
काट्यांस सांगा खुषीने फुला रे, तो येत आहे...

का श्वास मंदावला, वाढला का, हृदया विचारा
प्रीतीच का भीतिचे हे शहारे, तो येत आहे...

कोणा हवासा, कुणाला नकोसा, वाटे तरीही
टाळून सारे खडे ते पहारे, तो येत आहे...

संदेश नाही, न गाजा, न वाजा, राजा असा तो
सनई न वाजे, न भेरी नगारे, तो येत आहे...

त्याला नको स्वागताची तयारी, तो मित्र सच्चा
येतो अचानक, तुला न्यावया रे, तो येत आहे...

■

## मात्रावृत्त–पादाकुलक

जीवन कसले, हा तर चकवा
जिवंत मी, ही निव्वळ अफवा...

मना शिकविली माया ममता
जणू लाविल्या जिवास जळवा...

शत्रु, मित्र हे समानधर्मी
शत्रु खरा अन् मित्रच फसवा...

औषध पाण्याने जाईना
हा तर प्राणांमधला थकवा...

पापणीत जे साचुन येते
पाणी अडवा पाणी जिरवा...

ह्या विश्वाचा धर्म 'प्रेम' हा
कुणीतरी रे काढा फतवा...

घरे मिळू द्या हक्काची मग
झोपडपट्ट्या नंतर उठवा...

पहिल्या प्रेमासाठी जपला
मनी कोपरा अजून हळवा !...

प्रणयाची एकांत रात्र ही
दिव्यासवे हा चंद्र मालवा...

■

## वृत्त–सूर्य

जो कळीचे फूल होते
चूक किंवा भूल होते...

वाट असते सरळ साधी
वाकडे पाऊल होते...

पोट प्रेमाने भरेना
स्वप्न तेव्हा चूल होते...

दूर होता पैल त्यातच
मोडलेले पूल होते...

घोंगडी त्याने दिली तर
रेशमाची झूल होते...

आजही असतात 'कुंती' !
केरकुंडित मूल होते ! !...

■

## वृत्त–मंजुघोषा

काय सांगावे, कशाचा राग आला
देशभक्ती लोपल्याचा राग आला...

बेभरोशी पावसाचा राग आला
कोरड्या आश्वासनाचा राग आला...

पाहिले जेव्हा कुपोषित बालकांना
भ्रष्ट, स्वार्थी शासनाचा राग आला...

आदिवासी बांधवांचे हाल बघुनी
माणसे मुर्दाड ! याचा राग आला...

जाहिरातीचा नवा फंडाच हाही
दु:खदर्शन पाहण्याचा राग आला...

चार ओळी लिहुन काही साधते का ?
ह्या विचाराने स्वत:चा राग आला...

■

## मात्रावृत्त–लवंगलता

कोवळ्या रक्तास त्यांनी बनविले आतंकवादी
देशनेत्यांचाच कावा घडविले आतंकवादी...

जन्मलेल्या बालकाला धर्म नसतो, जात नसते
धर्मवेडे करुन त्यांनी उभविले आतंकवादी...

रेष आखुन देश केले, तोडले लचकेही आधी
शांततेचे शत्रु बनुनी घुसविले आतंकवादी...

मानवाच्या जातिलाही काळिमा फासून त्यांनी
निरपराधी माणसाला ठरविले आतंकवादी...

सहनशक्तीवान आम्ही, धर्मही अमुचा सहिष्णू
ठेवुनी बडदास्त आम्ही जगविले आतंकवादी..

काय ही शोकांतिका ! की विसरला माणूस मूल्ये
जन्मला माणूस म्हणुनी, म्हणविले आतंकवादी !!

■

## मात्रावृत्त–पादाकुलक

तुझे नि माझे नाते सुंदर
तू–मी मिळुनी एकच अक्षर...

हात उंच केला थोडा अन्
हाति नभाचे आले झुंबर...

ह्या हृदयाचा महाल झाला
तू आल्यावर, तू आल्यावर...

तृप्त मनाचा चकोर झाला
चंद्रकरांचा पिऊन पाझर...

ओसंडुन वाहे हा पेला
कसा प्रीतिला घालू आवर ?...

राधा–माधव संगम होता
कुठे नदी अन् कुठला सागर

देशिल तर दे कडु निंबोळी
माझ्यासाठी तीही साखर...

समर्पिता मी सर्वस्वाने
अता न साहे, उरले अंतर...

दर्वळलेले सारे जीवन
दिव्य प्रीतिचे अद्भुत अत्तर !...

■

## वृत्त–कामिनी

सांगते तुला खरे खरे
तू मनात राहतोस रे...

नेत्र बंद ठेविले तरी
रूपही दिसे तुझेच रे...

दर्वळे सुगंध भोवती
ही तुझीच स्पष्ट खूण रे...

दृष्टि लाघवी तुझी अशी
प्रेम मूर्तिमंत पाझरे...

फक्त फूल मी न वाहिले
प्राण ठेविले फुलात रे...

तूच कोरली मनामधे
प्रेम ही अडीच अक्षरे...

बोलवायचे कुणी कसे ?
सर्व अंतरे तुझी घरे...!

■

## वृत्त–व्योमगंगा

पाहिले नाही तुला मी हे मनीचे शल्य, आई
वाहते रक्तात माझ्या पण तुझे वात्सल्य, आई...

तू दिले अस्तित्व प्राणा पेटवुन चैतन्यज्योती
पूर्ण पूर्णातुन घडले, हे तुझे साफल्य आई...

दुग्धरूपी अमृताचा थेंब ओठी घातला तू
शुद्धता तू पेरली अन् पेरले मांगल्य आई...

देवकी किंवा यशोदा फक्त नावे वेगळाली
कृष्णरूपे अवतरे ते प्रेम तव जाज्वल्य आई...

मी अनामिक ओघ आहे त्या चिरंतन शाश्वताचा
जाणते मी तूच ईश्वर तूच तू कैवल्य आई...

■

## छंद–अष्टाक्षरी

मागे पाहायाचे नाही, असे वळून जातांना
मधे विझायचे नाही, कधी जळून जातांना...

दाणे पेरीत जायचे, पाठी येणाऱ्यांच्या साठी
काटे घ्यायचे वेचून, वाट मळून जातांना...

तम होऊनिया दूर, सूर्य दिसणार आहे
नये चांदणे आठवू, रात्र ढळून जातांना...

रोज येतच असते. हाती किरणांचे दान
ज्योत उजळून घ्यावी, उन्हे टळून जातांना...

ऋतू येतो आणि जाती, नियतीचा नित्यक्रम
मोहोराने फुलायचे, पुन्हा गळून जातांना...

■

## वृत्त–मंजुघोषा

एकदा ओठात हासू दर्वळाचे
आसवांनीही मजेने ओघळावे...

एकदा तरि सूर मजला सापडावा
गीत जखमेतून माझ्या भळभळावे...

एकटी ही नम्र होडी बुडवितांना
वादळाने फक्त थोडे हळहळावे...

एकदा दु:खात माझ्या साथ द्यावी
ऊर फुटुनी या ढगांनी कोसळावे...

खणुन स्वप्नांची मुळे जी खोल गेली
मीच कवितेतून माझ्या उन्मळावे...

■

## वृत्त–पादाकुलक

सांजवेळ ही उदास कातर
मारव्यातला रिषभाचा स्वर...

अंधाराने गिळून टाकले
रंग सांडले जे क्षितिजावर...

पापणीसही सांभाळेना
ओघळणारा मोत्याचा सर...

कुणी दिले आमंत्रण त्याला ?
कशास आला चंद्रहि चत्कर ?...

वेंधळेच अन् गोंधळलेले
फुलपाखरु बसले काट्यावर...

काळजात रुतुनी बसलेला
तोच प्रियाच्या मौनाचा शर...!

■

## तीन शेर – वृत्त – मृगाक्षी

तुझ्याशी जीवना हा रोज तंटा
कैसे हे दैव माझे ? मी करंटा...

रुजेना बीज येथे कोणतेही
मला तू व्यापले, रे वाळवंटा !...

नसे काही तयारी नाटकाची
कशा झाल्या तरीही तीन घंटा ?...

■

## एक मुक्तक...

माणसांनी माणसांचे मित्र व्हावे
माणसांनी माणसांना प्रेम द्यावे
शेख वा जोशी असा, वा कांबळे
माणसातील माणसाला ओळखावे...

■

## बोलगझल १ (वृत्त नाही)

मजला पडला, मात्र शाबूत पोटमाळा आहे
यात्री निघून गेला तरी धर्मशाळा आहे...

चालता चालता उन्हं झेलत, दमून येईल कोणी
त्याच्यासाठी माठात पाणी, पाण्यात वाळा आहे...

एक गाव, एकच नदी, पाणवठाही एकुलता
माणसा-माणसात जातींचा का सवता गाळा आहे ?...

सावित्री, तूही एकदा फिरून जन्म घेशील ?
येऊन बघ, गावोगावी कन्याशाळा आहे !...

दहा, नऊ, आठ, सात, उलटी मोजणी सुरू
खचलेले मन त्याला एवढा एकच चाळा आहे...

■

## बोलगझल २ (वृत्त नाही)

आता केवळ एकच कर
तू सत्याचीच कास धर...

अहिंसा हा ठरतो गुण
पण तू सिंह असशील तर !...

केल्या कोणी चुका तरी
शिक्षा ही, की माफच कर...

झालिस तू कंगाल अता
संपले ना ? मोत्याचे सर !...

रोजचे मरणे जमणार का ?
नाही ? तर मग खुश्शाल मर...

■

# परिशिष्ट –१

मी लिहिलेली ही पहिली गझल. लेखन–दिन आहे २७ मे १९५९. त्यावेळी ह्या रचनेला गझल म्हणतात हेही मला ठाऊक नव्हते. १९७९ साली 'रंग माझा वेगळा' हा संग्रह वाचनात आला व कविश्रेष्ठ सुरेश भट यांची भेट १९८० साली झाली. तोपर्यंत मी लिहिलेल्या गझलांचे काही शेर जसेच्या तसे रसिकांच्या अवलोकानार्थ दिले आहेत. त्यात त्रुटी आहेत, हे आलेच. पण निकषांनुसार त्यातील गझलत्व तज्ज्ञांना मान्य आहे.

वृत्त–देवप्रिया (हे कालांतराने कळले)
दु:ख माझ्या अंतरीचे काय सांगू साजणी
आठवूनी नीर दाटे आज माझ्या लोचनी...
आज आहे भंगलेले रम्य इंद्राचे धनू
सप्तरंगांचे अपूरे चित्र रेंगाळे मनी...
कुस्करीला हासणारा मत्त प्रीती–मोगरा
धुंद निर्माल्यात होणे हेचि राहे जीवनी...
मीच कस्तूरी–मृगाते क्रूरहस्ते विंधिले
गंध ज्याचा दर्वळे ग आजही विश्वातुनी...
आज पश्चात्ताप–वन्ही जाळितो ह्या मानसा
आणि मागे राहिली ग प्रीतिरक्षा प्रांगणी...

■

१९५९ नंतरच्या व १९८० पूर्वीच्या काही गझलांमधील काही शेर कालानुक्रमाने पुढे देत आहे.

(१) आसवे ढाळू नको तू मूक ही रे मन्मना
शक्त का ती संपवीण्या अंतरीच्या यातना ?...
रे वृथा सांडू नको तू आसवे, मोत्ये तुझी
मोल त्यांचे जोवरी ना वाटते येथे कुणा.....१५ ऑक्टोबर १९६१

(२) निराळी तुझी वाट थांबू नको रे
कशी येउ मी साद घालू नको रे...
इथे संपले आपुले आज नाते
क्षणाचेच जन्मास जोडू नको रे.....१० नोव्हेंबर १९६४

(३) तुटलेल्या पंखांनी आज मला उडायचे
शर सांभाळीत उरी जीवन हे जगायचे...
ज्ञात कुणा कितिवेळा असेच हे घडायचे
येईतो मरण खरे पुन्हा पुन्हा मरायचे .....२२ ऑक्टोबर १९६८

(४) आज इथला शामियाना मैफलीने धुंद आहे
सूर इथले सुर न केवळ या सुरांना गंध आहे...
मौक्तिकांना ह्या स्वरांच्या विखुरणारा वेध आहे
विखुरली मोत्ये अम्हा ती वेचण्याचा छंद आहे.....३० ऑक्टोबर १९७२

(५) तू स्वप्नफूल माझे नियतीस वाहिलेले
तू भावगीत माझे कधिही न गाइलेले ...
तू स्वप्पफूल माझे नियतीस वाहिलेले
माझे अता न काही मी रिक्त राहिलेले....१३ जुलै १९७३

(६) स्वप्नामधून स्वप्ने फुलवून रात्र गेली
काळोख चांदण्याने उजळून रात्र गेली...
शब्दाशिवाय जे जे ओठावरी उमलले
कानात अर्थ त्याचा सांगून रात्र गेली ....६ डिसेंबर १९७३

(७) भावविव्हल पापण्यांना आसवांची ओढ आहे
तू कधीकाळी दिलेल्या वेदनेचे वेड आहे...
तू दिलेली ठेव-क्षण ते आज मी जपते उराशी
फक्त आता त्या स्मृतींची जीवनाला जोड आहे .....१८ एप्रिल १९७४

पुढील गझल प्रिय बेगम अख्तर गेल्याची बातमी आली त्यादिवशी लिहिली. तारीख नोंदलेली नाही.

(८) चांदणे आलापतांना थांबली कोजागिरी
मूक झाल्या आज गझला आणि ती गझलेश्वरी..
आज हरपे मैफलीचा कोहिनूरी दागिना
सोसवेना दु:ख सारंगीस, रडते बासरी...
हरपली लय, जाहला हा दादरा वेडापिसा
पोरके करुनी सुरांना निघुन गेली ठुंबरी..
हाय ! रसिका ठेव आता अंतरी ते सूर तू
रंगणे आता कुठूनी मैफली त्या अख्तरी ....१९७४ (?)

(९) हीच माझी वाट, ही नेईल तिकडे जायचे
बोचले काटे तरी चालायचे...चालायचे.....१० डिसेंबर १९७५

(१०) काय केले जीवनी या मी खरे ?
बांधिली वाळूत वाळूची घरे...
लाट येता घेउनी गेली खुणा
शिंपल्यांची रास हाताशी उरे...
भ्याड ते अन् धिक् तयांची जीवने
प्यार ज्यांना लौकिकाचे पिंजरे .....२० एप्रिल १९७५

(११) संस्कृती ही तीन केवळ अक्षरे
अर्थ त्यांना कोठला आता उरे ?...
वाहती वेगात वारे पश्चिमी
ढासळू बघती युगांचेही चिरे...
येथल्या प्रामाणिकां मिळते सजा
बेइमानी मात्र हा सद् गुण ठरे...
लाज मर्यादा उभ्या भांबावुनी
नग्नतेला तो खुदाही घाबरे !...
होत नाही भक्तिही सौद्याविना

भ्रष्ट झाले देवही अन् मंदिरे...
चंद्र आला जवळ बुद्धी जिंकली
मात्र माणुस माणसाला अंतरे...
स्वार्थ फैलावे, तिथे वेशीवरी-
लोंबती माणूसकीची  लक्तरे .....२३ ऑगस्ट १९७५

(१२) मी चालतेच, गेले रस्ते निघून दूर
माझ्याच जीवनाचा होतो मलाच भार...
घेऊन चालते मी माझेच प्रेत स्कंधी
थांबून पाहती अन् पळती लहान-थोर...
मुर्दाड आणि कोणी पाहून प्रेतयात्रा
थुंकूनिया अवंढा लावून घेति दार...
हा एक रूढिप्रेमी वेडा मला विचारी
प्रेतावरी कसा हो ह्या एकही न हार ? .......२३ सप्टेंबर १९७५

■■■

# गझल लिहू पाहणाऱ्यांसाठी व आस्वादकांसाठी हे थोडक्यात विवेचन...

**– संगीता जोशी**

गझल ही प्रथमत: कविताच आहे. जसे अभंग, लावणी, पोवाडा, सुनीत इ. कवितेचे प्रकार आहेत, तसाच गझल हा कवितेचा एक प्रकार आहे. गझल शब्द स्त्रीलिंगी आहे. गझल ही वृत्तातच लिहिली जाते. ती वृत्तबद्ध आहे. त्यामुळे तिला वृत्ताचे नियम आहेत.

गझल ही फारसीतून उर्दूत व उर्दूतून इतर भाषांमधे आली. त्यामुळे उर्दूमधील काफिया (यमक) व रदीफ (अंत्ययमक) आपण तसेच स्वीकारणे अपरिहार्य आहे. कारण रचनेच्या दृष्टीने तीच गझलची ओळख आहे. मात्र मराठी गझलेतील कल्पना, विचार इ. अस्सल मराठी असावेत. उर्दूतील काव्याची उधारी – थोडक्यात, चोरी– नसावी.

गझलेचे रचनातंत्र समाजावून घेऊन कोणताही उत्तम कवी गझल लिहू शकेल. अवघड काहीच नाही. वृत्त हा एकप्रकारचा तालबद्ध ठेका असतो. लय असते. मात्रांची गणना असते. लघु-गुरु अक्षरांचा ठराविक क्रम असतो. त्यामुळे ज्याला लय साधली असेल असा कवी, ठराविक समान अंतरावर हाताचे ठोके (Strokes) देऊन सहज गझल वृत्तात बांधू शकतो. सरावाने लेखनात सहजता येते, व कृत्रिमतेचा दोष दूर होतो.

गझल मधील प्रत्येक शेर स्वतंत्र असला पाहिजे. दोन ओळीत एक पूर्ण थीम मांडलेला असला पाहिजे. अर्थासाठी आधीच्या व पुढच्या शेरावर तो अवलंबून असता कामा नये. या अर्थे, गझलचा प्रत्येक शेर, एक स्वतंत्र कविता असते.

(स्पष्टीकरणासाठी पुढे जी उदाहरणे आली आहेत, त्यांतील सर्व मराठी-शेर माझे-म्हणजे संगीता जोशीचे आहेत. हिंदी उदाहरणात कवींची नावे दिली आहेत.)

**यमक**

गझलेत प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीत समउच्चारी शब्द येतात. पहिल्या शेराच्या दोन्ही ओळीत ते येतात. पहिल्या शेराला 'मतला' म्हणतात. पुढील शेर पाहा –

(०)

**वृत्त–जलौघवेगा**

*मुळी न केला विचार तेव्हा*
*खुशाल केला करार तेव्हा...*
*नकोच होता घडावया जो*
*घडून गेला प्रकार तेव्हा...*
*अशी कशी हारले कळेना*
*न खेळताही जुगार तेव्हा...*
*जपून मी ठेविला मनाशी*
*दिलास जो तू नकार तेव्हा...*

येथे पहिल्या शेरात आलेले विचार, करार हे समउच्चारी शब्द दोन्ही ओळीत आलेले आहेत. त्यामुळे आता यमकाचा 'शब्द' निश्चित झाला. आता याच उच्चाराचे इतर शब्द पुढील शेरांच्या दुसऱ्या ओळीत यायलाच पाहिजेत. प्रकार, जुगार, नकार...इ. तसे शब्द आहेत. असे आणखीही शब्द सुचतील. जसे हजार दार, वार, हुशार, इ. पण या मालिकेत 'उशीर' किंवा मयूर, केर इ. शब्द चालणार नाहीत. कारण आपल्या यमकातील शेवटचे 'र' अक्षर जरी त्यांच्यात असले तरी अलीकडचे अक्षर आकारान्त नाही. म्हणून वरील गझलेत ते शब्द नकोत. त्यांच्या समउच्चारी शब्दांची वेगळी गझल होऊ शकते. उदा. १) उशीर, धीर, नीर, तीर इ. किंवा २) मयूर, दूर, सूर...इ.

यातील पहिल्या उदाहरणात 'र' च्या आधी ई–कार आला आहे व दुसऱ्या उदाहरणात 'ऊ' कार आला आहे. कारण श् + ई = शी, ध् + ई = धी, स् + ऊ = सू व य् + ऊ = यू, द् + ऊ = दू

यमकाची आणखी काही उदाहरणे (यमके अधोरेखित)

१) **दिलके अरमाँ आसुओंमें बह गए**
हम वफ़ा करके भी तनहा रह गए (मतला).
शायद उनका आख़री हो ये सितम
सोचकर ये हर सितम हम सह गए...

२) **वृत्त : मृगाक्षी**
जरी ह्या जीवनाचा राग आहे
तरीही श्वास घेणे भाग आहे ....(मतला)

मुळांनी गाडले आहे स्वत:ला
फुलांसाठी त्यांचा त्याग आहे...
कुणी राहू नये गर्वात खोट्या
इथे सूर्यावरीही डाग आहे...

३) **वृत्त–कलापती**
हास लाजऱ्या फुला अजून एकदा
दे सुगंध आपुला अजून एकदा...
सप्तरंग रेखुनी कमान अंबरी
बांधतील का झुला अजून एकदा...

४) **वृत्त – आनंदकंद**
दु:खा सरू दिले हे उपकार मानते मी
मजला मरू दिले हे उपकार मानते मी (मतला)
माझीच फुफ्फुसे अन् माझेच श्वास होते
मज वापरू दिले हे उपकार मानते मी...
सोशीकतेस माझ्या नाही विरोध केला
अश्रू झरू दिले हे उपकार मानते मी ...

५) **मैं जिंदगीका साथ निभाता चला गया**
हर फिक्र मो धुएमें उडाता चला गया...
बरबादियोंका सोग़ मनाना फिजूल था
बरबादियोंका जश्न मनाता चला गया...
जो मिल गया उसीको मुक़द्दर समझ लिया
जो खो गया मैं उसको भुलाता चला गया...
**(साहिर लुधियानवी)**

६) **अपना तो जमानेमें बस इतना फ़साना है**
कुछ हम भी दिवाने है कुछ दिलभी दिवाना है...
ये राज़ है उल्फतका दुनिया इसे क्या जाने
नज़रोंका चुरानाही नज़रोंका मिलाना है...

इन शोख हसीनोंपर हम और लुटाए क्या
कुछ पास नहीं अपने बस् दिलका <u>खज़ाना</u> है
**जाँनिसार अख्तर**

७) **तुम नहीं, गम नहीं <u>शराब</u> नहीं**
ऐसी तन्हाईका <u>जवाब</u> नहीं...
गाहे गाहे इसे पढा कीजे
दिलसे बढकर कोई <u>किताब</u> नहीं...
जाने किस किसकी मौत आयी है
आज रुखपे कोई <u>नक़ाब</u> नहीं...
वो करम उंगलियोंपे गिनते है
जुल्म का जिनकी कुछ <u>हिसाब</u> नहीं...

**– सईद राही**

**रदीफ (अंत्ययमक)**

काफियाच्या (यमकाच्या) नंतर येणारा शब्द म्हणजे रदीफ किंवा अंत्ययमक. सुरवातीला दिलेल्या (Zero) गझलेत 'विचार, करार, प्रकार जुगार, नकार' इ. यमकाच्या शब्दांनंतर प्रत्येक वेळी 'तेव्हा' ही रदीफ आली आहे. यमकाची उदाहरणे पुन्हा पाहा. त्यातील रदीफ (अंत्ययमक) सहज ओळखू येईल.

उदा. क्र. १) 'गए' ही रदीफ
२) 'आहे' ही रदीफ
३) 'अजून एकदा' ही रदीफ
४) 'दिले हे उपकार मानते मी' ही रदीफ
५) 'चला गया' ही रदीफ
६) 'है' ही रदीफ
७) 'नहीं' ही रदीफ

(उर्दूतील रदीफ हा शब्द स्त्रीलिंगी आहे व काफिया हा शब्द पुल्लिंगी आहे. मराठीत यमक व अंत्ययमक हे दोन्ही शब्द नपुंसकलिंगी आहेत.)

अंत्ययमक (रदीफ) एका पासून अनेक शब्दांपर्यंत असू शकते हे वरील उदाहरणावरून लक्षात येईल. चौथ्या क्रमांकात दिल्याप्रमाणे ते लांबलचकही असू शकते.

त्याचबरोबर, गझलेत रदीफ नसली तरी चालते. अशा गझलेला 'गैरमुरद्दफ' गझल म्हणतात.

मात्र, काफिया (यमक) अत्यावश्यक असतो. काफिया नसेल तर ती 'गझलच' होणार नाही.

**(गैरमुरद्दफ गझलेची उदाहरणे (रदीफ नसलेल्या) (यमक अधोरेखित) हिंदी)**

८) **कहीं बेखयाल होकर यूंही छू लिया किसीने**
कअी ख़्वाब देख डाले यहाँ मेरी बेखुदीने...
कभी इस परीका कूचा, कभी उस हंसींकी मेहफिल
मुझे दर बदर फिराया मेरे दिलकी सादगीने...
है भलासा नाम उसका मैं अभीसे क्या बताऊं
किया बेकरार अक्सर मुझे एक आदमीने...

**– मजरूह सुल्तानपुरी**

९) **न सोचा न समझा न सीखा न जाना**
मुझे आ गया खुद ब खुद दिल लगाना ...(मतला १)
जरा देखकर अपना जल्वा दिखाना
सिमटकर यहीं आ न जाए ज़माना...(मतला २)
जबाँपर लगी है वफाओंकी मुहरे
खमोशी मेरी कह रही है फ़साना...
करो लाख तुम मातमे – नौजवानी
'कदिर' अब नहीं आयेगा वो ज़माना...

**– कदिर लखनवी**

'९' या गझलेत दोन मतले आले आहेत. कारण पहिल्या दोन्ही शेरात प्रत्येक ओळीत काफिया आला आहे. असे दोन मतले आले असतील तर दुसऱ्या मतल्यास 'हुस्ने – मतला' म्हणतात.

याच गझलेत शेवटच्या शेरात कवीने आपले नाव एका ओळीत गुंफले आहे. अशा शेरास 'मक्ता' म्हणतात. मक्ता म्हणजे मालकी. मक्ता असणे ऐच्छिक आहे. बंधनकारक नाही. मराठी गझलेत सहसा मक्ता आढळून येत नाही. पण काही कवी लिहितातही.

**(गैरमुरद्दफ गझलेची उदाहरणे – मराठी)** (यमक अधोरेखित)

**१०) (वृत्त – मृगाक्षी)**

गळे हे रक्त माझे, ही न <u>शाई</u>
सुरु माझीच माझ्याशी <u>लढाई</u>...
जगाने सोलले काळीज माझे
पुन्हा ह्या आसवांनाही <u>मनाई</u>...
हिऱ्यांची अक्षरे माझी तरीही
जमेला कोळशाची ही <u>कमाई</u>...
नसे हा फार मोठा ग्रंथ माझा
मला तू वाच, मी साधी <u>रुबाई</u>...

**११) (वृत्त – आनंदकंद)**

आता तरी फुलांच्या वाटे नकोस <u>जाऊ</u>
हे रुप कागदी अन् ते रंगही <u>दिखाऊ</u>...
आकाश ही कसे हे उंची दुकान झाले
तारे महाग येथे... हा चंद्रही <u>विकाऊ</u>...
केव्हातरी तुझी ही संपायचीच स्वप्ने
ती काचखेळणी का होती कधी <u>टिकाऊ</u> ?
माझ्या मनातले मी कोणास दु:ख सांगू ?
जे भेटले, निघाले ते <u>कातडीबचाऊ</u>...
देतोस जीवनाला कामे तुझी स्वत:ची
तू ही खरेच मृत्यो, आहेस <u>ऐतखाऊ</u> !

**१२) (वृत्त – मंजुघोषा)**

एकटी स्त्री आजला रस्त्यात <u>आली</u>
कांकणे केलीत काळाच्या <u>हवाली</u>...
आज आकाशा जरा सांभाळ तू ही
तारकांच्या वेगळ्या ह्या <u>हालचाली</u>...

गझल ही छंदोबद्ध कविता आहे ती विविध वृत्तांमध्येच लिहिली जाते. आपल्याला शालेय अभ्यासात ऐकलेली वृत्तांची नावे आठवत असतील. जसे शार्दूलविक्रीडित,

वसंततिलका, पृथ्वी इ. जी वृत्ते आवर्तनी असतात त्यातच शक्यतो गझला लिहिल्या जातात. अशी अनेक वृत्ते आहेत. 'आवर्तनी' ह्या गुणधर्मामुळेच वृत्त वापरणे सोपे होते. अशी वृत्ते कवींना माहीत व्हावीत म्हणून माधव ज्यूलियन यांनी ''छंदोरचना'' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यात उदाहरणेही आहेत. अभ्यासूंनी व जिज्ञासूंनी तो ग्रंथ अवश्य वाचावा. ग्रंथात ९०० च्या पेक्षा जास्त वृत्ते दिली असली तरी गझलची प्रचलित वृत्ते कमी आहेत.

वृत्तांना उर्दूत 'बहर' (वाचताना 'बेहेर' असे म्हणायचे) म्हणतात. परिचयाखातर काही वृत्ते पुढे दिली आहेत.

वृत्तांपूर्वी लघु व गुरु अक्षरे याबद्दल माहिती घेऊ. साधारणपणे झटकन उच्चारली जाणारी अक्षरे लघु असतात व ज्यांना उच्चारायला किंचित अधिक वेळ लागतो. ती अक्षरे गुरु मानली जातात. उदाहरणांनीच हे स्पष्ट होईल. लघु अक्षरांकरता (U) अशी व दीर्घ अक्षरांकरता (–) अशा खुणा वापरतात.

**१३) राहिले आहेच आता काय हाती**

लघुसाठी 'र' आणि गुरुसाठी 'ना' अक्षर घेऊन वरील क्रम असा होईल –

ना र ना ना ना र ना ना ना र ना ना
याची समान आवर्तने अशी पडतील –
नारनाना । नारनाना । नारनाना । (एकूण १२ अक्षरे)
ही ओळ 'मंजुघोषा' या वृत्तात आहे.
(आवर्तन – पुन्हा पुन्हा येणे)

आता यापुढील सर्व ओळी ह्याच वृत्तात, ह्याच लघु-गुरु क्रमात आल्या पाहिजेत. जेथे उभ्या रेघा दिल्या आहेत तेथे तोडून ही ओळ लयीत वाचता येते अशी –

राहिले आ । हेच आता । काय हाती
दुसरी ओळ – चंद्र पाऱ्याचा कशाच्या चांदराती...
दुसरा शेर – छेदुनी गेली उभे आयुष्य काळा,
कर्वतीची ही तुझी निष्ठूर पाती...

**१४) 'मंजुघोषा' वृत्ताचे आणखी एक उदाहरण –**

(लघु–गुरु अक्षरे तुम्ही ओळखून वृत्त तपासावे)

ये पुन्हा तू, घाव घालाया जिव्हारी
तू दिलेल्या, वेदनेलाही खुमारी..
वादळाने गुप्त कारस्थान केले
नाव माझी बापडी होती किनारी...
रंग होता, गंध होता, त्या फुलांना
जीव जातांना कळाले, ती विषारी...

ह्या गझलेतही अक्षरांचा क्रम 'ना र ना ना' तीन वेळा असाच आहे हे लक्षात येते.

क्र. १३ व १४ ह्या दोन्ही गैरमुरद्दफ गझला (रदीफ नसलेल्या) आहेत. यमके अधोरेखित केली आहेत. यमकांच्या नंतर ठराविक शब्द येत नाही (म्हणजे रदीफ येत नाही) त्या गझलेला गैरमुरद्दफ गझल म्हणतात, हे मागे आलेच आहे.

आणखी एक वृत्त (बहर) पाहू.

१५) मी जराशी । जो फुलाया । लागले
हे ऋतू का । मावळाया । लागले...
भाग्य माती । चे निघाले । वेगळे
सूर्य पोटी । अंकुराया । लागले...
सोडले आ । युष्य मी वा । ऱ्यावरी
तोल त्याचे । सावराया । लागले...

वरील शेरांचे वजन नारनाना । नारनाना । नारना असे आहे. हे वृत्त 'मेनका' आहे. मंजुघोषामध्ये शेवटचे एक गुरु अक्षर गाळले की हे वृत्त (११ अक्षरे) होते.

**१६) मेनका – आणखी एक उदाहरण –**

एकमेकां सांगती ही माकडे
माणसांना माणसांचे वावडे...
कोणता हा सण नवा रे, माणसा
घालिशी रस्त्यात रक्ताचे सडे ! या दोन शब्दात १५ व १६ यांचे निरीक्षण करू या.

क्र. १५) मध्ये यमके अधोरेखित आहेतच. 'लागले' हा रदीफ आहे. क्र. १६) मध्ये रदीफ नाही. यमक स्पष्टच आहे. रस्त्यात व रक्ताचे 'र' हे अक्षर सुटे आहे म्हणून ते लघु भासेल पण उच्चारतांना 'स्त्या'चा जोर 'र' अक्षरावर येतो तसेच 'क्ता' चा जोरही 'र' वर येतो. म्हणून दोन्ही 'र' गुरु होतात. (उच्चारून पाहा – रस्ता, रक्त...)

'सण' हा दोन लघु अक्षरांचा शब्द असून तो एका गुरु अक्षराऐवजी आला आहे. कवीला केव्हा केव्हा ही सूट घेता येते. अपरिहार्य असेल तरच.

काही सोपी वृत्ते व उदाहरणे.

**१७) भुजंगप्रयात – लक्षण 'रनाना' हे क्रमाने चार वेळा –**

''संत रामदास कृत 'मनाचे श्लोक' भुजंगप्रयात वृत्तातच आहेत.''

पुन्हा एकदा झुंजण्याचा इरादा
तुला जीवना जिंकण्याचा इरादा...
असे जीव पंखात किंवा नसू दे
परी पिंजरे तोडण्याचा इरादा...
निवाली जरा राख माझी उद्या की
पुन्हा त्यातुनी जन्मण्याचा इरादा...
यमक (काफिया) अधोरेखित व रदीफ – इरादा

अगदी सुरुवातीची गझल (Zero नंबरची) जलौघवेगा वृत्ताची आहे. त्याचे वजन रनारनाना । रनारनाना । असे आहे. त्याच वृत्तातील पुढील हे उदाहरण –

**१८) दुरावलेला वसंत आहे**

तरी पहा मी जिवंत आहे...
बरीच देणी अजून बाकी
मनात ही फक्त खंत आहे...
नवीन पंखात जोम जेथे
तिथे नवा आसमंत आहे.
यमक स्पष्ट आहे. 'आहे' ही रदीफ आहे.

**१९) वृत्त – कलापती –**

हास लाजऱ्या फुला अजून एकदा
दे सुगंध आपुला अजून एकदा...

जीवना, पुन्हा तुला 'तसे' फुलायचे
हा वसंत घे तुला अजून एकदा...

**२०) कलापती –**

मागणे बरे नव्हे कुणास चांदणे
यापुढे म्हणायचे उन्हास चांदणे...
छेडिलास मारवा जिथे कधीतरी
राहते तिथेच आसपास चांदणे...
दाखवू नकोस रे मना, कधी कुणा
जाळते कसे तुझ्या जिवास चांदणे...

कलापतीचे वजन (नार) ६ वेळा + ना. (एकूण १३ अक्षरे)

१९) मध्ये 'अजून एकदा' ही रदीफ.

२०) मध्ये 'चांदणे' ही रदीफ.

अशी आणखीही वृत्ते सांगता येतील पण तूर्त ही पुरेशी आहेत, असे वाटते. कारण लिखाणाच्या दृष्टीने ते अवघड वाटते.

आता काही मुद्यांचा फक्त उल्लेख करत आहे. ते महत्त्वाचे आहेत.

अ) गझलचे वृत्त सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकच असावे. लघु–गुरु क्रम व्यवस्थित पाळावा.

ब) गझलेचा प्रत्येक शेर स्वतंत्र असावा. एक शेर म्हणजे एक कविता, एक अनुभव. एक शेर सुटा करुन वाचला तरी तो अर्थदृष्ट्या परिपूर्ण असला पाहिजे.

क) गझल ही प्रतीकांची भाषा आहे. शेर अर्थाकडे निर्देश करतात. वर वर भासणाऱ्या अर्था शिवाय खोल अर्थही दडलेला असू शकतो. मात्र ही अट नाही. तर ते गझलचे सौंदर्य आहे. साधे सरळ अर्थाचे शेरही सुंदर असू शकतात.

ड) शेरांची भाषा सोपी तरीही इतरांच्या हृदयाला भावणारी, भिडणारी असावी. ते गझलचे वैशिष्टय आहे. अशा सोप्या अर्थपूर्णतेलाच 'गझलियत' किंवा तग़ज़्जुल म्हणतात. प्रत्येक कवीच्या प्रत्येक शेरात हा गुण असू शकत नाही. अगदी गालिबच्या ही !

इ) शेराच्या (एका शेराच्या) दोन ओळींमध्ये परस्पर संबंध असला पाहिजे. याला 'रब्त' म्हणतात.

पु. लं. च्या लिखाणात एक बाई एक उखाणा घेते तो विनोदी उखाणा असा आहे –

समोरच्या कोनाड्यात उभी हिंदमाता !

बेंबट्याचं नाव घेते माझा नंबर पहिला !!

कशाचा कशाशी संबंध आहे का? हसवण्यासाठी तो उखाणा चांगला आहे. पण शेर असा नसावा !

ई) एकाच गझलेतील वेगळे वेगळे शेर भिन्न-भिन्न विषयांवर असू शकतात. प्रेम, तत्त्वज्ञान, जीवनानुभव असे विभिन्न विषय एकाच गझलेत हाताळता येतात.

ए) एखादी संपूर्ण गझल एकाच विषयावरील विभिन्न शेरांची असू शकते. पण तेव्हाही प्रत्येक शेर अर्थदृष्ट्या स्वतंत्र व परिपूर्ण असला पाहिजे. साधी कविता ही एकाच विषयावर असते व ती सुरुवातीपासून शेवटाकडे उलगडत जाते; शेवटी कवितेचा Climax (क्लायमॅक्स) येतो. मात्र गझलेचे तसे नसते. प्रत्येक शेर हाच जणू Climax असतो. म्हणून गझल ही 'कवितांची कविता' आहे. Gazal is a 'Series of Climaxes.'

ऐ) गीत व गझल यातही फरक आहे. गीताला ध्रुवपद कडवी असतात; व गीतात वर्णनात्मक विषय, भावाची अभिव्यक्ती सलगपणे येते. गझल कशी असते हे आत्तापर्यंत आलेच आहे.

ओ) काही शब्दामधील अक्षरांचे लघु-गुरु ठरवितांना सावध असावे लागते. पुढील अक्षराचा आघात जर आधीच्या अक्षरावर येत असेल, (उच्चारतांना) तर असे अक्षर लघु असले तरी गुरु मानावे. उदा. 'उत्तर' यात 'उ' लघु वाटला तरी गुरु आहे. 'शब्द' यामधे 'श' गुरु आहे. पण 'ब्द' जरी जोडाक्षर असले तरी लघु आहे. भास्कर मधला 'स्क', चंद्र मधला 'द्र' हेही लघु आहेत.

अ, ऱ्हस्व इ, ऱ्हस्व उ व पहिली वेलांटी हे लघु असतात. उरलेली (बाराखडीतील) अक्षरे दीर्घ असतात. संस्कृत मधून आलेला ऋ हा स्वरही लघु आहे.

**– संगीता जोशी**

■■■

# चिंतन...

गझलसंबंधी काय लिहायचं? ती कुठे भेटली, कधी भेटली हे लिहायचं? का अमुक गझल केव्हा लिहिली, त्यावेळी मन:स्थिती नेमकी कशी होती, त्यातला 'तो' शेर कसा सुचला?... इत्यादि प्रश्न समोर आले की उत्तरं सुचतंच नाहीत. वाहत्या पाण्यात आपण पाय ठेवून उभे राहिलो असतांनाच एक पाय क्षणभर वर उचलून पुन्हा त्याच जागी परत ठेवला तरी पाणी तेच असतं का? 'ते' पाणी कधीच वाहून गेलेलं असतं. त्याची जागा नवीन पाण्यानं घेतलेली असते! आयुष्यातला कोणताही क्षण कोणालाही पुन्हा पकडता येत नाही. कितीही हवा असला तरीही! मग मी काय उत्तर देणार? पण तरीही काही लिहिणार आहे. कारण गझल माझी सखी आहे. जिवाभावाची सखी!

ह्या सखीची आणि माझी पहिली ओळख झाली तेव्हा तिचं नावही मला माहीत नव्हतं. मला गाता येत होतं म्हणून मी गुणगुणत कसल्यातरी तालावर कविता लिहीत होते. जे लिहिलं गेलं ते लयबद्ध असल्यामुळे छान वाटलं. आणखी अशाच काही कविता लयीत लिहीत गेले. पुढे काही वर्षांनी कळलं की ह्या रचनेला गझल म्हणतात. बेगम अख्तर कालवश झाल्या तेव्हा मी जी कविता लिहिली ती त्यावेळचे राजकवी यशवंत यांनी वाचली तेव्हा 'ही गझल आहे' असे ते म्हणाले. तेव्हा मला हा फॉर्म सापडला हे मला कळले. तेव्हा सुरेश भट हे नावही मी ऐकले नव्हते व त्यांच्या संपर्कात असणेही शक्य नव्हते. मात्र त्यावेळच्या माझ्या गझला पूर्णपणे निर्दोष नव्हत्या. काफिया जमत होता, पण अलामत माहीत नव्हती. पुढे काही वर्षांनी सुरेश भटांचा पुण्यातला पहिला कार्यक्रम बेलवलकर यांच्या टेरेस वर झाला, त्यात मला भटांसमोर गझल वाचण्याची संधी मिळाली. त्यांनी खूप कौतुक तर केलेच, व अलामत समजावून सांगितली. मला आठवतंय, तेव्हा कवी अनिल कांबळे प्रथमच सुरेश भट यांना माझ्या घरी घेऊन आले ! मी धन्य धन्य झाले होते ! मग काय, त्या बैठकी, चर्चा, मग त्यांचा पत्रव्यवहार... हा सिलसिला सुरू झाला. त्यांनी खूप प्रोत्साहन दिले. 'मेनका' मासिकात ते गझलचे सदर चालवत होते, त्यातही माझ्या काही गझलांची समज पक्की झाली. एकदा 'मेनका'साठी मी दिलेल्या गझलेत त्यांनी इतके बदल

(इस्लाह) केले की माझे शेर मला माझे वाटेनासे झाले. त्यानंतर मी ‘मेनका’साठी गझल पाठविली नाही. भटांशी स्पष्ट बोलणेही झाले. ‘तुम्ही तर उत्कृष्टच लिहिता, पण माझी गझल ही माझी असली पाहिजे. एखाद दुसऱ्या शब्दाचा इस्लाह ठीक आहे, पण शेरातील संपूर्ण विचारच बदलून गेला तर ती तुमची गझल होईल. माझी कशी राहील?’ असे माझे म्हणणे होते. ते त्यांनी नंतर मान्य केले. पुढे माझ्या बाबतीत त्यांनी क्वचितच दखल घेतली. सांगण्याचा हेतू हा की माझ्या गझला ह्या पूर्णपणे माझ्याच राहिल्या. सुरुवातीच्याही आणि नंतरच्याही !

गझल हा फॉर्म मी का निवडला? खरं तर हे ठरवून काहीच घडत नाही. एखादी ओळ मनात स्फुरते ती गझलची असते म्हणून गझल तयार होते. पण हे नेहमीच घडते असे नाही. मी आजही इतर कविताही लिहीत आहे. पूर्वीही लिहितच होते. शिरीष पै म्हणतात ती गझलवृत्ती माझीही असावी! उदा. समाजात दिसणाऱ्या अन्यायाबद्दल मनात चीड, दु:खातही सुखाचा शोध, पराभवाचाही उपभोग,... असे बरेच काही !

आणखी एक खासियत मला गझलकडे आकर्षित करते. दोन ओळीत एक विचार सामावण्याची तिची क्षमता. आपल्या मनात विचार तरंग उठतात, ते खरोखर लाटांसारखेच असतात. एका विचारातून आपण दुसऱ्या विचाराकडे कसे वळतो हे आपल्याला कळतही नाही. एक लाट फुटते, मागून दुसरी येते, पहिलीशी तिचा काही संबंध नसतो. साखळी चालूच रहाते. गझल रचनेशी हे सुसंगतच आहे. आजची जीवनशैलीही वेगवान झाली आहे. संघर्ष वाढला आहे. जीवन सुसह्य होण्यासाठी झगडावे लागते. त्यात छंद, कलेचा आस्वाद यासाठी फुरसतही नसते. क्रिकेट आता टेस्ट मॅच वरून वन-डे, त्यावरून फिफ्टी नंतर ट्वेण्टी वर आली. कदाचित दहा ओव्हर्स वरही येईल ! ह्या माहौलमध्ये गझलचा- एका शेराचा- संक्षिप्तपणा वरदानच आहे म्हणायचा ! शेर चटकन लक्षात येतो, लक्षात राहातो. दादही घेऊन जातो.

गझल ही प्रतीकांची भाषा आहे, ही तिची खूप मोठी ताकद आहे. त्यामुळे तिचे शब्द शब्दामागचेही अर्थ सांगून जातात. श्रोत्याला/वाचकाला स्वत:च्या अनुभवाचे अर्थ शब्दांना देता येतात आणि ती गझल श्रोत्यांची होऊन जाते !

म्हणून वाचकाला ती इतर कवितेपेक्षा अधिक जवळच वाटत असावी.

हे सर्व ठीक आहे, पण गझलच्या बाबतीत असंही घडतं की दुसऱ्या एखाद्या कवीच्या गझलेतील आवडलेल्या कल्पना घेऊन थोड्याफार फरकाने नवकवी आपला शेर रचतो. काफिये समान येणे एरव्हीही अपरिहार्यच असते. काही वेळा उर्दू शेरांतून उचलेगिरी होते. मात्र आजच्या या भ्रष्टाचाराच्या युगात या गोष्टीचे आश्चर्य वाटायला नको ! पण हे

नि:संशय निंद्य आहे.

कविता असो वा गझल–त्यातील शेर–मनात कसा तयार होत असावा याविषयी माझी एक स्वत:ची कल्पना आहे. शिंपला हा एक मृदुकाय प्राणी असतो. शिंपला हे त्याचे कवच असते. बाहेरून येणारा एखादा कण त्याला टोचू लागला की तो त्या कणाभोवती शरीरातून एकप्रकारचा स्राव सोडतो व घोळून घोळून त्याचाच मोती तयार होतो. आपल्या मनाला असाच एखादा अस्वस्थ करणारा अनुभव आला तर त्यावर शब्दांची पुटे चढत जातात आणि कविता तयार होते ! (ही कल्पना पुढे अनेकांना आवडली व त्यांनी ती वापरली)

हल्ली मंचीय गझल हा प्रवाह गझलेत मोठ्या प्रमाणात दिसतो. कारण मंचावर दाद मिळावी. यालाही हरकत नाही, पण अतिरेक होऊ नये इतकेच !

हल्ली गझल हा प्रकार लोकप्रिय झाला आहे. सर्वश्री भीमराव पांचाळे, माधव भागवत, राजेश उमाळे, मदन काजळे, दत्तप्रसाद रानडे, सुधाकर कदम इत्यादी गायकांचाही त्यात सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यामुळे गझल लोकांपर्यंत पोहोचली.

एकदा मला विचारलं गेलं, की कवितेत व्यक्त झालेले अनुभव हे तुमचेच असतात का ? या प्रश्नाला माझं उत्तर हो असेच आहे. असे पाहा, की वर्तमानपत्रात एखादी विशेष बातमी वाचली, तर आपण बेचैन होतो. त्यात आपण इतके गुंतून जातो, की तो अनुभव आपलाच होतो. (स्त्रीवर झालेल्या बलात्काराबद्दल शेर लिहिण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाची गरज नाही.) आपण त्यावर लिहितो, मग ते गद्य असो वा पद्य ! याचा अर्थच असा की आपण त्या अनुभवाशी एकरूप झालो होतो. प्रत्येक अनुभव स्वत:–शब्दश:– घ्यायचा म्हटला तर एक आयुष्यही पुरणार नाही. आणि तशी जरूरही नसते. माणसाचं मन त्यासाठीच तर संवेदनशील बनवलेलं असतं. दुसऱ्याचं दु:खही आपण आपलं मानू शकू तर आपण माणूस ! आणि ते जर शब्दात बांधून सौंदर्य निर्मिती करू शकलो तरच आपण कवी !!

**– संगीता जोशी**

❋❋❋

**संगीता जोशी**

# परिचय

* मराठीतील पहिली स्त्री-गझलकार.

* तिसरे अखिल भारतीय मराठी गझल संमेलन अमरावती येथे फेब्रुवारी २००४ मध्ये पार पडले; त्याचे अध्यक्षपद भूषविले.

* देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग येथे जिल्हास्तरीय कालेज विद्यार्थी संमेलन झाले; त्यात प्रमुख वक्ता.

● **काव्यसंग्रह :**

१) **म्युझिका** – दोन आवृत्त्या.. १९८६ व २००३.
प्रस्तावना : व.पु.काळे
प्रकाशक : सुगावा प्रकाशन, पुणे : वाङ्मयसेवा प्रकाशन, नासिक रोड.

२) **वेदना संवेदना** – १९९७
प्रस्तावना : शंकर वैद्य
प्रकाशक : स्नेहल प्रकाशन, पुणे

३) **चांदणे उन्हातले** – २००४
प्रकाशक : स्नेहल प्रकाशन, पुणे
अभिप्राय : मुरलीधर जावेडकर

४) **मराठी गझल :** संगीता जोशी (पॉकेट बुक)...२००७.
प्रकाशक : अभिव्यक्ति प्रकाशन, नवी मुंबई.
संपादन : डॉ.राम पंडीत
अभिप्राय : डॉ.राम पंडीत, प्रवीण दवणे, अरुण दुभाषी.

५) **ती भेटते नव्याने**
संवेदना प्रकाशन, पुणे
ह्या गझलसंग्रहाचे प्रकाशन तिसऱ्या विश्वसाहित्य संमेलनात सिंगापूर येथे, मा.उषा तांबे (माजी अध्यक्षा, अखिल भारतीय साहित्य महामंडळ यांचे हस्ते झाले.

## इतर पुस्तके :

१) **नजराणा शायरीचा –** स्नेहल प्रकाशन, पुणे, मीर, गालिब पासून आधुनिक उर्दू कवींचे विविध १००० पेक्षा जास्त शेर निवडून त्याचे मराठीत अर्थ सांगितले आहेत. अशा प्रकारचे हे पहिलेच पुस्तक असून त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या आहेत.

२) **अभ्यास–मंडळ मार्गदर्शक :** गाईड टू स्टडी सर्कल ह्या इंग्रजी पुस्तकाचे मराठी भाषांतर (पृष्ठे १५०, डेमी)

३) **Shirdi Che Saibaba : 'शिर्डीचे साईबाबा'** लेखक डॉ.गवाणकर, ह्या मराठी पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर (पृष्ठे ३००)

४. प्रौढ साक्षरांसाठी छोट्या अशा वीस पुस्तकांचे लेखन, काहींची सरकारद्वारा निवड.

## याशिवाय :

- काही उर्दू गझलांचे लेखन.
- 'शायरी पुण्याची' या संग्रहात २ उर्दू गझलांचा समावेश.
- भारत–पाक येथील उर्दू कवयित्रींचा एकत्रित संग्रह 'गुलमोहर' जबलपूर येथून प्रसिद्ध झाला; त्यात २ उर्दू गझलांचा समावेश.
- 'नजराणा शायरीचा' पुस्तकातील शेरांचा अनुवाद अंजली ठकार यांनी केला. त्याचे प्रस्तावना–लेखन.
- पनवेलचे गझलकार ए.के.शेख यांच्या 'सखी' ह्या गझलसंग्रहाचे प्रस्तावना–लेखन.
- अमरावतीचे डॉ.सुबोध निवाणे यांच्या गझलसंग्रहाचे प्रस्तावना–लेखन.
- प्रा.संध्या पाटील यांच्या गझलसंग्रहाचे प्रस्तावना–लेखन.
- 'मेनका' या मासिकासाठी उर्दू शायरी संबंधी ललित लेख. सुमारे ७ वर्षे लिहिले. ते महाजालावर येत असून त्याची २ पुस्तके प्रकाशित होत आहेत.
- काव्यसंग्रहाचे वृत्तपत्रांसाठी परीक्षण–लेखन : डॉ.रश्मी घोलप, रमण रणदिवे.
- राजेंद्र खेर यांच्या 'दैनंदिन भगवद्गीता' याचे लोकमतसाठी परीक्षण.

## पुरस्कार :

- पुणे नवरत्न पुरस्कार.
- रंगत–संगत प्रतिष्ठानतर्फे 'भाऊसाहेब पाटणकर' पुरस्कार – २००९.
- अकोला येथून दिला जाणारा 'शब्दांकुर' पुरस्कार 'चांदणे उन्हातले' या संग्रहास मिळाला.

## मान्यवरांची दखल :

वरील काव्यसंग्रहांना त्या त्या वेळच्या मान्यवरांची प्रशंसा लाभली आहे. काही नावे :
**कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे, सुरेश भट, गं.ना.जोगळेकर, प्रा.मु.म.जावडेकर**

## संगीत संयोग :

- गझलनवाझ **भीमराव पांचाळे** यांनी रचना सरबद्ध केल्या असून त्यांच्या कॅसेट व सी.डी.निघाल्या आहेत. त्यांच्या मैफलीतही ते त्या रचना गात असतात.
- संगीत तज्ञ **यशवंत देव** यांनी गझल व इतरही कविता संगीतबद्ध केल्या असून ते मैफलीत गात असतात.
- अष्टविनायक–गीतांची 'प्रथमेशा' ही आठ गीतांची सी.डी. सोनी कंपनीने काढली; त्यातील गीतांना **पं.केदार पंडीत** यांनी संगीत दिले असून **पं.संजीव अभ्यंकर** यांनी ती गायली आहेत.
  याच दोघांनी सादर केलेल्या स्वरसंजीवन या अल्बममध्ये 'ही स्वरांची बिल्वपत्रे' हे गीत **पं.अभ्यंकर** यांनी गायले आहे. ते इतके लोकप्रिय आहे की **पं.सजीव अभ्यंकर** आपल्या मैफलीचा शेवट बहुतेक वेळा याच गीताने करतात.
- याशिवाय, गझलगायक **राजेश उमाळे, सुधाकर कदम, शरद करमरकर, माधव भागवत, आशिष मुजुमदार** यांनीही रचना स्वरबद्ध केल्या आहेत.
- **केदार परांजपे व श्रीधर फडके** यांनीही स्वर दिले आहेत.
- श्री सत्यसाईबाबा यांचेसमोर सादर होणाऱ्या अनेक कार्यक्रमांसाठी हिंदी–गीतलेखन केले असून अनेक रचनांना **गिरीश अत्रे** यांनी संगीत दिले आहे.
- **अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्रि** यांच्या अल्बमसाठी काही हिंदी गीत लिहिली आहेत. माझे एक गीत त्यांनी स्वत: गायले होते.
- आकाशवाणीच्या AIR-64 नियमानुसार मान्यताप्राप्त कवयित्री. अनेक ज्ञात–अज्ञात गायक रचना आकाशवाणी व टीव्हीवरुन गातात.

## सहित्य क्षेत्रातील विविध मुशाफिरी :

- सिंगापूर येथील ३ ऱ्या विश्वसाहित्य संमेलनात निमंत्रीत कवयित्री म्हणून सहभाग.
- अनेक कविसंमेलने व मराठी-उर्दू मिश्र मुशायऱ्यात सहभाग.
- अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनात निमंत्रित कवयित्री म्हणून सहभाग.
- पहिल्या कोथरुड साहित्यसंमेलनात कविसंमेलनाचे आयोजन व सूत्रसंचालन.
- मंचर येथील एकदिवसीय साहित्यसंमेलनात गझल-रंग हा स्वत:च्या गझल वाचनाचा कार्यक्रम सादर. असे अनेक कार्यक्रम इतरत्र सादर.
- बाणेर येथील विभागीय साहित्य संमेलनात कविसंमेलनात निमंत्रीत म्हणून सहभाग - २०११.
- गझल-लेखन या विषयावर अनेक कार्यशाळा महाराष्ट्र व गोवा येथे घेतल्या.
- शारदा संगीत विद्यालय, ठाणे येथे विद्यार्थ्यांना गझलविषयक मार्गदर्शन.
- डॉ.प्रभा अत्रे यांच्या पुणे येथील गुरुकुलात त्यांच्या शिष्यांना गझलविषयक मार्गदर्शन.
- प्रतिष्ठाप्राप्त स्वानंद ज्येष्ठ नागरिकसंघात गझलरंग कार्यक्रम सादर.
- याशिवाय गझलसंबंधी समीक्षात्मक भाषणे व लेखन.
- कविश्रेष्ठ सुरेश भट यांच्या 'सप्तरंग' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी, त्यांच्या उपस्थितीत त्या संग्रहाचे रसग्रहण करणारे भाषण (अध्यक्ष गं.ना. जोगळेकर)
- **ई.टी.व्ही. मराठी** वाहिनी वर संवाद या कार्यक्रमात **राजू परुळेकर** यांनी घेतलेली गझल विषयक मुलाखत दोन भागात प्रसारित झाली. वेळ ५० मिनिटे. (१७ व १८ सप्टेंबर २००६)
- वरील वाहिनी वरुन प्रसारित होणाऱ्या **'हा खेळ संचिताचा'** मालिकेसाठी शीर्षकगीत व इतर गीतांचे लेखन. **'एक होता राजा'** मालिकेसाठीही गीतलेखन.
- त्याच वाहिनीवरील **'सखी'** कार्यक्रमासाठी संहितालेखन व समन्वयकाचे काम.

## कथा लेखन :

- काही कथा व ललित लेख दिवाळी अंकातून प्रसिद्ध.
- २०१२ साली म.सा.प.वारजे शाखा तर्फे घेण्यात आलेल्या कथास्पर्धेत **प्रथम पारितोषिक प्राप्त.**
- काही कथा विपुलश्रीमधून प्रसिद्ध.

- ‘झगमग’ स्थळासाठी ब्लॉग–लेखन.
- फिल्म रायटर्स असोसिएशनची सभासद.
- सध्या **विवेक–हिंदी** या मासिकासाठी उर्दू शायरांवर ललितलेखन सदर चालू आहे.

## आगामी :

- उर्दू शायरीसंबंधी लेखांची पुस्तके ‘उर्दू शायरीचा आस्वाद’ भाग १ व भाग २, तसेच, निवडक मराठी गझलांचे संकलन फेब्रुवारी २०१४ मध्ये प्रसिद्ध होत आहे.
- गझलांशिवाय इतर कवितांचा संग्रह.

## इतर :

- शिक्षण बी.एस्सी, बी.एड्. आबासाहेब अत्रे माध्यमिक शाळेत गणित व विज्ञान विषयांचे अध्यापन. आता निवृत्त.
- पुणे महानगरपालिका आदर्श शिक्षक पुरस्कार.
- पुणे जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार.
- जैन संघटना – आदर्श शिक्षक पुरस्कार.

## संपर्क :

भ्रमणध्वनी : ०९६६५०९५६५३
ई–मेल : sanjoshi729@gmail.com
पत्ता – अे–१, भूषण अपार्टमेंट, शाहू कॉलनी, लेन नं. १,
कमिन्स कॉलेज जवळ, ११/२, कर्वेनगर, पुणे ४११०५२.

■■■